

वर्षारंभ
अंक
जून
१९६४

# माणू












## चित्र वार्ता

मुंबईला दि. २० एप्रिल ते २५ एप्रिल असे पाच दिवस भरलेल्या व पुढे तीन दिवस मुदत वाढवाव्या लागलेल्या बाल-साहित्य जत्रेतील काही दृश्ये.

← जत्रेचा दर्शनी भाग–

**मूळ** कल्पना बाँबे बुक डेपोचे चालक श्री. कुमठा यांची. ज्यांनी ज्यांनी ही जत्रा पाहिली त्यांनी त्यांनी कुमठांवर अभिनंदनाचा वर्षाव केला. 'बाँबे बुक डेपो'चे पुस्तकांचे इतर सर्व व्यवहार आठ दिवस बंद ठेवून दुकानात केवळ बालवाङ्मयच विक्रीस ठेवणे, त्याची आकर्षक मांडणी करणे, पालकांना, लहान मुलांना ते मुक्त मनाने पाहू-वाचू देणे, हा कार्यक्रम परीक्षा संपून शाळांना सुट्टी लागण्याच्या वेळेस आखणे, त्याची योग्य ती प्रसिद्धी करणे यात कुमठांची योजकता आणि रसिकता चांगलीच प्रत्ययास येते.

**'जत्रा' संपल्यावर कुमठांना व त्यांच्या सहकाऱ्यांना दुकान अगदी सुनेसुने वाटले.** →





जत्रा पाहून अनेक थोरामोठ्यांनी आणि बालगोपालांनी आपले मनोगत वहीत नोंदवून ठेवले आहे. कवी विंदा करंदीकर लिहितात–

हे पालकांच्या खिशाला धोक्याचे झाले पाहिजे ! असे एखादे तरी दुकान मुंबईत बाराही महिने सुरू असावे...... तो दिवस उगवेपर्यंत निदान असे प्रदर्शन दरसाल भरवीत राहावे. शक्य तर महाराष्ट्रातील इतर प्रमुख शहरांवरही चाल करून जावे. श्री. कुमठा, श्री. रामदास व सदानंद भटकळ वगैरे नव्या दमाची माणसे या क्षेत्रामध्ये अशी मुलुख-गिरी करून दाखवतील याचे आश्वासन या प्रदर्शनामध्येच प्रकट झाले आहे.

**← 'हात लावू नका'**
**अशी पाटी कुठेही नाही म्हणून . . .**

# दोन पत्रे

स. न. १ मे १९६४

आपण अगत्यपूर्वक पाठविलेला 'मे' चा 'माणूस' "त्रागा" ही माझी कविता घेऊन सुखरूप घरी आला. फार आभारी आहे. 'माणसा'चे बहिरंग व अंतरंग दोन्हीही फार पसंत पडले. माझे परमस्नेही श्री. कुसुमाग्रज यांचे दर्शनी छायाचित्र तर उत्कृष्टच आहे. ते याच अंकावर यथातथ्य सजावटीत देण्यात 'माणसा'ची कुशल योजकता एकदम पसंत. अभिनंदनीय. आता 'त्रागा' या कवितेबाबत थोडा त्रागा. जाने. १९६४ चा सुंदर नि संग्राह्य 'माणूस' पान १७ वर 'त्रागा' ही कविता घेऊन आला होता. तीच कविता 'मे'च्या 'माणसा'ने पान ४३ वर आणली. दोघांही 'माणसां'चे मी मनःपूर्वक स्वागत केले. वाटले, माणसाला 'त्रागा' आवडला असेल.

**मा. गो. काटकर**
सोलापूर

(एखादी कविता आवडली तरी तीनचार महिन्यांच्या मध्यंतराने ती पुनः छापणे इष्ट नाही. 'त्रागा'ही कविता आमचेकडे दोनवेळा तर पोस्टाने आली नाही ना, अशी शंका येते. कारण कंपोजला गेलेले साहित्य पुनः स्वीकृत साहित्यात सहसा शिरत नाही. असो. ही गोष्ट फक्त आपल्याच लक्षात आली हे स्वाभाविक व इतर कुणाच्याही येऊ नये हेही स्वाभाविक!)

स. न. २-५-१९६४

'मे' १९६४ चे अंकात आगामी साहित्य संमेलनाचे नियुक्त अध्यक्ष श्री. वि. वा. शिरवाडकर यांचा परिचय करून देताना ते 'स्वराज्य' साप्ताहिकाचे, कै. रमाकांत वेलदे यांचेबरोबर संपादक होते असे त्या लेखात श्री. अच्युत शिरवाडकर यांनी नमूद केले आहेत. परंतु त्या साप्ताहिकाचे नाव 'स्वराज्य' नसून 'स्वदेश' असे होते. आपण ही दुरुस्ती पुढील अंकात करावी ही विनंती.

**सुहास जोशी**
नासिक

(श्री. वि. वा. शिरवाडकर हे 'स्वराज्या'चे संपादक नसून 'स्वदेश'चे होते हे नजरेस आणून दिल्याबद्दल आम्ही आभारी आहोत.)




संपादक : श्री. ग. माजगावकर
वर्ष चौथे : अंक पहिला : जून १९६४
किंमत एक रुपया : वार्षिक वर्गणी दहा रुपये

* * * *

गेल्या अंकात 'शिव्या आणि ओव्या' या शीर्षकाखाली 'माणूस'ने जी काही निवडक व वेगळी वाटणारी पत्रे प्रसिद्ध केली त्यावरून डोक्यात राख घालून 'ठणठणपाळ' या नावाने कुणी एकाने 'माणूस'च्या संपादकवर्गावर चिखलफेक करणारे एक अगदीच 'हलक्या' मजकुराचे पत्र आमचेकडे पाठवून दिले आहे. 'हिंमत असेल तर हे पत्र प्रसिद्ध करा' असे त्यात शेवटी आव्हानही आहे. याबाबत आमचा खुलासा एवढाच, की 'ठणठणपाळ' या टोपणनावाने पत्र लिहिण्याऐवजी या पत्रलेखकाने आपला खरा नावगावपत्ता पत्रावर दिला असता व आमची या खरेपणाविषयी खात्री पटली असती तर हे पत्र याच अंकात 'माणूस'ने बिनदिक्कत छापले असते. आमची हिंमत अजमावणाऱ्यांनी निदान स्वतःचे खरे नावगाव कळवण्याची हिंमत तरी दाखवायला हवी होती!

दुसरेही असेच एक नावगाव नसलेले लांबलचक पत्र याच महिन्यांत आमच्याकडे आले आहे. या पत्रांत 'माणुस' वर केलेली टीका सद्भावनेने केलेली दिसते व त्यातील काही मुद्यांना सविस्तर उत्तर देण्याची आमची इच्छाही आहे. 'माणूस' मध्ये उणीवा आहेत, दोष आहेत, याची आम्हांला जाणीव आहे व ते कोणी दाखवून दिले तर शक्यतेच्या मर्यादेत ते सुधारण्याचा आमचा प्रयत्नही आहे.

नाव-गाव नसलेली 'चोरटी' पत्रे वाचकांनी पाठविली, तर त्यांची दखल घेतली जाणार नाही, हे प्रसिद्ध करण्याची संधी दिल्याबद्दल मात्र या उभय पत्रलेखकांचे आभार मानतो.

**—संपादक**

## या अंकात

**मुखपृष्ठकथा** ...... नाझी भस्मासुराचा उदयास्त.
**कथा** ...... जी. ए. कुलकर्णी, शरद् विनायक काळे, जयश्री खिरे, मधुकर परांजपे, अनंतराव पाटील, सीमा कांदळगावकर.
**कविता** ...... सुरेश भट, आनंद यादव, ललित सोनोने, श्रीराम पंडित, मधुकर कुलकर्णी, बन्या साठे, मधुसूदन गोखले, सुमन करमरकर.
**विशेष लेख** ...... डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे ... चंद्रशेखर मराठे.
शिवाय चित्रपट, रंगभूमी, क्रीडा ही नेहमीची सदरे.

*

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतातच असे नाही.

सर्व हक्क स्वाधीन.

# 'वाङ्मयशोभे'चा रौप्यमहोत्सव

## एका लेखकाच्या दृष्टीकोनातून एक संपादक

गेल्या महिन्यात 'वाङ्मयशोभा' या मासिकास पंचवीस वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने 'वाङ्मयशोभे'चे संपादक श्री. मनोहर महादेव केळकर यांनी एक अभीष्टचिंतन-समारंभ आयोजित केला होता. समारंभाचे अध्यक्षस्थान 'सकाळ'कार ना. भि. परुळेकर यांनी विभूषित केले होते. या निमित्ताने अनेकांनी मासिकाच्या संपादकांचे अभिनंदन केले. सुसंस्कृत शहरी मराठी माणसांच्या जीवनात मराठी मासिकांना बरेच स्थान आहे. मराठी मासिकांची संख्याही अलिकडे झपाट्याने वाढली आहे. मराठी वाचकांच्या घरात मासिक हे या ना त्या कारणाने घुसत असते. तेव्हा एखाद्या मासिकाने मराठी वाचकाच्या बदलत्या अभिरुचीशी झगडत अव्याहत पंचवीस वर्षे टिकाव धरावा ही गोष्ट निश्चित अभिनंदनीय ठरते.

'वाङ्मयशोभा' मासिकाचे पहिल्या दोन-तीन वर्षांचे अंक सहज चाळले व आजकाल नवीन निघणाऱ्या मासिकांचे सुरवातीचे अंक चाळले तरी 'वाङ्मयशोभे'च्या संपादकांची मासिकाची प्रेरणा किती तरी निराळी व अस्सल वाङ्मयीन होती ह्याचा प्रत्यय येतो. या दृष्टीने या समारंभात सौ. विद्या बाळ यांनी 'वाङ्मयशोभे'च्या पहिल्या तपाची जी ओळख घडविली ती अगदी यथोचित अशी होती.

चांगल्या वाङ्मयाची प्रेरणा घेऊन काही काल तरी हे एकच मासिक वाटचाल करीत होते. चांगले साहित्य मिळवावे, नव्या साहित्यिकांना प्रोत्साहन देऊन पुढे आणावे, कुठल्याही तऱ्हेने सवंग साहित्याला स्थान देऊ नये अशा सर्व दृष्टींनी श्री. म. म. केळकर यांनी या मासिकाचे रोपटे काळजीपूर्वक वाढवले.

'अभिरुची,' 'सत्यकथा,' 'वसंत' व 'हंस' या परंपरेची आद्य प्रेरणा 'वाङ्मयशोभा' ही आहे, ही गोष्ट सर्वांनी मान्य केलेली आहे. असे सुरवातीचे यश पदरी पडूनही 'वाङ्मयशोभे'ला त्यानंतरचा काही काल हा विझू-विझू अवस्थेत काढावा

श्री. मनोहर केळकर



ना खंत ना खेद

लागला. व आज जरी, "अपयश धुऊन काढले हेच माझे यश आहे" असे समाधान श्री. केळकरांना लाभलेले असले तरी हे फक्त यशाच्या आर्थिक बाजूबद्दलच खरे आहे. नव्या नव्या साहित्याचा आणि यशोदायी लेखनाचा केंद्रबिन्दू हा 'वाङ्मयशोभे' पासून दूर गेला आहे ही गोष्ट श्री. केळकर यांना अप्रिय वाटली तरी सत्य आहे.

याचे कारण अर्थात् केळकरांच्या आणखी एका गुणात आहे. हा गुण म्हणजे केळकर हे स्वतः प्रवाही लेखणीचे वारसदार आहेत. भरपूर लेखन करावे या ऊर्मीतून त्यांनी मासिकाचा व्यवसाय पत्करला. परंतु मासिकाच्या व्यवहाराची बाजू संभाळता संभाळता त्यांच्यातील लेखक हतप्रभ झाला. ज्यांना केळकरांनी पुढे आणले ते साहित्यात नावे कमावून बसले. केळकर मात्र मागेच राहिले. याच्या कारणाना फारसा अर्थ नसतो. परंतु केळकरांच्या बाबतीत बोलावयाचे, तर त्यांची लेखणी ही ललित साहित्यापेक्षा पत्रकाराच्या लेखणीशी जा घेणारीपै आहे. ती त्यांनी मासिकासाठी राबवली व बोथट मात्र केली. (अलिकडेच त्यांनी केलेले उल्लेखनीय लिखाण हे कै. न. चिं. केळकर व कै. य. गो. जोशी यांचे वरील मृत्यूलेख आहेत ही गोष्ट या संदर्भात ध्यानात घ्यावी.) पुढे पुढे 'वाङ्मयशोभे'चे स्वरूप केळकरांच्या मनाप्रमाणे केवळ वाङ्मयीन उरले नाही. गेल्या दहा वर्षांत केळकरांनी जी संपादकीय स्फुटे 'वाङ्मयशोभे' तून लिहिली त्यांचे विषय वरील विधानास पुष्टी देतील. केळकर आपल्या वृत्तीनुसार केवळ वाङ्मयीन स्वरूपाच्या प्रेरणेपासून लांब गेले व मासिकाचे स्वरूप काहीसे सर्वविषयस्पर्शी झाले.

जे मासिक इतर अन्य व्यवसायाचा जोडधंदा म्हणून छापले जात नाही ते मासिक नाहीतरी केवळ वाङ्मयीन प्रेरणेने चालणे महाकठिण. तेव्हा "फार चांगले मासिक हो! बंद पडले बिचारे!" या धोक्यापासून मासिकाला वाचविण्यासाठी केळकरांनी त्यात आवश्यक ते चांगले बदल केले. जीवनाच्या अनेक अंगांना स्पर्श करणारे साहित्य...राजकीय व्यंगचित्रांसह-त्यांनी मासिकात समाविष्ट केले. त्यांनी हौतात्म्य टाळले व सातत्य पत्करले. पंचवीस वर्षे ही कठीण वाटचाल करणे हे यशही थोडके नसे! परंतु या खटाटोपात साहित्यातील नवीन नवीन उन्मेषाशी त्यांचा संबंध क्षीण होता होता जवळ जवळ तुटला याची खंत केळकरांना अस्वस्थ करीत राहिली.

या रौप्यमहोत्सवी समारंभात महाराष्ट्रातील शाही प्रकाशक श्री. देशमुख यांनी हे स्पष्टपणे सांगितले, 'की पारिजात लावला केळकरांनी आणि फुले मात्र आमच्या अंगणात पडली.' व्यवहाराचा विचार केला तर हा मूर्खपणा; मूळ प्रेरणा शोधली तर निवडुंग लावला नाही, पारिजात लावला हीच अभिनंदनाची बाब आहे.

पंचवीस वर्षांचा काळ चालून आल्यावर श्री. केळकर यांना धंद्याच्या दृष्टीने काहीसा स्वास्थ्याचा काळ लाभला आहे. ना खंत ना खेद या अवस्थेत आपण शिरल्याची कबुली त्यांनीच दिली आहे. लेखक म्हणून आपण स्वतःवर अन्याय केल्याची जी रुखरुख त्यांच्या मनात आहे तीदेखील नाहीशी होण्याच्या दृष्टीने त्यांनी 'वाङ्मयशोभे'चा संसार यापुढे आखावा. पुढील अनेक वर्षे 'वाङ्मयशोभे'ने स्थान मराठी मासिकांत अधिक वैशिष्ट्यपूर्ण होत जावो अशी सदिच्छा.

**रा. म. शास्त्री**

## भारतीय संस्कृतीचे परदेशात प्रतिनिधित्व करणारे

# • • • श्री. अप्पासाहेब पंत

**श्री. वा. काळे**



राजदूत, श्री. अप्पासाहेब पंत, ह्यांची इंडोनेशियांतून नॉर्वेमध्ये बदली झाली असून कामावर रुजू होण्यासाठी ते रविवार दि. २४ रोजी, मुंबईहून निघाले. पूर्व आफ्रिकेत ते राजदूत असताना त्यांनी तेथील आफ्रिकन पुढाऱ्यांना आणि जनतेला आपलेसे करून त्यांचा स्नेह संपादन केला, त्यामुळेच तेथील लक्षावधी हिंदी लोक अजून जिवंत आहेत, हे सर्वमान्य आहे. तेथून त्यांना सिक्किमला पाठविण्यात आले. भारत-चीन सरहद्दीवरील ह्या प्रदेशात त्यांनी असेच संबंध निर्माण करून आपले कार्य उत्कृष्ट रीतीने पार पाडले. त्यानंतर ते भारताचे इंडोनेशियांतील राजदूत झाले. तेथेही त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत भारताचे स्नेही टिकविण्याची पराकाष्ठा केली. गेली १७ वर्षे त्यांनी बजावलेल्या ह्या कामगिरीबद्दल महाराष्ट्रीयांना त्यांचे कौतुक वाटते; अभिमान वाटतो.

अप्पासाहेबांचे सबंध जीवनच वैशिष्टयपूर्ण आहे. त्याला अध्यात्माची बैठक आहे. ते अत्यंत साधे, सरळ, प्रेमळ, नेहमी चांगलेच तेवढे पाहणारे, वाईट माणसांतीलही चांगले शोधून काढणारे, सात्त्विक, निष्ठावंत असे गृहस्थ आहेत. अप्पासाहेबांच्या पत्नी, सौ. नलिनीदेवी ह्या स्वतः हुशार, एफ. आर. सी. एस.ची पदवी मिळविलेल्या प्रवीण सर्जन, स्वतःच्या बुद्धिमत्तेविषयी अभिमान असणाऱ्या असल्यामुळे त्यांनाही अप्पासाहेबांची थोरवी उमगायला थोडा वेळ लागला. पण एकदा साक्षात्कार होताच आपण कमी पडू नये म्हणून त्यांना मुद्दाम प्रयत्न करावा लागला. लोकोत्तर अप्पासाहेबांचे गृहिणीपद यशस्वी सर्जनच्या लौकिकापेक्षा त्यांना भूषणाचे, समाधानाचे वाटले.

अप्पासाहेब कमालीचे पितृभक्त. वडील करीत असलेला मंगळवारचा उपवास त्यांनी चालू ठेवला आहे. देवीच्या नवरात्राचा कडक उपवास त्यांना असतोच. औंधचा त्यांना अतिशय अभिमान, तर औंधच्या प्रजाजनांना अप्पासाहेबांबद्दल अत्यंत प्रेम आणि भक्तिभाव. परवाच ते औंधला जाऊन आले, तेव्हा अक्षरशः हजारो लोकांनी त्यांचे मनोभावे स्वागत केले. एक महामंत्री सोडले, तर कुठल्याही मंत्र्याला त्याचा हेवा वाटला असता. औंध संस्थानाने पुढाकार घेऊन, ब्रिटिश राजवटीतच, लोकशाही स्थापन केली, त्यावेळी अप्पासाहेब हे जनतेचे पुढारी होते. दररोज ३०–४० मैल पायी प्रवास करून ते खेडोपाडी जात असत. राजवाड्यावर आलेला प्रजाजनांचा मोर्चा त्यांनी मोठ्या सौजन्याने थोपवून, त्यांचेच पुढारीपण घेऊन, त्यांची खरीखुरी सेवा केली होती. महात्माजींच्या सल्ल्याने ते वागत होते. सूतकताईचा आणि खादी वापरण्याचा तो काळ होता. बॅरिस्टर होऊन आलेला हा राजपुत्र लांडी चड्डी घालून सर्वत्र वावरत असे. आपल्या डॉक्टर कन्येसाठी राजघराण्यातला हा सुशिक्षित वर योजताना श्री. मथुराबाई द्रवीड ह्यांनी त्याला ह्या अवतारात पाहिलेले नव्हते; वधूलाही त्याची कल्पना नव्हती. राजे बाळासाहेब औंधकर वाङ्‌निश्चयाचे वेळी मथुराबाईंना म्हणाले, " तुम्हांला मिळालेला जावई रत्न आहे रत्न ! " त्याला मथुराबाईंनी उत्तर दिले, "महाराज, आपल्याला मिळालेली सूनही रत्नच आहे. " त्या दोन्ही रत्नांना एकमेकांची पारख पटली. दोघेही बरोबरीचे असताना, नलिनीदेवींनी अप्पासाहेबांनाच वाट दिली; स्वतःला त्या आपोआप विसरून जाऊन अप्पासाहेबांशी समरस झाल्या.

अप्पासाहेबांना अतिशय उत्कृष्ट मित्र मिळाले आहेत, त्याचे रहस्य त्यांच्या अत्यंत सरळपणात, आपुलकीत, प्रेमभावात, प्रामाणिकपणात आहे. त्यांना माणसांचा सहवास मनापासून आवडतो; बाह्य गोष्टींना ते महत्त्व देत नाहीत. दररोज पहाटे ४ वाजता उठून ते गायत्री मंत्राचा जप करून सुमारे दोन तास पद्मासन घालून ध्यानस्थ बसतात. त्यांचे सूर्यनमस्कार कधीही चुकत नाहीत; आता आगगाडीत मात्र ते सूर्यनमस्कार घालीत नाहीत. टेनिस खेळायला त्यांना विशेष आवडते. संध्याकाळी लेकीबरोबर गप्पागोष्टी केल्याखेरीज ते जेवायला उठत नाहीत. पत्रांना उत्तरे ताबडतोब पाठवतात. कामाचा उठाव तर कमालीचा आहे. वाचनही दांडगे आहे. अशा परिस्थितीत, ते पत्नीच्या वाट्याला फारच थोडे आले, त्यांनी मुलांचे खूप लाड केले, तर नवल नाही. ते कधीच कुणावर रागावत नाहीत, मग मुलांना ते मित्रासारखेच वाटणे स्वाभाविक आहे.

अप्पासाहेबांना दोन मुली आणि एक मुलगा; त्यांपैकी अदिति ही गिर्यारोहणपटु म्हणून सुप्रसिद्ध आहे; ती आता ग्लायडर पायलटही झाली आहे. तिच्या पाठीवरचा अनिकेत कॉलेजात शिकत असून धाकटी अवलोकिता ७ वर्षांची आहे. त्या सर्वांना घेऊनच अप्पासाहेब आज नॉर्वेला निघत आहेत. ते ज्या ज्या देशांत गेले, तेथे तेथे त्यांनी केवळ भारताच्या शासनाचेच प्रतिनिधित्व केले नसून भारतीय संस्कृतीची आणि तत्त्वज्ञानाची तेथील लोकांना ओळख करून देऊन त्याविषयी आदर निर्माण करण्याचे कार्य केले आहे. भारताबद्दल त्यांना अत्यंत अभिमान; त्यामुळे त्यांनी इतरांना आपल्यासारखे केले. ते स्वतः इतरांसाठी बदलले नाहीत. इंडोनेशियन भाषेतील त्यांचे साष्टांग नमस्कारावरील पुस्तक आता प्रसिद्ध झाले असेल. त्यात त्यांची स्वतःची आणि अदितीची नमस्कार समजावून सांगणारी छायाचित्रे आहेत. नॉर्वेमधील त्यांचे वास्तव्य लेखनाला पोषक होऊन त्यांचे हातून ग्रंथद्वाराही मोलाची कामगिरी घडेल, ह्यात संशय नाही. " अप्पासाहेब सध्याच्या नोकरीत नसते, तर ते काय झाले असते ? " असा प्रश्न मी नलिनीदेवींना विचारला, तेव्हा त्या तात्काळ म्हणाल्या, " पंतऐवजी संत म्हणून ते ओळखले गेले असते ! " गूढवादाच्या त्यांच्या ओढीला अधिक वेळ मिळाला, तर हवा आहे. • • •

# नाझी

१९६० च्या ऑगस्टमध्ये प्रसिद्ध झालेल्या ज्या पुस्तकाच्या पहिल्याच वर्षात चौदा मोठाल्या आवृत्त्या निघाल्या, पुढे दरवर्षी अनेक भाषांतून लक्षावधी प्रतींची ज्याची पुनर्मुद्रणे आजवर प्रसिद्ध होत आली, त्या

THE RISE AND FALL OF THE THIRD REICH

या

WILLIAM L. SHIRER

यांच्या पुस्तकावर आधारित

## रा. म. शास्त्री

यांची ही लेखमाला या अंकापासून सुरू होत आहे. नाझी जर्मनीचा व हिटलरच्या उदयास्ताचा सत्य इतिहास कथन करणारे हे दीड हजार पृष्ठांचे प्रचंड पुस्तक शास्त्रींनी परिचयासाठी यावेळीच का निवडले, हे सुज्ञांस विस्ताराने सांगण्याची अवश्यकता नाही.

हिटलरने आरंभलेल्या दुसऱ्या महायुद्धाला यावर्षी पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत हे केवळ एक निमित्त. यापेक्षा महत्त्वाचे कारण हिटलरपूर्व जर्मनी व आजचा भारत यांच्या परिस्थितीत शास्त्रींना आढळणारे विलक्षण साम्य—

तीच भीषण महागाई, तीच बेकारी;

तीच विषमता, तोच भ्रष्टाचार;

तीच अमेरिकन व इतर परकीय भांडवलावर पोसली जाणारी फसवी शहरी सुबत्ता;

शत्रुराष्ट्रांकडून भारताची चालू असलेली तीच सततची मानखंडना;

समतोल, पुरोगामी, लोकशाही नेतृत्वाचा तोच पडखाऊ नेभळटपणा;

घटनादुरुस्तीच्या मार्गाने प्रचलित राज्यकर्त्यांची हुकुमशाही राजवटीकडे चालू असलेली तीच वाटचाल...

*

जगातील आदर्श लोकशाही घटना अस्तित्वात होती,

प्रजासत्ताक, लोकसभा, निवडणुका हा सर्व लोकशाहीचा सरंजाम उभा होता,

तरीही, अगदि लोकशाही मार्गाने निवडणुका जिंकूनच, हिटलर जर्मनीचा हुकुमशहा झाला.

## का ? कसा ?

थोडक्यात, चार पानांच्या लेखात हे सर्व आपल्याला जिव्हाळ्याचे व नजीकच्या काळात निकडीचे वाटणारे महाभारत सांगणे अशक्य होते. म्हणूनच प्रदीर्घ लेखमालेचा हा प्रपंच. वाचक उत्सुकतेने या लेखमालेचे स्वागत करतील, इतकेच नव्हे तर आपली प्रतिक्रिया पत्ररूपाने ते ' माणूस 'कडे लिहून कळवतील अशी आशा आहे. –सं.

# भस्मासुराचा उदयास्त



: १ :

२६ फेब्रुवारी १९२४ रोजी म्युनिक येथे बव्हेरियातील सत्ता उलथवून टाकण्याचा कट केल्याच्या आरोपाखाली तीन प्रमुख बंडखोरांवर खटला सुरू झाला. जर्मनीतील आणि जगातील सर्व प्रमुख वृत्तपत्रांचे प्रतिनिधी या खटल्याचा वृत्तांत घेण्यासाठी म्युनिकला जमले होते. तीन आरोपी कोर्टात हजर होते ते म्हणजे जनरल लुडेन्डोर्फ, अॅडॉल्फ हिटलर आणि रोएम. हर्मन गोअरिंग आणि रुडॉल्फ हेस हे दोघे ऑस्ट्रियात पळून गेले असल्यामुळे त्यांची नावे फरारींच्या सदराखाली नोंदण्यात आली होती. न्यायाच्या कामाला सुरुवात होताच हिटलरने न्यायालयाला सांगितले--

"झालेल्या घटनेची सर्व जबाबदारी माझी एकटयाची आहे. असे असले तरी मी केलेली गोष्ट ही दुष्कृत्यात जमा होऊच शकत नाही. १९१८ साली ज्यांनी जर्मन देशाशी हरामखोरी केली त्यांच्याविरुद्ध उठावणी करणे हा देशद्रोह कसा असू शकेल ?"

ज्या घटनेची जबाबदारी केवळ आपली आहे असा दावा हिटलरने मांडला ती घटना घडून आता चार महिने उलटून गेले होते. ८ नोव्हेंबर १९२३ ला 'बिअर हॉल' इमारतीत जनरल काहर सुमारे तीन हजार लोकांपुढे भाषण करीत असताना नाझी स्वयंसेवकांनी

इमारतीला गराडा दिला व हिटलरने आत घुसून व्यासपीठाचा कबजा घेतला. त्यापूर्वी हातातले रिव्हॉल्व्हर त्याने तक्तपोशीच्या दिशेने झाडून सर्वांचे लक्ष वेधून घेतलेले होते. व्यासपीठावरून हिटलरने गर्जना केली होती.—

"सहाशे सशस्त्र स्वयंसेवकांनी इमारतीला गराडा दिलेला आहे. बव्हेरिअन सरकार आम्ही बडतर्फ केले असून लवकरच क्रांतिकारकाचे सरकार स्थापन होत आहे. सैन्याच्या पोलिसदलाचा पाठिंबा क्रांतिकारकाना असून दोन्ही दले म्युनिकच्या दिशेने वाट चालू लागलेली आहेत–"

हॉलमध्ये गोधळ उडाला. बाहेर जाण्यासाठी पळापळ सुरू झाली. परतु कुणालाच बाहेर जाता येईना, गोअरिंग व हेस् यानी बाहेर जाण्याच्या वाटा रोखलेल्या होत्या. व्यासपीठाच्या मागच्या खोलीत जनरल लुडेन्डॉर्फ, हिटलर, जनरल काहर, लॉसॉव्ह आणि सिसेर याची बोलणी चालली होती. लुडेन्डोर्फ आणि हिटलर यानी रिव्हॉल्व्हरच्या दबावाखाली उरलेल्या तिघाना, बडखोराना पाठिंबा देण्यास भाग पाडले होते.

हिटलरने पुन्हा व्यासपीठावरून घोषणा केली––

"पाच वर्षापूर्वी युद्धातील जखमामुळे दृष्टीवर परिणाम झाल्यामुळे आंधळा होऊन मी मिलिटरी हॉस्पिटलमध्ये पडलो असताना मनोमन अशी प्रार्थना केली होती, की जोपर्यंत नोव्हेंबर १९१८ मध्ये जर्मनीचा घात करणाऱ्या देशद्रोह्याची सत्ता उलथली जाऊन, जर्मन देशाच्या राखरांगोळीतून पुन्हा एकदा स्वतत्र आणि महान् शक्तिशाली असा जर्मनी उभा होत नाही, तोपर्यंत मन शाती नाही...विश्रांती नाही ! या शुभप्रतिज्ञेला आज आकार येण्यास सुरुवात होत आहे."

परतु हिटलरचा अदाज कोसळला. बिअर हॉलमधून बाहेर पडताच लॉसॉव्ह, काहर व सिसेर यांनी हिटलरला आपला पाठिंबा नसल्याचे जाहीर केले व राज्ययत्राचे हे तीन नेते बडाशी निमकहराम होताच हिटलरची ही उठावणी आत्मघातक ठरली. असे असले तरी हिटलर एक गोष्ट जाणून होता की सगळ्या जगाचे लक्ष या खटल्याने वेधून घेतलेले आहे. जर जर्मनीतील हा नवीन आवाज जगभर उठवायचा असेल तर हा खटला ही एक सुवर्णसधी आहे. या खटल्याच्या निमित्ताने हिटलर प्रथमच प्रकाशात येत होता. आणि हा खटला गाजवून त्याने आपल्या नावाभोवती एक मोठे तेजोवलयच निर्माण करून घ्यायचे ठरवले होते.

न्यायाधीशाना उद्देशून केलेल्या भाषणात हिटलरने बजावले—

"It is not you, gentlemen, who pass judgement on us. That judgement is spoken by the eternal court of history. You may pronounce us guilty a thousand times over; but the goddess of the eternal court of history will smile and tear to tatters the brief of the state prosecutor and the sentence of the Court . For she acquits us."

[आमचा न्याय करणारे तुम्ही कोण ? इतिहासाच्या स्वयसिद्ध न्यायदेवतेने हा न्याय केव्हाच करून ठेवला आहे. तुम्ही आम्हाला हजारो वेळा दोषी म्हणून सुखेनैव घोषित करा. परंतु इतिहासदत्त न्यायदेवता, सरकारी वकिलाने आमच्यावर दाखल केलेल्या आरोपपत्राचे उपहासाने फाडून तुकडे तुकडे केल्याशिवाय राहणार नाही. या कोर्टाने दिलेल्या शिक्षांनाही ती न्यायदेवता केराची टोपली दाखवील यात शंका नाही. कारण तिच्या लेखी आम्ही कसलाही गुन्हा केलेला नाही."]

कोर्टाचा निकाल जाहीर झाला. लुडेन्डॉर्फला निर्दोषी ठरवण्यात आले. हिटलरला ५ वर्षांची शिक्षा झाली. १–४–१९२४ ला हिटलरची लॅंड्स्बर्ग तुरुंगात रवानगी झाली. फरारी झालेला हेस पोलिसात दाखल होताच त्यालाही हिटलरच्या कोठडीत ठेवण्यात आले. लेश (Lech) नदीच्या काठावरील लॅंड्स्बर्गच्या किल्ल्यात हिटलर कोंडला गेला. परंतु कोडला जाण्यापूर्वी हिटलर हे नाव बव्हेरियाभर अनेकांना अत्यत पूज्य असे नाव झाले. जगाला या नावाची पहिली वहिली ओळख झाली. पुढची वीस वर्षे जगाचे नकाशे उलथेपालथे करणाऱ्या ॲडॉल्फ हिटलरचा हा पहिला आदाब अर्ज होता हे त्यावेळी कुणाच्या ध्यानी-मनीही आले नसेल.

आपल्याला काय करावयाचे आहे याची निश्चित योजना तयार करण्याच्या प्रयत्नाला आता हिटलर लागला. त्याने हेसला आपले मनोगत शब्दांकित करण्यास सांगितले. लॅन्ड्स्बर्ग तुरुगात हिटलर सांगू लागला आणि हेस लिहून घेऊ लागला. पुढच्या वीस वर्षांत ॲडॉल्फ हिटलरने जे जे काही केले त्याचा खडा न् खडा आराखडा तो आताच सांगत होता......

पुस्तकाचा विषय होता......


'माझा लढा !' (Mein Kampf)

* *

### ग्रंथाचे प्रयोजन

हिटलरच्या जयाचा आणि अपजयाचा साद्यत इतिहास सांगणारे प्रचंड पुस्तक वुइल्यम शिरर याने लिहून प्रसिद्ध केले आहे. सुमारे दीड हजार पानाच्या या पुस्तकात त्याने एकही गोष्ट अदाजाने किंवा पदरची घुसडलेली नाही. शिरर हा स्वतः पत्रकार म्हणून हिटलरच्या उदयाच्या कालात जर्मनीत वावरत होता. हिटलरच्या अनेक सभा त्याने स्वतः पाहिलेल्या आहेत. जवळजवळ सगळ्या नाझी पुढाऱ्याना त्याने प्रत्यक्ष जवळून पाहिलेले आहे. परंतु नाझी सत्तेचा इतिहास सांगणे मुख्यतः काहीसे सोपे झाले त्याला कारण म्हणजे १९४५ साली झालेला हिटलरचा पराभव ! हा पराभव इतक्या झपाट्याने झाला की महत्त्वाचे आणि गुप्त समजले जाणारे कागदपत्र नाहीसे करणेही नाझी अधिकाऱ्यांना शक्य झाले नाही. हेर्मन गोअरिंग याने दूरध्वनीवरून होणारी संभाषणे 'टेप' करून ठेवली होती, ती सर्व संभाषणे, गोबेल्सची दैनंदिनी, जनरल हालदेर याने १४–८–३९ ते २४–९–४२ पर्यंत लिहिलेले सर्व घटनाचे विस्तृत वृत्तात हे या कागदपत्रात सापडले.

जवळ जवळ ४८५ टन वजनाचे हे नाझी कागदपत्र, फायली, पत्रव्यवहार अमेरिकन सैन्याने नष्ट होऊ न देता वाचवले व तो सर्व गठ्ठा एकत्र करून अलेक्झांड्रिया व व्हर्जिनिया या दोन ठिकाणी मोठाल्या वखारीतून व्यवस्थित पेटचामध्ये ठेवून दिला होता. १९५५ साली हे कागदपत्र जर्मनीला परत करण्यापूर्वी त्यातील माहिती काढून घेण्याची परवानगी अमेरिकन हिस्टरी ॲसोसिएशनला–अमे-



बिअर हॉलची उठावणी चोवीस तासांतच कोसळली. दुसऱ्या दिवशी सकाळी ( ९ नोव्हेंबर १९२३) निघालेल्या नाझी मोर्चावर बव्हेरियन सरकारच्या पोलिसांनी गोळीबार केला. हिटलरचे १६ साथीदार त्यात मृत्युमुखी पडले. अनेक जखमी झाले. हिटलरने जखमी स्थितीतच पळ काढला.

पण चॅन्सेलर झाल्यावर हिटलरने या प्रसंगाला हौतात्म्याचे वलय चढवले. या प्रसंगाचा ११ वा वार्षिक दिन त्याने नाझी पक्षनेत्यांच्या समवेत लष्करी गणवेशात त्याच मार्गावरून संचलन करून मोठ्या गांभीर्याने साजरा केला. त्या ऐतिहासिक संचलनाचे दृश्य. हिटलरच्या उजव्या हातास गोअरिंग.

★

रिकन सरकारला दिली. याच माहितीवरून न्यूरेम्बर्ग येतील खटल्या-करता पुरावा गोळा करण्यात आला होता. सतत पाच वर्षे खपून वुइल्यम शिरर याने १९६० साली प्रस्तुत इतिहासाचे प्रचंड काम पुरे केले.

इतिहासलेखनाची कल्पना शिरर याने एकदा फरान्समध्ये बोलून दाखवली तेव्हा विद्वान इतिहासतज्ञांनी त्याला बजावले, " Nothing more recent than Nepoleonic era should be tackled by writers of history ".

[ छः छेः फार फार तर नेपोलियनच्या काळापर्यंतच इतिहास-लेखनाचा प्रयत्न आजच्या अभ्यासकाने करावा. ]

याचा अर्थ असा की इतिहासलेखन हे फार काळजीपूर्वक झाले पाहिजे. पन्नास पाऊणशे वर्षे उलटल्याखेरीज नाझी सत्तेचा इतिहास लिहिणे योग्य नाही असे इतिहासकारांचे मत होते. असे असूनही शिरर याने हा जो इतिहासलेखनाचा निर्णय घेतला त्याचे कारण त्याच्या मते, पन्नास पाऊणशे वर्षे सर्व प्रकारचे कागदपत्र उपलब्ध नसतील तरच थांबणे आवश्यक आहे......जर नाझी सत्तेचा साद्यंत इतिहास लिहिण्याइतके कागद सुदैवाने आजच उपलब्ध आहेत आणि शिवाय जर लेखकाला या कालखंडातील सर्व प्रमुख घटनांची प्रत्यक्ष ओळख आहे तर पन्नास वर्षे इतिहासलेखन थांबवणे आवश्यक नाही. शिरर प्रस्तावनेत सांगतो—

" With such incomparable sources so soon available and with the memory of life in Nazi Germany and of the appearance and behaviour and nature of men who ruled it, Adolf Hitler, above all, still fresh in my mind and bones, I decided at any rate to make an attempt to set down the history of the rise and fall of the third Reich ".

लँड्स्वर्गच्या तुरुंगात बसून हेसला आपल्या पुढल्या योजनेचा आराखडा सांगणारा हा अँडॉल्फ हिटलर होता तरी कोण ? १९१८ च्या राखेतून बलाढ्य जर्मनी त्याने उभा कसा केला ? त्याच्या ज्यू-द्वेषाला काही अर्थ होता की नाही ? हा सगळा इतिहास केवळ मनोरंजक नाही तर भारताच्या आजच्या परिस्थितीत तो सर्व जाणत्या माणसाना ठाऊक असणे आवश्यक आहे. १९२५ साली कुणी जर्मनीत गेला असता तर त्याला जे चित्र दिसले असते ते चित्र आणि आजचे भारताचे चित्र यात केवढे साम्य आहे पहा—

The year from 1925 until the coming of the depression in 1929 were lean years for Adolf Hitler and the Nazi movement, but it is a measure of the man that he persevered and never lost hope or confidence. He was confident that the good times would not last. So far as Germany was concerned, they depended not on her strength but on that of other – of America above all, from whose swollen coffers–loans were pouring in, to make and keep Germany prosperous. The states, cities, and municipalities borrowed to finance not only needed improvements but building of airfields, theatres, sport stadiums and fancy swimming pools. Industry borrowed billions to retool and to rationalise its productive process. The lower middle classes, all the millions of shop-keepers and small salaried folk on whom Hitler had to draw for his main support, shared in the general prosperity......

[१९२५ पासून तो १९२९ मध्ये चलनफुगवटा होऊन आलेल्या काळापर्यंतचा काळ, हा अँडॉल्फ हिटलर व त्याची नाझी संघटना यांना फारसा अनुकूल नव्हता. असे असूनही हिटलरचा आत्मविश्वास किंवा आशा यत्किंचितही कमी झाली नाही. त्याने आपल्या संघटनेचे काम या कालातही जारी ठेवले, ही गोष्ट त्याच्या जिद्दीची आणि धूर्ततेची खात्री पटवणारी आहे. हिटलरला ही खात्री होती की हे सुबत्तेचे चांगले दिवस फार काळ टिकणारे नाहीत. जर्मनी हा या कालात स्वत च्या बळावर अवलंबून न राहता अमेरिकेच्या भांडवलावर जगू पहात होता. अमेरिकेच्या फुगलेल्या तिजोऱ्यामधून कर्जाच्या रूपाने पैसा जर्मनीत ओतला जात होता. राज्यसरकारे, शहरे, म्युनिसिपालट्या यांनीही अमेरिकेकडून कर्जे घेण्याचा धडाका लावला होता. कर्जे कशाकरता ? फक्त आवश्यक गोष्टीकरता नाही तर ज्या गोष्टी देशात नसल्या तरी बिघडत नाही अशा गोष्टीसाठी कर्जे काढली जात होती. गावाजवळ विमानतळ हवा, नाटकगृहे हवीत, खेळाचे स्टेडियम हवेत--- जवळ पैसा नसताना या हौसा अमेरिकेच्या पैशावर भागवल्या जात होत्या. सर्व जर्मन कारखानदारी तर अमेरिकन भांडवलदारांच्या कवजात गेली होती.

गरीब मध्यमवर्ग, लाखो लहानसहान दुकानदार, कमी पगारावर जगणारी कारकून मंडळी ही सर्व या दिवाळखोरीत भागीदार झालेली होती... आणि नेमके हेच तीन वर्ग नाझी संघटनेचे आधार होते–]

* *

## आईबाप, बहीणभाऊ

'माझा लढा' या पुस्तकात अँडोल्फ हिटलर आपले स्वत चे चरित्र फारसे सांगत नाही. परतु जगाला हादरे देणाऱ्या या धाडसी पुरुषाचे चरित्र बाळपणापासून जाणून घेतल्याखेरीज त्याच्या कर्तृत्वाचे योग्य ते निदान करता येणार नाही.

२० एप्रिल १८८९ या दिवशी बव्हेरियाच्या सरहद्दीवरील ब्राउनाउ अँम इन ' (Braonau am Inn) या गावी अँडॉल्फचा जन्म झाला. तो आपल्या बापाच्या तिसऱ्या लग्नसबंधापासून झालेला तिसरा मुलगा. अँडॉल्फचा बाप अँलॉइस हिटलर हा एक कस्टम अधिकारी होता. हिटलर हे नाव हाइडलेर या नावाचा अपभ्रश होय. अँलॉइसचा बाप जॉन जॉर्ज हा हाइडलेर असे नाव लावीत असे. जॉन हाइडलेरला अँलाइस हा मुलगा झाला. त्यावेळी त्याचे अँलॉइसच्या आईशी म्हणजे मारियाशी लग्न झालेले नव्हते. अँलॉइसच्या जन्मानतर ८–१० वर्षांनी जॉन हाइडलेरने अँलॉइसच्या आईशी लग्न केले. म्हणजे म्हटले तर अँलॉईस हे औरस अपत्य होते आणि म्हटले तर नव्हते ! मारिया १८४७ मध्ये मरण पावली व जॉन हाइडलेर हा बेपत्ता झाला ... तो पुढे त्याच्या वयाच्या ८४ व्या वर्षी म्हणजे तीस वर्षांनतर पुन: अँलॉईसचा शोध करीत आला. मध्यतरीच्या काळात अँलॉईस हाइडलेरचे रूपान्तर अँलॉईस हिटलर असे झालेले होते.

अँलॉईसचे आई-वडील लग्नापूर्वी किंवा लग्नानंतर कधीच एकत्र फारसे राहिले नसल्यामुळे अँलॉईसचा सभाळ त्याच्या चुलत्याने केला. हा चुलता 'हाइडलेर' ऐवजी' हुएट्लर असे नाव लावीत असे. अर्थातच अँलॉईसही आपले नाव अँलॉईस हुएटलर असे लावू लागला व या नावाचे नक्की रूप शेवटी हिटलर असे झाले.

अँलॉईस प्रथम चामारकाम शिकला. परतु त्यात त्याचे मन रमेना तेव्हा तो आपले नशीब काढण्यासाठी व्हिएन्ना येथे आला. तिथे मात्र त्याला कस्टम खात्यात नोकरी मिळाली. त्याची पहिली दोन लग्ने चटकन् आटोपली. पहिलीला मूल होईना म्हणून त्याने घटस्फोट घेतला व दुसरीला अँलॉईस नावाचाच मुलगा व अँजेला नावाची एक मुलगी झाल्यावर क्षयरोगाने दुसरी बायकोही मरण पावली.

दुसऱ्या बायकोच्या निधनाच्या वेळी अँलॉईसचे वय ४८ वर्षांचे होते. दुसरी बायको क्षयाने आजारी असताना त्याने आपली एक चुलत बहीण क्लारा हिला घरकाम करण्याकरता आपलेकडे आणलेली होती...या क्लाराशीच त्याने तिसरा विवाह केला. क्लारा ही नवऱ्यापेक्षा १८ वर्षांनी लहान होती. ७–१–१८८५ रोजी हा विवाह झाला. या विवाहापासून अँलॉईसला पाच अपत्ये झाली. पहिली दोन लहानपणीच मरण पावली. आणि तिसरे अपत्य म्हणजे अँडॉल्फ हिटलर होय ! हिटलरला एडमड व पॉल असे आणखी दोन भाऊ झाले. यातला एडमड वयाच्या सहाव्या वर्षीच मेला व शेवटचा पॉल याने मात्र हिटलरचा अस्तही पाहिला.

हिटलरच्या बापाच्या दुसऱ्या बायकोची मुले–अँलॉरेस व अँजेला ही दोघेही हिटलरबरोबरच वाढली. यापैकी अँजेला ही १९२८ मध्ये बेरेख्टगाडन येथे हिटलरबरोबर राहण्यासाठी आली व तेथे ती आठ वर्षे होती. १९३६ साली हिटलरच्या मर्जीविरुद्ध पुन: विवाह करून



**मुलाचे पाय पाळण्यात दिसत असते तर !**
**हिटलर– जन्म २० एप्रिल १८८९**

ती हिटलरला सोडून गेली. अँजेलाला पहिल्या विवाहापासून झालेली मुलगी गेली राउबल (Geli Raubal) ही अतिशय देखणी होती. हिटलरला तिच्याविषयी आकर्षण वाटून त्याचे प्रेमांत रूपान्तर झाले. तिचा उल्लेख पुढील निवेदनात येणार असल्यामुळे ही माहिती येथे दिलेली आहे.

हिटलरचा भाऊ अँलॉईस हा पुढे बर्लिनच्या एका उपनगरात बीअरचे दुकान चालवू लागला. या दुकानात नाझी पुढाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर ऊठबस असे. अर्थातच पत्रकारांना याचा वास असल्यामुळे शिरर हा स्वतः अनेक वेळा या बिअरच्या दुकानात जाऊन बसत असे. शिररने अॅलॉईसमार्फत हिटलरची माहिती काढण्याचा अनेक वेळा प्रयत्न केला. परंतु अॅलॉईस हिटलरबाबत काहीही सांगण्यास वा बोलण्यास तयार नसे. शिरर लिहितो–

" Alois himself refused to be drawn into any talk whatsover about his half brother– a wise precaution but frustrating to those of us who were trying to learn all we could about the background of the man, who, by that time, had already set out to conquer Europe. "

अॅडॉल्फ अवघा सहा वर्षांचा असताना त्याचा बाप कस्टमच्या नोकरीतून अठ्ठावन्नाव्या वर्षी निवृत्त झाला. लिंत्स जिल्ह्यांत तो दर वर्ष दोन वर्षांनी आपले बिऱ्हाड बदलत राहिला. अॅडॉल्फ पंधरा वर्षांचा होईपर्यंत सात वेळा त्याने शाळा बदलल्या. अखेर ' लिओन्डिंग ' (Leonding) या खेड्यात त्याच्या नावाने घर घेतले व भटकते आयुष्य संपुष्टात आले.

## इतिहासप्रेमाचे बीजारोपण

अॅडॉल्फ आता लिंत्स येथील हायस्कुलात जाऊ लागला. त्याच्या बापाची इच्छा अॅडॉल्फने आपल्याप्रमाणे शिकून सरकारी अधिकारी व्हावे अशीच होती. मात्र सरकारी अधिकारी व्हावे असे अॅडॉल्फला वाटत नव्हते. आपल्या ' माझा लढा ' या पुस्तकात हिटलरने आपल्या त्या वेळच्या मनःस्थितीचे वर्णन केलेले आहे.

" I did not want to become a civil servant, no and again no. All attempts on my father's part to inspire me with love or pleasure in his profession by stories from his own life accomplished the exact opposite. I grew sick to my stomach at the thought of sitting in an office, being compelled to force the content of my whole life into paper forms that had to be filled out. "

[ मला सनदी नोकर व्हायचे नव्हते–मुळीच नव्हते ! माझे वडील सरकारी नोकरीतील त्यांच्या आयुष्यातल्या अनेक गोष्टी सांगून अशा नोकरीविषयी माझ्या मनात प्रेम व आकर्षण निर्माण व्हावे असा प्रयत्न करीत. परंतु त्याचा नेमका उलटा परिणाम माझ्यावर होत असे. सर्व आयुष्य एका सरकारी कचेरीत कागदी तक्ते भरण्यात फुकट घालवावयाचे हा विचार मनात आला की मला कळमळू लागे ... ]

शाळेला रामराम ठोकून, नाझी चळवळीचे नेतृत्व करून या उद्योगात बंड फसल्यामुळे लँड्स्बर्ग तुरुंगात डांबलेला असताना अॅडॉल्फ हिटलरने आपल्या लहानपणीच्या निश्चयाविषयी इतक्या आत्मविश्वासाने लिहावे ही गोष्ट लक्षात आली की खरोखरीच त्याच्या आत्मविश्वासाचा अचंबा वाटतो. बंड फसलेले, समोर सर्वत्र अंधार, असे असताना आपल्या आयुष्याने जे वळण घेतले त्याच्या कडा न् कडा तितक्याच विश्वासाने जोपासणाऱ्या अॅडॉल्फविषयी कुणालाही कौतुकच वाटेल. पुढे जर्मनीचा सत्ताधारी झाल्यानंतर हिटलरने आपल्या बालपणाविषयी असे लिहिले असते तर त्याला फारसा अर्थ नव्हता–कारण यश मिळाल्यानंतर त्याच्या अनुषंगाने बालपण रेखाटण्याचा उद्योग अनेक महाभाग करीत असतात. परंतु अॅडॉल्फने हे लिहिले तेव्हा त्याच्यापुढे भविष्यकाल असा नव्हताच. होता तो फक्त स्वतःच्या कर्तृत्वाबद्दल विश्वास !

आपल्या शिक्षकाविषयीही हिटलरचे मत फारसे चांगले नव्हते. याला अपवाद एका शिक्षकाचा होता. हा शिक्षक म्हणजे डॉ. लिओपोल्ड पोएट्श् (Leopold Poetsch) हा होय. इतिहास हा त्यांचा विषय. या शिक्षकाचा गौरव करताना हिटलर म्हणतो–

" It was perhaps decisive for my whole later life that good fortune gave me a history teacher, who understood, as few others did the principle of retaining the essential and forgetting the non-essential. In my teacher, Dr. Leopold, this requirement was fulfilled in a truly ideal manner. Even to day I think back with genuine emotion on this gray-haired man who, by the fire of his words sometimes made us forget the present, who, as if by magic transported us into times past and transformed dry historical facts into vivid reality. There we sat often aflame with enthusiasm sometimes even moved to tears–! "

[ माझे खरोखरच मोठे सद्भाग्य होय की मला जो इतिहासशिक्षक

लाभला तो अत्यंत ज्ञानी होता. त्यानेच माझ्या आयुष्यावर कायमचा परिणाम घडवून आणला. त्यांना हे निश्चित माहित होते की जे ज्ञान आवश्यक आहे तेवढेच साठवले पाहिजे. आणि अनावश्यक ते फेकून दिले पाहिजे. माझे इतिहासाचे शिक्षक डॉ. लिओपोल्ड यानी हे शिक्षणाचे महत्त्वाचे सूत्र चागलेच पचवलेले होते. आज देखील या पाढरे केस झालेल्या शिक्षकाची मूर्ती माझ्या डोळयासमोर आली की-त्या आठवणीनें माझे डोळे पाणावतात. आपल्या जळजळीत वक्तृत्वाने ते हां हां म्हणता वर्तमानातून आम्हाला इतिहासकाळात खेचून नेत असत. आणि ज्या घटना कोरडेपणाने इतिहासात नमूद झालेल्या असत त्या निमिषार्धांत वास्तव रूप देऊन आम्हाला गुगवून टाकू लागत. उत्साहाने आम्ही मुले ऐकत बसलेले असू. आमची मने देशभक्तीने पेटलेली असत आणि अनेकदा आमच्या डोळयातून अश्रुधारा सुरू झालेल्या असत. ]

पस्तीस वर्षांनतर म्हणजे १९३८ साली जेव्हा हिटलरने ऑस्ट्रियाचा कबजा घेतला तेव्हा तो ऑस्ट्रियाच्या दौऱ्यावर आला होता. त्याला कळले की डॉ. लिओपोल्ड हे 'क्लॅगेनफुर्ट' येथे राहतात. आपल्या या शिक्षकाला भेटण्यासाठी हिटलर स्वतः त्यांच्या घरी गेला. हिटलर व लिओपोल्ड हे दोघेच एकांतात तासभर जुन्या आठवणी काढीत बोलत होते. हिटलर डॉ. लिओपोल्ड याना भेटून खोलीबाहेर आला व आपल्या सहकाऱ्याना म्हणाला— "You cannot imagine how much I owe to that old man..." आपल्या इतिहास-शिक्षकाला नम्रपणे भेटून हिटलरने आपल्या सहकाऱ्यांच्या मनात एकच महत्त्वाची गोष्ट बिंबवली. आपला इतिहास वाचावा, तर देश वाचेल !

### शाळा सुटली, गाव सोडले

हिटलरचा बाप ३ जानेवारी १९०३ ला 'लग हेमरेज'ने मृत्यू पावला. हिटलर यावेळी फक्त तेरा वर्षांचा होता व त्याच्या आईचे वय ४२ होते. आपल्या दोन मुलांना घेऊन ॲडॉल्फची आई लिंत्स जिल्ह्यातच एका खेडेगावी राहू लागली. या गावाचे नाव होते उरफार (Urfahr). खेडेगावातील राहणी थोडी स्वस्ताईची असल्यामुळे तिने हा मार्ग पत्करला. ॲडॉल्फने व पॉलने शाळेंत जावे यासाठी ती कष्ट करण्यास तयार होती. परंतु या सुमारास ॲडॉल्फ आजारी पडला. त्याचा आजार हा त्याच्या वडिलांच्या आजाराच्या वळणावर जाण्याची धास्ती असल्यामुळे डॉक्टरानी एक वर्षभर त्याला शाळा सोडण्याचा सल्ला दिला. ॲडॉल्फला हे फारच आवडले. त्याच्या आईने आपल्या वहिणीकडे त्याला हवापालटासाठी पाठवले. शाळेत जाणे बंद होणार या कल्पनेने ॲडॉल्फला इतका आनंद झाला की त्या दिवशी प्रथमच त्याने मद्यप्राशन केले! झिंगून तो रस्त्यावर पडला व दुधाचा धंदा करणाऱ्या एका स्त्रीने त्याला सकाळी घरी आणले. आपल्या या मद्यप्राशनाची ॲडॉल्फला इतकी शिसारी आली की पुन्हा मद्याला स्पर्श न करण्याची त्याने प्रतिज्ञा केली. त्याने केवळ मद्यच नव्हे तर तबाखूसेवन व मांसाशनही वर्ज्य केले. त्याला कोणतेही व्यसन ग्रासू शकले नाही. शिरर लिहितो—

"In this matter at least he was as good as his word, for he became a tee-totaler, a non-smoker and a vegetarian..."

जगाला युद्धाच्या खाईत लोटणारा आणि रक्ताचे पाट वाहवणारा हा हिटलर मद्य, मासाशन आणि तबाखूसेवन या व्यसनांपासून संपूर्णपणे अलिप्त होता ही गोष्ट विश्वसनीय वाटत नसली तरी संपूर्णपणे सत्य आहे.

शाळा सुटल्यानतर पुढची दोनतीन वर्षे ॲडॉल्फने फक्त विचार करण्यात आणि भटकण्यात घालवली. घरात विधवा आईची इच्छा त्याने कामधंदा करून चार पैसे जोडावेत अशीच असताना, ॲडॉल्फला मात्र नोकरी करण्याची कल्पनाच सहन होत नव्हती. आपण चित्रकार व्हावे, कलावंत म्हणून जगावे असे त्याला अधूनमधून वाटत असे. परतु वयाच्या पधराव्या सोळाव्या वर्षापासूनच डॉ. लिओपोल्डने केलेल्या इतिहासाच्या सस्कारामुळे त्याचे मन आपल्या देशाचा विचार करण्यात मग्न होऊ लागले. जे जे म्हणून जर्मन आहे त्याविषयी त्याला विलक्षण प्रेम आणि ज्या जर्मनवशाशी एकरूप न झालेल्या जाती देशात वावरत होत्या त्याचा अतोनात तिरस्कार; या दोन जबरदस्त भावनानी तो भारला गेला होता.

या रिकामपणच्या अवस्थेत त्याने वाचनाचा ध्यास घेतला. जर्मनीचा इतिहास आणि पुराणे या दोन गोष्टीचे वाचन त्याने मोठ्या प्रमाणावर सुरू केले. लिंत्स येथील पुस्तकालयातून या विषयावरील पुस्तके वाचण्याचा त्याने धडाका लावला.

या दोन वर्षांत त्याने व्हिएन्ना येथील 'ॲकेडेमी ऑफ फाईन आर्ट्स्' या सस्थेत प्रवेश मिळवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याला प्रवेश मिळू शकला नाही. 'स्कूल ऑफ आर्किटेक्चर'कडे तो गेला. शालेय शिक्षण अपुरे असल्यामुळे तेथूनही नकार मिळाला.

इतराची आयुष्ये ॲडॉल्फकरता थोडीच थांबणार होती ! त्याच्या वडिलाच्या मृत्यूनतर तीन वर्षे त्याच्या आईने व आईच्या नातेवाईकांनी ॲडॉल्फला पैसा पुरवला. परतु २१-१२-१९०८ या दिवशी लिंत्स शहर ख्रिसमस्च्या आनदात मग्न होत असतानाच त्याची आई कॅन्सरच्या विकाराने निधन पावली. हिटलर पोरका झाला.

आईच्या मरणाचा ॲडॉल्फवर फार परिणाम झाला. स्वतःचे पोट स्वतः भरले पाहिजे ही जाणीव आता त्याला झाली. परंतु आता इतकी वर्षे कसलाही उद्योग केलेला नसताना आता एकदम पोटाचा उद्योग सापडणार कसा ? आई लवकरच मरणार आहे याची पूर्वसूचनाही हिटलरला मिळाली नव्हती. कॅन्सरसारख्या रोगाने तिचा पाहता पाहता बळी घेतला होता. ॲडॉल्फचे डोळे खाडकन उघडले. त्याने बॅगेत कपडे भरले, नातेवाईकाचा निरोप घेतला आणि बेकार अवस्थेत आपण पुन्हा परत येणार नाही असे आश्वासन देऊन त्याने गाव सोडले. व्हिएन्नाच्या दिशेने तो चालू लागला. यावेळची मन स्थिती सांगताना हिटलरने लिहिले आहे—

"With a suit case full of clothes and underwear in my hand and an indomitable will in my heart, I set out for Vienna. I too hoped to become something—but in no case a Civil Servant..."

[एका हातात सूटकेसमध्ये कपडे भरलेले होते. गंजिफ्रॉक दुसऱ्या हातावरच होता. अन्तःकरणात दुर्दम्य इच्छाशक्ती कोंडलेली होती. माझी पावले व्हिएन्नाच्या दिशेने पडू लागली. मनात आशा होती की मी देखील कुणीतरी होणार होतो ... कोण होणार होतो

हे निश्चित नव्हते. परंतु काही झाले तरी सनदी नोकर होणार नव्हतो हे मात्र निश्चित. ]

### व्हिएन्नातील ‘ काळे ’ दिवस

डॅन्यूब नदीच्या तीरावर व्हिएन्ना म्हणजे द्राक्षांच्या मळ्यांचे माहेरघर. युरोपच्या हृदयात असलेले हे शहर एकेकाळी सर्व राजधान्यांची युवराज्ञी होती. तिथल्या वास्तू, चित्रे, संगीत या साऱ्याच गोष्टी प्रख्यात होत्या. व्हिएन्ना आणि संगीत यांचेतर नाते अजोड झालेले होते. हायडेन, मोत्सार्ट, बेथोवेन, शूबर्ट या सर्व संगीत कलावंतांनी या शहराचा मोठेपणा सतत वाढता राखलेला होता. एखाद्या सुंदर स्वप्नासारखे आयुष्य तेथील लोक घालवीत असत. नृत्यगृहातील मंद तालावरील वॉल्ट्झ् नृत्ये, हलक्या आवाजातील आर्त कुजबुज, कॉफीगृहातील गप्पाष्टकांचे अड्डे, ऑपेरा, नाटके या सर्व गोष्टींनी वातावरण उत्साहाने शिगोशीग भरलेले असे. अर्थात् व्हिएन्नाचा हा एक चेहरा जितका आकर्षक आणि लोभस होता तितकाच त्याचा दुसरा चेहरा–विद्रूप होता.

या शहराच्या आडोशाला अर्धनग्न आणि भुकेले असे हजारो कामगार आपले पोट भरीत कसेतरी जगत होते. अर्थात् व्हिएन्नामध्ये जसजशी कारखानदारी फोफावू लागली तसतसा पैसा हळूहळू शहरातल्या सर्व थरात झिरपू लागला होता. जो बहुसंख्य कनिष्ठ, मध्यम वर्ग होता त्याच्या हातात व्हिएन्नाचे राजकीय जीवन होते. कामगारांची ‘ सोशल डेमोक्रॅट्स् ’ ही संघटना आपली नखे भक्कम रोवून उभी होती. जवळजवळ वीस लाखांच्या या शहरात लोकशाही हळूहळू मूळ धरू लागली होती. सरंजामशाहीचे अवशेष आता गळून पडू लागले होते.

अॅडॉल्फ हिटलरने १९०९ मध्ये व्हिएन्नामध्ये पाऊल टाकले तेव्हा त्या शहराची अशी परिस्थिती होती. कुणाही प्रामाणिकपणे कष्ट करणाऱ्या माणसाला शहरात बऱ्यापैकी रोजगार मिळणे अवघड नव्हते. उच्च शिक्षणाच्या सोयी भरपूर उपलब्ध होत्या.

परंतु अॅडॉल्फने ‘ आर्किटेक्चर स्कूल ’मध्ये प्रवेश मिळवण्याची खटपट केली नाही किंवा एखादी नोकरीही पत्करली नाही. आज हा तर उद्या तो असे अनेक व्यवसाय त्याने करून पाहिले. कधी रस्त्यावरचा बर्फ उचलण्याचे काम करावे व चार पैसे मिळवावेत, कधी गालिचे साफ करावेत, कधी स्टेशनवर हमाली करावी, कधी एखाद्या इमारतीच्या बांधकामाच्या जागी विटा वाहाव्यात असे रोजगारीचे काम तो करीत असे.

याचा परिणाम असा झाला की व्हिएन्नात एक वर्ष झाले तरी स्वतःची खोली ठेवण्याची ऐपतही अॅडॉल्फला आली नाही. उलट असलेली स्वतःची खोली घालवून निराधारांच्या निवासात किंवा सार्वजनिक अन्नछत्रात तो दिवस घालवू लागला. निराधारांचे हे निवास डॅन्यूबच्या तीरावरील दमट भागात बांधलेले होते. या ठिकाणी काढलेले दिवस हा त्याच्या आयुष्यातला सर्वात क्लेशकारक कालखंड होय असे अॅडॉल्फने आपल्या पुस्तकात लिहून ठेवले आहे. तो लिहितो—

“ To me, Vienna, which is to so many the epitome of innocent pleasure, a festive playground for merry-


भरपूर कॅल्शियमयुक्त

**बिटको**

**ग्राइप**

नेहमी दिल्याने
लहान मुले सशक्त बांधेसूद
व गुटगुटीत होतात.

अत्यंत लोकप्रिय

**बिटको**

**काळी टूथ पावडर**

नेहमी वापरल्याने
दात मोत्यासारखे स्वच्छ
व चकचकीत होतात.

**बिटको केमिकल इन्डस्ट्रीज, नाशिक रोड**

**हिटलरने स्वत:च स्वत:चे या काळात रेखाटलेले चित्र**



**त्याला चित्रकार व्हायचे होते;**
**पण व्हिएन्नात तो रंगाऱ्याचे काम करीत होता.**

makers represents–I am sorry to say–merely the memory of the saddest period of my life. Even today the city can arouse in me nothing but dismal thoughts."

[ जे व्हिएन्ना शहर अनेकांना सात्त्विक सुखाचे माहेरघर आणि चैनी लोकांना चैनीचे एक उत्सवी ठिकाण म्हणून लक्षात राहिले असेल तेच व्हिएन्ना माझ्या आठवणीत समाविष्ट आहे ते माझ्या आयुष्यातील सर्वात क्लेशकारक कालखंड घालवलेले शहर म्हणूनच. आजही त्या शहराची आठवण आली की माझे मन काळवंडून जाते. ]

या कालखंडात भूक हा अ‍ॅडॉल्फचा एकमेव साथीदार होता. क्षणभरही त्याने अ‍ॅडॉल्फची पाठ सोडली नाही. या दयाशून्य साथीदाराशी झगडण्यातच अ‍ॅडॉल्फचे आयुष्य संपत होते. असे असूनही नियमितपणे एखादी नोकरी करायची त्याला इच्छा होत नव्हती. याला अर्थात् नेहमी मध्यमवर्गाला छळणारी भीतीच कारण होती. दारिद्र्याच्या रेटचाखाली न जाणो, आपण एकदम मध्यमवर्गातून श्रमजीवी वर्गात ढकलले जाऊ या भीतीने मध्यमवर्ग नेहमीच ग्रासलेला असतो. याच भीतीपोटी हिटलर या कालात दारिद्र्य भोगीत होता, अर्धपोटी राहात होता. परंतु कामगार म्हणून कुठेही नोकरी करणे तो टाळीत होता. थोडीफार चित्रकला त्याचेपाशी होती. त्याच्या जोरावर दुकानदारांची पोस्टर्स रंगवणे, घरांच्या भिंती रंगवणे, भेटकार्डे बनवणे असले उद्योग अ‍ॅडॉल्फ करीत होता.

त्याच्या अंगावर एक मळलेला लांब बटनांचा कोट या काळात असे. गुडघ्यापर्यंत हा लांब होता. डोक्याचे केस बारेमाप वाढलेले, दाढीचे खुंट चेहऱ्यावर डोकावत असत अशा तऱ्हेचे त्याचे त्यावेळेचे वर्णन त्याच्या परिचितांनी केलेले आहे.

अ‍ॅडॉल्फ ज्या काही मित्रांच्या संगतीत राहात असे ते सर्व त्याच्याप्रमाणेच सुकाणू नसलेल्या गलबतासारखे आयुष्याच्या सागरात हेलकावे खात होते. सर्व तऱ्हेच्या व्यसनाधीन अशा या परिवारातही अ‍ॅडॉल्फने आपली प्रतिज्ञा मोडली नाही. मद्य, मांसाशन आणि स्त्री ही सर्व सुखसाधने त्याने कधीच जवळ केली नाहीत. त्याला या काळातही एकच व्यसन होते अन् ते म्हणजे वाचन ! सकाळी, सायंकाळी तो वाचन करीत असे. पुष्कळवेळा तर तो रात्रभर वाचीतच असे.

या काळात अ‍ॅडॉल्फने जे वाचन केले व व्हिएन्नाच्या झोपडपट्टीपासून हवेल्यांपर्यंत जीवनाचे जे जवळून निरीक्षण केले...हेच त्याच्या आयुष्यातला पुरेसे भांडवल ठरले. तो सांगतो :

" Vienna was and remained for me the hardest school of life. I had set foot in this town while still half a boy and I left it a man grown quiet and grave. In this period there took shape within me a world picture and philosophy which became the granite foundation of all my acts. In addition to what I then created, I have had to learn little and I have had to alter little."

[ व्हिएन्नातील माझे वास्तव्य हा माझा जीवनाच्या शाळेतील सर्वांत महत्त्वाचा धडा होय. मी या शहरात पाऊल टाकले तेव्हा पोरसवदा होतो. परंतु मी हे शहर जेव्हा सोडले त्यावेळी एक शांत व गंभीर माणूस झालेला होतो. या कालात जगाचे जे चित्र माझ्या मन:पटलावर उमटले आणि जे तत्त्वज्ञान माझ्या मनावर बिंबले तेच माझ्या जीवितकार्याचा भक्कम पाया ठरला. त्यावेळी मी जे शिकलो त्यात भर घालण्यासारखे नंतर फारच थोडे अनुभवास आले. आणि जे शिकलो त्यांत बदल करण्याचीही आवश्यकता मला पुढे कधी भासली नाही. ]

हिटलरने पैदा केलेले हे विलक्षण शिक्षण होते तरी कसले ? यावेळी त्याने मनाशी ज्या कल्पना नक्की केल्या त्या काहीशा उथळ

आणि भयानक होत्या. पूर्वग्रहांच्या विषाने त्या ओथंबलेल्या होत्या. त्या कशाही का असेनात–इतिहासाला त्याची दखल घ्यावी लागली; कारण याच कल्पनांच्या पायावर या उनाड पोराने जर्मनीच्या तिसऱ्या राईशचा डोलारा उभा केला.

### व्हिएन्नात घडलेले 'विश्वरूपदर्शन !'

हिटलरने काढलेले निष्कर्ष हे काही अगदीच नवीन नव्हते. त्यावेळच्या जर्मनीच्या राजकीय परिस्थितीची ती सुसंगत प्रतिक्रिया होती. शतकानुशतके अल्पसंख्य जर्मन-ऑस्ट्रियन लोकांनी बारातेरा विविध राष्ट्रीयत्वांनी आणि संस्कृतींनी बनलेल्या साम्राज्यावर राज्य केलेले होते. परंतु १८४८ सालापासून जर्मन-ऑस्ट्रियन लोकांची साम्राज्यावरील पकड ढिली होत गेली. जे अल्पसंख्याक होते ते जर्मन राष्ट्रीयत्वाशी केव्हाच पुरते समरस झाले नाहीत. ऑस्ट्रियाच्या कढईत या विविध राष्ट्रीयत्वाचा एकजीव होईना. १८६० साली इटाली वेगळा झाला तर १८६७ साली हंगेरियन लोकांनी साम्राज्यात अर्धा हिस्सा प्रस्थापित केला. विसाव्या शतकाच्या प्रारंभी झेक, स्लोव्हाक आदि विविध राष्ट्रीयत्वाचे देश फुटून स्वतंत्र होण्याची मागणी करू लागले. ऑस्ट्रियाचे राजकारण हे विविध राष्ट्रीयत्वाचा दावा करणाऱ्या जातीजमातीचे राजकारण होऊ लागले होते.

ही केवळ राजकीय स्थिती झाली. सामाजिक दृष्टीनेही जातीजमातीचे वैमनस्य वाढीस लागले होते. कनिष्ठ वर्ग मतदानाचा अधिकार मागू लागला होता. कामगार वर्गाला 'ट्रेड युनियन्स' संघटना उभ्या करण्याचा हक्क हवासा वाटू लागला होता. अधिक रोजगार आणि नोकरीच्या ठिकाणी चांगल्या वातावरणाची अपेक्षा कामगार करू लागले होते. ऑस्ट्रो-जर्मन लोकांना आपल्यापेक्षा दुपटीने अधिक असलेल्या इतर राष्ट्रीयत्व सांगणाऱ्या लोकांची ही मागणी डावलणे अशक्यप्राय होऊ लागले होते.

हिटलर हा ऑस्ट्रो-जर्मन वंशातला आणि ऑस्ट्रिया-जर्मन सरहद्दीवरील लिंत्स जिल्ह्यातला असल्यामुळे या सर्व घटनांचे निनाद त्याच्या मनात उठणे अपरिहार्य होते.

तात्कालिक राजकारणाचा गोंधळ थांबविण्यासाठी जर्मन वंशाच्या लोकांनी जर्मनीच्या राष्ट्रीयत्वाशी एकरूप न झालेल्या झेक व स्लाव्ह लोकांना नेस्तनाबूद करून लोकशाहीचा खेळखंडोबा थांबवून एकसंघ व एकराष्ट्रीयत्वाचा जर्मनी उभा करण्याशिवाय गत्यंतर नाही अशी हिटलरच्या मनाची हळूहळू धारणा होऊ लागली.

हिटलर यावेळी प्रत्यक्ष राजकारणात उतरलेला नसला तरी ज्या प्रमुख तीन पक्षांनी राजकारण चालवले होते त्यांचे पवित्र–अपवित्र पवित्रे तो डोळसपणे पहात होता. हे प्रमुख पक्ष म्हणजे (१) सोशल डेमोक्रॅट्स्, (२) ख्रिश्चन सोशॅलिस्ट्स् व (३) पॅन-जर्मन नॅशनलिस्ट्स. या तीन पक्षांशी कमीअधिक साम्य राखणारे तीन प्रवाह भारताच्या राजकारणात आजही वावरत आहेत हे या पक्षांचे गुणदोष सांगितले की वाचकांच्या सहज लक्षात येईल.

पहिल्याच संपर्कात सोशल डेमोक्रॅट्स् या पक्षाबद्दल हिटलरच्या मनात विलक्षण तिटकारा उत्पन्न झाला. जर्मन राष्ट्रीयत्वाच्या उत्पादनाविषयी विशेष असे कसलेही सोयरसुतक न मानणारा हा पक्ष हिटलरला देशद्रोह्यांचा पक्षच वाटत असे. तो या पक्षाला 'रांड' म्हणत असे आणि त्यांच्या सामाजिक समता आणि विश्वबंधुत्वाच्या आरोळ्या या ढोंगी आहेत असा त्याचा उघड दावा होता. हिटलर या पक्षाविषयी लिहितो,

"In a few months I obtained what might have otherwise required decades : an udnerstanding of a pestilential whore,' cloaking herself as social virtue and brotherly love..."

[काही महिन्यातच जे समजायला सर्वसाधारणपणें दशके लागली असती—अशी गोष्ट माझ्या ध्यानी आली. हा पक्ष (Social Democrates) म्हणजे सामाजिक न्याय आणि बंधुप्रेमाचा बुरखा पांघरलेली...एक भयानक रोगग्रस्त 'राड' आहे !]

### शत्रुपक्षाकडून उचललेली विद्या

परंतु या पक्षाच्या मागे श्रमजीवी वर्गातील बहुसंख्य जनता असल्यामुळे या पक्षाचा केवळ द्वेष करणे योग्य नाही हे हिटलर जाणून होता. या पक्षाला श्रमजीवी वर्गात लोकप्रियता का लाभली आहे याचा त्याने शोध केला, त्याची अचूक कारणमीमांसा त्याने लावली. आपल्या संघटनेची *उभारणी करताना त्याला या संशोधनाची* अपार मदत झाली.

या पक्षाने काढलेली कामगारांची एक प्रचंड मिरवणूक हिटलरने व्हिएन्नात पाहिली. त्याच्या हे लक्षात आले की या पक्षाला जनतेमध्ये प्रक्षोभ निर्माण करण्याचे तंत्र साध्य झाले आहे. जनतेत प्रक्षोभ निर्माण करण्याचे मूलभूत कर्तृत्व अंगी असल्याखेरीज कुठल्याही पक्षाला राजकीय अस्तित्वच राहत नाही हा पहिला धडा हिटलरने मनात नोंदवला. दुसरा धडा म्हणजे या पक्षाचे यशस्वी प्रचारयंत्र. याचे सामर्थ्य हिटलरच्या लक्षात आले. केवळ प्रक्षोभ निर्माण करूनही भागत नाही. शारीरिक आणि मानसिक अत्याचाराची कुवत या पक्षात आहे असा दरारा या पक्षाने निर्माण केला होता. (They knew the value of using spiritual and physical terror.) हा तिसरा महत्त्वाचा निष्कर्ष हिटलरने काढला. हा निष्कर्ष रणधुरंधर हिटलरचा *सैतान बनवण्यास कारणीभूत झाला. या निष्कर्षांबाबत* हिटलरने जे लिहिले आहे ते मुळातूनच वाचले पाहिजे. हे वाचीत असताना एक गोष्ट ध्यानी घ्यावी की हे सर्व तो त्या पक्षाबद्दल म्हणत आहे की ज्याला उखडून टाकण्याचे मनसुबे तो रचीत होता.

"I understood the infamous spiritual terror which this movement exerts, particularly on the bourgeoisie. which is neither morally nor mentally equal to such, attack. At a given sign it unleashes a veritable bandage of lies and slander against whatever adversary seems most dangerous, until the nerves of the attacked persons' break down...This is a tactic based on precise calculation of all human weaknesses, and its result will lead to success with almost mathematical certainty–"

"I achieved an equal understanding of the importance of physical terror towards the individual and the masses."

[धनिक वर्गाच्या मनात अशुभ धडकी उत्पन्न करण्यात या चळवळीचे सामर्थ्य आहे ही गोष्ट मी तात्काळ ओळखली. या धनिक वर्गाजवळ अशा हल्ल्याला तोंड देण्यासाठी नीतीचे किंवा मनाचे पाठबळ कधीच नसते. त्यामुळे एका इशाऱ्यासरशी जेव्हा अशा वर्गातील एकाद्याच्या विरुद्ध खऱ्या खोट्या टीकेचा आणि किटाळाचा वर्षाव सुरू होतो तेव्हा तो मानसिक ताण सहन करण्याचे धैर्य त्या माणसाच्या आवाक्यातले नसते...आणि तो कोसळतो ! हा डावपेच सर्व माणसांच्या ठिकाणी जो उपजत कमकुवतपणा असतो त्यावर आधारलेला आहे आणि म्हणूनच याचे यश हे गणिती सिद्धातासारखे निश्चित असते.

व्यक्तीविरुद्ध किंवा जनसमुदायाविरुद्ध उपयोजिलेल्या शारीरिक क्रौर्याचे महत्त्वही तितकेच असते हे याच वेळी माझ्या ध्यानात आले.

## 'प्रखर राष्ट्रवाद्या'ची अवस्था

'पॅन जर्मन नॅशनॅलिस्ट' पक्षाकडे हिटलर काहीसा आकर्षित झाला. या पक्षाचा संस्थापक जॉर्ज रिटर (George Ritter) हा हिटलरच्याच आजोळचा राहणारा होता. जर्मन वंशाच्या लोकांचे देशाच्या राजकारणात प्रभुत्व व्हावे हाच या पक्षाचा उद्देश होता. ज्वलत राष्ट्रीय भावना, समाजवादाला विरोध, जर्मनीचे एकीकरण असा सर्व कार्यक्रम पुढे ठेवूनही हा पक्ष फारसा लोकप्रिय झाला नाही. याचे कारण हिटलरने अचूक शोधून काढले. एकतर या पक्षाला सामाजिक प्रश्नांची जाणीवच नसल्यामुळे समाजातील जो सर्वात लढाऊ वृत्तीचा भाग, त्याचाच पाठिंबा या पक्षाला मिळविता आला नाही. पार्लमेंटच्या निवडणुका लढवून पार्लमेंटमध्ये जाण्याच्या उद्योगात पक्षाचे बळ खर्ची पडत असे, आणि कॅथॉलिक चर्चशी उभा दावा राखून सर्व कॅथॉलिकपंथीयाचा विरोध या पक्षाने ओढवून घेतलेला होता. या सबंधी हिटलरने एक महत्त्वाचा सिद्धात सागितला आहे. तो सांगतो–

" A political party must never for a moment lose sight of the fact that in all previous historical experiences, a purely political party has never succeeded in producing a religious reformation . . , "

[ राजकीय पक्षाने एक क्षणभरही एक महत्त्वाची गोष्ट नजरेआड होऊ देता कामा नये की पूर्वीचा सर्व पक्षांचा इतिहास विचारात घेता, निर्मळ राजकीय पक्षाला धर्माची सुधारणा करण्यात कधीही यश लाभलेले नाही. ]

पॅन जर्मन पक्षाची आणखी एक चूक हिटलरच्या लक्षात आली ती अशी की – धर्मसंस्थेला त्यानी विथरवलेच परंतु देशाचे सैन्य किंवा राज्याचे शासनकर्ते यापैकी कोणाचेच पाठबळ मिळविण्याचा त्यानी प्रयत्न केला नाही. कुठल्याही देशात सैन्यसस्था, धर्मसस्था अथवा राज्यकर्ते या तीन शक्ती बलवान असतात. यापैकी एक तरी शक्ती पाठीशी असल्याखेरीज सत्ता हस्तगत करणे कोणत्याही पक्षाला जमणार नाही हे हिटलरने पुरते ओळखले. याच अनुभवाचा उपयोग करून १९३३ च्या दिव्यातून हिटलरने आपल्या नाझी पक्षाला सहीसलामत सत्ताधारी बनविण्यात पुढे यश मिळविले.

उरलेला तिसरा पक्ष म्हणजे ख्रिश्चन सोशल पार्टी. या पक्षाचा नेता डॉ कार्ल लूएगर. हा अत्यत प्रभावी वक्ता आणि कुशल संघटक होता. व्हिएन्ना शहराचा मेयर म्हणून त्याने जी कामगिरी चालवली होती त्याचा हिटलरवर विलक्षण परिणाम झाला होता. या माणसाने ज्यू-विरोधी भूमिका राजकीयदृष्ट्या स्पष्टपणे घेतलेली असली तरी व्यवहारात त्याचा ज्यूकडे पाहण्याचा दृष्टिकोन उदारच होता. कनिष्ठ मध्यमवर्ग आणि धनिक याचा पाठिंबा त्याने मिळवला होताच. परतु आपल्या आर्जवी आणि परिणामकारक वक्तृत्वाच्या जोरावर ज्यू लोकांनाही याच माणसाचा आधार वाटत असे. सुप्रसिद्ध ऑस्ट्रियन ज्यू लेखक स्टीफन झ्वाईग हा याच काळात व्हिएन्नाला होता. झ्वाईगनेच याचा निर्वाळा दिला आहे की जरी ज्यूना डॉ. लुएगर यांचा पक्षाचा सख्त विरोध होता. तरी डॉ. लुएगर यानी स्वतःच्या व्यक्तिगत जबाबदारीवर अनेक ज्यू लोकांना मदत करून त्याची मैत्री सपादन केली होती. झ्वाईग सागतो—

" His city administration was perfectly just and even typically democratic– "

डॉ. लुएगेर व हिटलर यांची प्रत्यक्ष गाठभेट कधी झाली नाही. व्यवहारात वागताना ज्यू-विरोधी पक्षाचा हा नेता ज्यूशी प्रेमाने आणि सौजन्याने वागतो ही गोष्टच फक्त हिटलरला आवडलेली नव्हती. ही एक तक्रार सोडली तर आपल्या अमोघ वक्तृत्वाने, प्रचाराने आणि वागणुकीने आपल्या पक्षाची सतत वाढ करणाऱ्या डॉ. लुएगरविषयी हिटलरच्या मनात आकर्षणच निर्माण झाले होते. वक्तृत्वाचे आणि प्रचाराचे धडे डॉ. लुएगरपासूनच हिटलरने घेतले यात शका नाही.

तिन्ही राजकीय पक्षाचा अभ्यास करून हिटलरने जेव्हा आपला 'नॅशनल सोशॅलिस्ट पक्ष' पुढे स्थापन केला तेव्हा या तिन्ही पक्षाच्या चुका त्याने टाळल्याच परंतु या सर्वाचे महत्त्वाचे गुण आपल्या पक्षासाठी त्याने राबविले. हिटलरच्या या अचूक मुत्सद्देगिरीचे खरोखरच कौतुक वाटते.

नेत्याचे प्रभावी वक्तृत्व हा पक्षाचा सर्वात मोठा आधार असतो ही गोष्ट हिटलरने ओळखली होती. उच्चारलेल्या शब्दाची प्रचंड शक्ती जनसमर्दावर आघात होताच शतपटीने वाढते आणि अशा शब्दाच्या घणाघातानेच आतापर्यंतच्या इतिहासातील धार्मिक अथवा राजकीय उत्पाताची सुरवात झाली आहे ही गोष्ट त्याच्या मनावर पक्की बिबलेली होती. तो लिहितो,

" The power which has always started the greatest religious and political avalanches in history rolling, has from time immemorial been the magic power of the spoken word and that alone. "

## ज्यू-द्वेषाची भयानक सणक

आपल्या राजकीय पक्षाची बैठक मनाशी आखीत असतानाच व्हिएन्ना शहरात हिटलरने ज्यू लोकाना प्रथम जवळून पाहिले. एकदा शहरातून फिरत असताना त्याने ज्यू माणूस पाहिला. काळे कफतान् घालून डोक्याच्या दोन्ही बाजूना काळे गोडे सोडलेला माणूस पहाताच त्याच्या मनात विचार आला, हाच का तो ज्यू ? त्याने त्या ज्यू माणसाच्या चेहऱ्याकडे निरखून निरखून पाहिले. त्याच्या चेहऱ्यावरची रेषा न् रेषा पाहताना हिटलर विचार करत होता– " हा ज्यू असेल किंवा नसेल. परंतु हा जर्मन आहे का ? जर्मन देशाविषयी, जर्मन सस्कृतीविषयी, जर्मन राष्ट्रीयत्वाविषयी या माणसाच्या मनात

काही प्रेम आहे का ? आदर आहे का ?'

*या विचाराने पछाडल्यामुळे त्याने ज्यूबद्दल माहिती देणारे साहित्य* वाचण्यास सुरुवात केली. त्यावेळी व्हिएन्ना शहरात ज्यू-विरोधी वाङ्मयाची खूपच पैदास होत होती. त्यावरच अवलंबून ज्यूबद्दलचे आपले मत बनविणे हिटलरला योग्य वाटले नाही. ज्यूना प्रत्यक्ष पाहण्यासाठी तो व्हिएन्नातील गल्ल्या, बोळ धुडाळू लागला. त्याच्या लक्षात आले की *व्हिएन्नातील वेश्याचा आणि गुलामाचा चोरटा व्यापार* हे ज्यू लोक करतात. जर्मन तरुण स्त्रियाना वेश्यागृहात नेऊन सोडणाऱ्या या ज्यूबद्दल तिरस्काराची सणक हिटलरच्या मनात घट्ट घर करून बसली. हिटलरने 'माईन काम्फ'मध्ये लिहिले आहे–

"The Jews were largely responsible for prostitution and white slave traffic. When I recognized the Jew as the coldhearted, shameless and calculating director of this revolting vice in the scum of this big city–, a cold shudder ran through my back–"

[शहरातील वेश्याव्यवसाय आणि गुलामाच्या या व्यवसायात मुख्यत: ज्यूचा हात होता. जेव्हा माझ्या लक्षात आले की निर्लज्ज, हृदयशून्य असा हा ज्यूच या शहरात चालणाऱ्या किळसवाण्या धंद्याचा चालक मालक आहे तेव्हा माझ्या पाठीत भाल्यासारखी एक सणक उत्पन्न झाली.]

१९१३ साल उजाडले. हिटलर यावेळी कसा होता ? मित्र नव्हते, कुटुंब नव्हते ! घर नव्हते, नोकरी नव्हती ! पोटाची खळगी कशी भरेल याची भ्रात होती. व्हिएन्नातील पाच वर्षात मग त्याने मिळवले तरी काय ? त्याला फक्त एकच साक्षात्कार झाला की या जगात जगणाऱ्या असंख्य कीटकाप्रमाणे जगण्यासाठी आपला जन्म नाही. आपल्यावर देशाचे काहीतरी उत्तरदायित्व आहे. हा मागासलेला देश उठवल्याखेरीज आता विश्राती नाही. एखाद्या प्रेषिताच्या निष्ठेने आपण पक्ष उभारला पाहिजे. जर्मन राष्ट्रीयत्वाचा स्फुल्लिंग पेटवला पाहिजे. त्याने व्हिएन्ना सोडण्याचे ठरवले. १९१२ च्या वसंत ऋतूत हिटलरने व्हिएन्ना सोडले आणि तो म्युनिकला आला.

म्युनिकला येऊन त्याने आपले बस्तान बसविण्यापूर्वी १९१४ च्या उन्हाळ्यात युरोपात युद्ध भडकले.

जर्मनीने देशातल्या तरुणांना हाक दिली. ३ ऑगस्ट १११४ रोजी हिटलरने बव्हेरियाच्या राजे लुडविग् याच्याकडे सैन्यात दाखल करून घ्यावे असा अर्ज केला आणि त्याची सैन्यात भरती झाली.

पचवीस वर्षाच्या हिटलरच्या आयुष्यातील निराशेचा, कंगाल अवस्थेचा काल अचानक सपला. ज्या लढाईने युरोपात लाखो जीवाचा बळी घेतला ते युद्ध सुरू होताच या एका तरुण माणसाला मात्र अत्यानद झाला. त्याने सुटकेचा निःश्वास सोडला. हिटलर लिहितो–'

"To me those hours came as a deliverance from the distress that had weighed upon me I sank down upon my knees and thanked heaven out of the fullness of my heart. Compared to the events of this gigantic struggle all the past fell into oblinion."

[लढाई सुरू झाल्याचे कळले तेव्हा मला मुक्तता लाभली. माझ्या मन.पटलावरील सर्व अभ्रे क्षणार्धात सुरू झाली. मी गुडघे टेकले आणि परमेश्वराचे भरल्या अंत करणाने आभार मानले. या प्रचंड लढ्यातील घटनाशी तुलना करता माझे सर्व पूर्वायुष्य मला आठवेनासे झाले.]

: २ :

**नाझी पक्षाचा जन्म**

१० नोव्हेंबर १९१८ या दिवसाचे वर्णन विसाव्या शतकातील सर्वात मोठ्या नीच कर्माचा दिवस म्हणून हिटलर आपल्या आत्मचरित्रात करतो. 'य प्रेस' ( Y Press ) या ठिकाणी महिन्याभरापूर्वी ब्रिटिशानी केलेल्या विषारी वायूच्या हल्ल्यात हिटलरला तात्पुरते अंधत्व प्राप्त झाले होते, व तो बर्लिनजवळ 'पेसवॉक' (Pase Walk) या गावातील एका लष्करी रुग्णालयात उपचार घेत होता. त्या दिवशी रविवार होता. सकाळची प्रार्थना आटोपून परतणारा एक पाद्री धावत हॉस्पिटलच्या आवारात शिरला आणि त्याने बातमी सांगितली––

"जर्मनीने शरणागती दिली आहे. कैसर हा राज्यत्याग करून हॉलंडमध्ये पळून गेला आहे. आदल्या दिवशीच बर्लिनमध्ये प्रजासत्ताकाची घोषणा झालेली असून दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. ११–११–१९१८ ला फ्रान्समध्ये युद्धबदी करारावर दोस्ताच्या सह्या होणार आहेत..... जर्मनीने युद्धात पराभव मान्य केला आहे. लढाई सपली असून शरणागत जर्मनी आता दोस्ताच्या पायावर लोळण घेणार आहे––"

बातमी सागता सांगता तो पाद्री ओक्साबोक्शी रडू लागला.

*या प्रसगाचे वर्णन आपल्या वृत्तान्तात करताना हिटलर लिहितो–*

"I could stand it no longer. Everything went black before my eyes and I dug my burning head into my blanket and pillow–So it had been all in vain.. all the sacrifices...in vain; the hours in which with mortal fear clutching in our hearts we did our duty, in vain the death of two millions who died... had they died for this ? Did all this happen only so that a gang of wretched criminals could lay hands on the Fatherland ?"

[मला पुढचे ऐकवेना. माझ्या डोळ्यापुढे अधारी आली. पांघरुणात आणि उशीत तापलेले डोके खुपसून मी अश्रूना वाट करून दिली. सगळे मातीमोल झाले होते–सगळा त्याग–अन्त करणातील मरणाची भीती गाडून प्राणपणाने आम्ही लढलो, ते सर्व धुळीला मिळाले होते... वीस लाख लोकाचे प्राणार्पण व्यर्थच ठरले होते. या करताच का त्यानी आपले प्राण दिले ? एकाद्या हरामखोराच्या टोळीला आमच्या पितृभूमीवर दरोडा घालता यावा म्हणून का एवढे महाभारत घडले?]

हिटलरच्या आयुष्यात त्याच्या डोळ्यात अश्रू आले असे दोनच प्रसग घडले. एक त्याची आई निधन पावली तेव्हा आणि आता पुन्हा जर्मनीचा महायुद्धात पराभव झाला तेव्हा ! हिटलरवर अन्य काहीही आरोप केले तरी त्याची देशभक्ती आणि त्याचे शौर्य या

बद्दल त्याच्या शत्रूनाही आदर वाटायला हवा एवढी त्याची देशभक्ती आणि शौर्य जाज्वल्य होते. ऑक्टोबर १९१४ मध्ये बव्हेरियातील सैन्यात दाखल होताच अवघ्या तीन महिन्यांच्या लष्करी शिक्षणानंतर तो आघाडीवर दाखल झाला. 'य-प्रेस' येथे जी पहिली लढाई झाली त्या लढाईत जर्मनांनी ब्रिटिश खाडीच्या दिशेने जोराची मुसंडी मारण्याचा प्रयत्न केला होता. हिटलरच्या सैन्यविभागात ३५०७ सैनिक होते आणि या लढाईत त्यापैकी फक्त ६०० जिवत राहिले. २९०० जर्मन सैनिकांचा बळी लढाईने घेतला होता.

७ ऑक्टोबर १९१६ या दिवशी 'सोमे' च्या लढाईत हिटलरच्या पायात गोळी शिरली व तो हॉस्पिटलात दाखल झाला. मार्च १९१७ ला बरा होताच तो कॉर्पोरल बनून पुन: आघाडीकडे गेला. आरस (Arras) आणि य-प्रेसची तिसरी लढाई या दोन्ही लढायात हिटलर लढला. १३-१०-१९१८ ला ब्रिटिशानी जो विषारी वायुहल्ला चढवला, त्यातच त्याला तात्पुरते अधत्व आलेले होते. पेस वॉक येथे रुग्णालयात तो असतानाच अचानक युद्धविराम झाला.

लढाईतील शौर्याबद्दल १९१४ मध्ये Iron Cross—2 nd class व १९१८ मध्ये Iron Cross – First class अशी दोन बहुमानाची विरुदे त्याने मिळवली. दुसरे पदक मिळाले ते त्याने एकटयाने पधरा इंग्रज सैनिकाना गिरफ्तार केले या असामान्य कर्तृत्वाबद्दल ! शिरर त्याच्या या गुणाबद्दल आपल्या इतिहासात अत्यत गौरवपर लिहितो — "Hitler had been a brave and courageous soldier. There is no doubt that Corporal Hitler earned the Iron Cross. He wore it proudly to the end of his life"

[ हिटलर हा अत्यंत शूर व धैर्यशील सैनिक होता. कॉर्पोरल हिटलरला मानचिन्ह मिळाले हे योग्यच झाले. अखेरच्या क्षणापर्यंत त्याने हे मोठ्या अभिमानाने मिरविले. ]

पहिल्या प्रथम जखमी होऊन हिटलर जेव्हा हॉस्पिटलमध्ये दाखल झाला तेव्हा म्युनिकला तो गेला असताना त्याला असे आढळून आले, सर्व मुलकी कारकुनी जागा आता ज्यू लोकानी अडवल्या आहेत. इतकेच नव्हे तर सर्व उत्पादनसाधनेही ज्यू लोकानी ताब्यात घेतलेली होती. ही वस्तुस्थिती पाहताना हिटलरचा ज्यू-द्वेष पुन्हा एकदा उसळून आला. प्रकृती बरी होताच पुन्हा आघाडीवर गेला.

जर्मन सैन्याचा रणांगणावर असा मोठा पराजय झालेला नसताना –जर्मनीने शरणागती पत्करल्याची वार्ता जेव्हा नोव्हेंबरच्या एका रविवारी हिटलरने ऐकली तेव्हा त्याचा त्याला कार्यकारणभावच उमजेना. त्याने अशी समजूत करून घेतली की जर्मन जवानाच्या पाठीत मुलकी ज्यूनीच खजीर खुपसला असावा. त्याखेरीज शरणागतीची भाषा निघणे शक्य नाही.

वास्तविक २८ सप्टेंबर १९१८ लाच जर्मन सेनादल प्रमुख फील्ड मार्शल हिंडेनबुर्ग याना त्याचा प्रमुख सेनापती जनरल लुडेन्डॉर्फ याने तावडतोब युद्धबदी घडवा असा सल्ला दिला, तो जर्मनीचा पराभव अटळ दिसू लागला म्हणूनच. त्याने लष्करीदृष्टया परिस्थिती गभीर असल्याचे आपल्या पत्रात त्यावेळी नमूद केलेले असताना हिटलरने पुढे पराजयाची कारणमीमासा करताना ज्यू जमातीने जर्मन जवानाच्या पाठीत खजीर खुपसला हे जे कारण प्रचारात रावविले त्याला लुडेन्डॉर्फनने देखील मान का हलवावी ? याचे कारण सोपे होते. ज्यावेळी पराभव होतो तेव्हा कुणाच्या तरी डोक्यावर खापर फोडल्याखेरीज क्षुब्ध जनता थड होत नाही.

कैसर पळून गेल्यानंतर सोशल डेमोक्रॅटिक पक्षाने सत्ता स्वीकारली ती केवळ जर्मनी लोकशाहीच्या मार्गाने सावरावा या उद्देशानेच ! परंतु याच पक्षाला उत्तरदायी पक्ष म्हणून व्हर्सायच्या तहावर नोव्हेंबर १९१८ मध्ये सह्या कराव्या लागल्या. आणि याच पुढाऱ्याना–नाझी प्रचाराची जोड मिळताच–'नोव्हेंबरचे हरामखोर' असे जर्मन जनतेने ठरविले. ज्यू जनता आणि हा पक्ष याच्या माथी पराभवाचे खापर फोडून नाझी पक्षाला सत्तेची वाट जर्मन जनतेने मोकळी करून दिली.

पराभवाची अशुभ बातमी सागून तो पाद्री निघून गेल्यावर हिटलरच्या मनात दिवसरात्र एकच विचार घोळू लागला–

"सगळे सपले आहे. फक्त मूर्ख असतील तेच दोस्तांकडून दया अपेक्षितील. ज्यानी ज्यानी जर्मन जनतेच्या पाठीत हा खंजीर खुपसला त्याना शासन घडवल्याखेरीज आता विश्राती नाही."

हिटलर पुढे सांगतो–

"My own fate became known to me. I decided to go into politics."

[ माझे भवितव्य आता मला स्पष्ट झाले. मी राजकारणात पडण्याचे नक्की केले. ]

## राजकारणात पदार्पण

वयाची तिशी गाठलेल्या हिटलरला राजकारणात पडणे हे वाटले तितके सोपे नव्हते. हातून काही कृती घडावी अशी कसलीच पार्श्वभूमी त्याने जमा केली नव्हती. नोकरी नव्हती, कुठल्याही व्यवसायाचे शिक्षण नव्हते. जिथे खायची भ्रांत होती तिथे राजकारण खेळण्यासाठी पैसा कुठून यावा ?

१९१८ च्या अखेरीस तो म्युनिकमध्ये आला. येथेही राज्यक्रांती झाली होती. सोशल डेमोक्रॅट्स् पक्षाच्या हाती सत्ता आली होती. कुर्ट आयझनर (Kurt Eisner) नावाच्या ज्यू लेखकाने रक्तशून्य राज्यक्राती घडवली होती. शमर दोनशे लोकासमवेत त्याने मोर्चा काढला. राजवाड्यातून राजा पळून गेला आणि या लेखकाने पार्लमेंटपद्धतीने आपण राज्य करणार असल्याचे जाहीर केले. एकादा हिंदी सस्थानिक विलीन व्हावा तसा बव्हेरियाचा राजा विलीन झाला. परतु क्राती आपल्या पिलाना खातेच. इसनेरचा लवकरच खून करण्यात आला. अवघ्या तीन महिन्यात या इसनेरचा खून होऊन कम्युनिस्ट पक्षाने बव्हेरियात "सोव्हिएट" सत्ता प्रस्थापित केली. १ मे १९१९ ला बर्लिनहून सैन्य आले... कम्युनिस्टाचाही काटा निघाला... जोहान्स हॉफमन याच्या नेतृत्वाखाली सोशल डेमोक्रॅट्स् पक्षाच्या हाती पुन्हा सत्ता आली.

हे कसे झाले ? याचे कारण बव्हेरिअन सैन्य हे उजव्या गटाकडे झुकलेले होते. युद्ध सपून बरेच सैनिक मोकळे झालेले होते. त्याना स्वस्थ बसणे शक्य नव्हते. हे सैनिक व बव्हेरिअन सैन्य यानी बर्लिनहून सैन्य बोलावून कम्युनिस्टाना नेस्तनाबूद केले. परतु एकदरीत पार्लमेंटवर त्याचा विश्वास नव्हता आणि लोकशाही, निवडणुका याचे त्याना वावडे होते.

[ पृष्ठ ४० वर पहा ]



## तीन मुक्तके

शृंखलांचे ओठ काही ओळखीचे बोलती
अन् झरोक्यातून तारे दूरचे बोलाविती
गोठुनी गेली कधीची संगिनींची काळिजे
बंदिवानांनो उठा, भिंती उठाया सांगती !

अजुन रात्र सरली नाही ! अजुन रात्र सरली नाही !
अजुन प्रभा लाल उषेची दशदिशात भरली नाही !
अजुन किर्र काळोखाच्या कोठडीत कण्हतो आम्ही...
अजुन तुझी करुणा देवा गजातुन शिरली नाही !

पाठ दाखवून अशी दुःख कधी टळते का ?
अन् डोळे मिटल्याने दैव दूर पळते का ?
जीव पाखडून असा हातीं येईल काय ?
दाण्याचे कण्हणे ह्या जात्याला कळते का ?

--सुरेश भट

## हे माती, हे माते,

काळे काळे विठ्ठल-रूप तुझे;
तू तुझ्यात असतेस दंग.
तुझ्या जीवनात तुझे विर्घळणे चालते.
तुझा तुझ्यात गडद होत जातो रंग.
धन्यतेच्या संवेदना अंकुरत-उंकारत
भक्तिरूप पीक उमलत येते मनावर
एका वाऱ्याच्या हातात खंडोगणती चिपळ्या;
नाद धरलेला असतो ध्यानमग्न पानांवर
पावसाच्या बोटांतून नभ कुरवाळत येते तुला
फूलफूल फूलतीस गंध-मादकसे सुख.
हिरव्या समाधीला मुक्ति-फळ साक्षात्कारते;
ऊन-थंडी-पलीकडचा शाश्वत हुरूप.
... दुःखात अनुद्विग्न, सुखात स्पृहाहीन राहतसे.
जगाला कल्याण देतेस तरी हुर्यांत खूप खूप डरतेस.

--आनंद यादव

## शिल्प

वेळ अंधुक...क्षितिजावर चंद्रचाहूल थबकलेली
दीठ उघडणाऱ्या फुलांत अर्थस्वप्ने अडकलेली ...
पावलांमध्ये बांधुन आलीस अप्सरेचे घुंगुरगाणे
लय घेऊन फिरू लागे एक वादळ संगीतवाणे
आणि कवळ्या अंगाभवती अंधार फिका मंतरलेला
थर्थरणाऱ्या जांभूळबनात भान आपले विसरलेला
जीव भुलून जाईल असा तळचाकाठी देखणा प्रहर
उरात हले की लाट उठून खाली सरेल उनाड पदर
नक्षत्रांच्या पांढऱ्या दवात भिजू नकोस विरून जाशील
मावळतीला देऊ नकोस किरणे वेचुन आकाशातील...
सखे ! असेच माझ्या डोळ्यात तुला अढळ रहायाचे—
शृंगारवेडे शिल्प होऊन संगमरवरी सौंदर्याचे !

--ललित सोनोने

मला रात्र माहीत नाही,
मला अंधार ठाऊक नाही;
मला प्रकाशाचा चिरंतन शाप आहे.



# अंधार

जी. ए. कुळकर्णी

रखरखत्या उन्हातून ते दोघे प्रवासी जळती पावले उचलत चालले होते. त्यांपैकी एक अंध होता. दुसऱ्याला उन्हाच्या भीषण रुद्र-स्वरूपाकडे पाहवत नव्हते. त्याच्या मनात घनदाट वटवृक्षांची गर्दी, आणि त्यांच्या शीतल गडद छायेत पसरलेले हिरवे गवत होते.

"ही जळजळीत रात्र केव्हा संपणार? आणि शीतल मायेची रात्र केव्हा येणार?" अंधाने आर्ततेने विचारले. दुसरा मुकाट राहिला. त्याचा चेहरा उन्हाने तडकत होता. व पायाखाली निखारे जळत होते.

धगधगत्या पाऊलवाटेवर कोपऱ्यावर वळताच तो थबकून चमकला. समोर एक भव्य रुद्रतेजस्वी पुरुष उभा होता. तो अंध नव्हता, पण उन्हाच्या अमर्याद तापाकडे तो अनिमिष डोळ्यांनी पाहत होता. त्याच्या पायाखाली सावलीची रेषाही नव्हती, पण तो निश्चल-पणे उभा होता. प्रवाशाने मीत मीत विचारले, "इथे कुठे जवळ झाडे आहेत का? कुठे आंग पसरण्याइतकी सावली आहे का?"

त्या भव्य पुरुषाने दूर हात दाखवला. "तेथे वटवृक्षांची राई आहे. तेथील झऱ्याचा झुळझुळ आवाज बाहेरही ऐकू येतो."

प्रवाशाने दूर दिसणाऱ्या काळसर ठिपक्याकडे पाहिले, व तो पुन्हा म्हणाला, "तुम्ही आमच्याबरोबर याल? या वणव्यात उभे राहणे तापदायक आहे. तेथल्या छायेत आमच्याबरोबर आपणही विश्रांती घ्यावी."

"मी तुमच्याबरोबर येईन," तो भव्य पुरुष म्हणाला, "पण छायेत येणार नाही. माझ्या नशिबी सावली नाही, आणि माझ्यामुळे तुमच्या वांटयाचीही सावली जाईल."

प्रवासी गोंधळून पाहू लागला, पण त्याला पुढे विचारण्याचे धैर्य झाले नाही. अंधाच्या हाताला धरून तो सावलीत आला. तेथे गर्द झाडांच्या मांडवाखाली अंधाराला हिरवी छटा होती, त्याला वाहत्या पाण्याचा शीतल स्पर्श होता. तेथील झऱ्याच्या पाण्याला अंधाराचा गोड काळिमा होता. तो भव्य पुरुष थोडया अंतरावर एका खडकाजवळ उभा राहिला.

"आता थंड रात्र सुरू झाली काय?" छायेत आंग पसरता अंधाने विचारलें.

"नाही. ही झाडांची सावली आहे. ती रात्रमाऊली अद्याप आली नाही." निश्वास टाकत प्रवासी म्हणाला.

"तुझी थंड रात्र कशी असते?" अंधाने विचारले.

"त्या वेळी सारे आभाळ मखमली होते, आणि त्यात प्रकाशाचे सहस्र कण असतात."

"मला अंधार माहीत आहे. पण प्रकाशाचे कण असलेला अंधार माहीत नाही." अंध म्हणाला.

"मला अंधारच माहीत नाही." तो भव्य पुरुष दुरून म्हणाला.

"काही वेळा तलम रेशमी वस्त्राप्रमाणे मृदू चांदणे पसरते. शीतल वाऱ्याची झुळूक आली की पाने थरथरतात, पाण्यावर नाजूक लहरी उठतात." प्रवासी म्हणाला.

"मला अंधार माहीत आहे, पण चांदणे माहीत नाही, थरथरणारी पाने, पाण्याच्या नाजुक लहरी माहीत नाहीत." अंध म्हणाला.

" मला अंधारही माहीत नाही." तो तेजस्वी पुरुष दुरून म्हणाला.

" रात्र मग आपल्या अथांग प्रेमाची दौलत घेऊन येते. श्रांत शरिरे विश्रब्धपणे पसरतात. सुखाच्या धुंदीची उत्कटता विरते; दु:खाची विषारी धग सरते. राव आणि रक एकाच शांत किमयेत विलीन होतात, आणि जीवनातील तप्ततेचा क्षणिक विसर पडतो. रातराणीचा मंद गंध पसरतो. रातकळीचे शुभ्र फूल मध्यरात्रीच उमलते, आणि प्रकाश दिसण्याआधीच आयुष्य संपवून मातीत पडते. सगळे स्तब्ध होते, आणि सागरात नौकेचे चक्र अविरतपणे फिरत राहावे त्याप्रमाणे साऱ्या विश्वात पृथ्वीचे चक्र मात्र शांतपणे फिरत पुढे सरकते." प्रवासी जड डोळ्यांनी म्हणाला.

" मला रातराणीचा गंध माहीत आहे. पण रातकळीचे पांढरे फूल माहीत नाही." अंध म्हणाला.

" मला रात्र माहीत नाही, मला अंधार ठाऊक नाही. मला रातराणीचा गंध, रातकळीचे फूल अज्ञात आहे. मला प्रकाशाचा चिरंतन शाप आहे." तो भव्य तेजस्वी पुरुष पुन्हा म्हणाला.

प्रवाशाला आता राहवले नाही. त्या हिरवट सावलीत तो उठून बसला आणि धगधगीत वणव्यात अग्निजिह्वेप्रमाणे उभ्या असलेल्या पुरुषास तो म्हणाला, " मनुष्याच्या वाट्याला दु:ख आले, पण रात्रीच्या शांत विश्रांतीची देणगीही आली. ती सम्राटापासून दरिद्री माणसापर्यंत सगळ्यांना मिळते. हा अंध आहे. त्याला चांदण्याचे वैभव माहीत नाही. पाण्यावरील जरतारी नकशी ठाऊक नाही. पण तोदेखील स्वत:च्या दु:खापासून स्वत:ला अंधारात हरवतो. मग आपणच असे का म्हणता ?"

तो भव्य पुरुष किंचित् हसला. ते हसणे आर्त होते. त्याचा आवाज भोवती पसरलेल्या उन्हाप्रमाणे धगधगीत होता.

" पण माझ्या वाट्याला मात्र चिरंतन, प्रकाशाचा शाप आला. तू मानव असून भाग्यवान आहेस. हे मानवा, मी सूर्य आहे."

• • •

## देण्याचे असावे । मुखी तत्त्वज्ञान

देण्याचे असावे । मुखी तत्त्वज्ञान
करावे चिंतन । घेण्याचेच १
ब्रह्मचर्य घोषी । अपत्य शंभर
औरस, इतर । एकट्याचे २
सुवर्णाची मूर्ती । ध्यावी देवळात
पापाची हो खंत । काढू नये ३
'सामान्याची सत्ता'। खरडावा गळा
परी त्याचा पिळा । आपटावा ४
तोंडातल्या दाता । लिंपावी साखर
तयाचे 'अंतर'। विषे भरा ५
युधिष्ठिरभक्त । म्हणूनी फिरावे
ओठ बदलावे । जिव्हेवर ६
दंभाचा हा सर्प । वेळावत जीभा
चाटितसे गाभा । जीवनाचा ७
इंद्राचीहि सत्ता । चाले दंभानेच
देवा दंभरूप । विश्व भासे ८
देव याने झाला । पायाने लंगडा
देवा, काढा काढा । दंभ–काटा ९

—श्रीराम पंडित

## फिनिक्स् !

रेडियमचा तेजस्वी पक्षी तेजाळीत होता
माणुसकीचा काळा कॅन्सर जाळीत होता
हृदयांत भरली होती बंधुत्वाची गंगोत्री
पंखांखाली निर्धास्त होती अर्धी धरित्री !

अकस्मात् सैतानाने गोळी झाडली
विशुद्ध विश्वहृदये फाडत गेली
रक्ताच्या चिळकांड्या जगभर उडाल्या
साऱ्या सद्वृत्ती छिन्नभिन्न झाल्या !

भरल्या माणुसकीवर आणखी एक कलंक चढला
सैतानी अमानुषतेचा पुन्हा एक विजय झाला
शंभर वर्षांनंतर पुन्हा तोच आवाज घुमला
लिंकनचा अमर आत्मा खदखदून हसला !

जातील अनेक लिंकन ! जातील अनेक केनेडी
जळत्या चितेतून पुन्हा घेतील उडी
रेडियमचे फिनिक्स् पुन्हा जन्म घेतील
माणुसकीचा काळा कॅन्सर नि:शेष जाळतील !

—मधुकर कुलकर्णी

जानकीला वाटलं ही गुंगी संपू नये,
हे चांदणं ओसरु नये.
ही चाल अशीच कायम राहावी....

# कीर्तनाच्या मिषे

**शरद् विनायक काळे**

उत्तररंग सुरू झाला. बुवांच्या भाळी अबीराचे बोट लागले, तुळशीमंजिऱ्यांची माळ गळयात पडली. उपरण्याचा वेढा घट्ट करून बुवांनी कमर कसली. झांज लयबद्ध वाजू लागली. तवल्यावर थाप पडली. पेटीचे सूर घुमू लागले—वातावरण बदलून नादावून गेले...

बुवांनी आख्यान सुरू केले—

" आयकें, अये ऋषिजाये ऽऽ

मज वरिले श्रीरघुराये...! "

——सीतेची वेणी घालता घालता ऋषिपत्नीने विचारले, " अग, रघुरायांसारखा अद्वितीय वर तुला लाभला तरी कसा ? "

——सीता तिला स्वयंवराची कथा सांगू लागली...

देवळातल्या स्त्रीश्रोत्यात जानकी अगदी मागे बसली होती. आख्यानातल्या सीतेचे बोलणे तिच्या कानी पडले नि सुगंधी झुळुक यावी, तसे तिला वाटले. बुवांचे आख्यान समोर प्रत्यक्ष घडते आहे, असा तिला भास झाला——त्यातली सीता आपण आहोत नि रामरायांच्या ठिकाणी——

——ती संकोचली, कमालीची लाजली. जे धाडस करायचे तिच्या मनात केव्हापासून होते, खरे म्हणजे जे धाडस तिने मनोमन केलेही होते; ते आता कुणालाही न जुमानता डोळे करतील की काय, असे भय तिला वाटले. शरीराचा थरकाप का होतोय्, तिला कळेना. सूरसंगीताच्या त्या गजबजल्या दुनियेत देखील स्वतःच्या बांगडयांची किणकिण अविरत चालू आहे, हेही तिला जाणवले. तिचे डोळे नकळत भुई बघू लागले नि तिला जरा बरे वाटले.

बुवा आळवून आळवून आख्यानाचे ध्रुपद गात होते.——

" आयके, अये ऋषिजाये ऽऽ "

कुणाला तरी हाक मारावी, तशी अगदी बुवांनी ती ओळ म्हटली. जानकीला वाटले—आपल्यालाच उद्देशून ती हाक आहे. कुणीतरी अगदी ओरडून ओरडून ती साद घालत आहे. आपले मात्र तिकडे लक्ष नाही. कानात दडे बसल्यासारखे आपण वागत आहोत...

——ती हाक मग जानकीचा पिच्छा सोडीना ! अगदी असह्य झाले तेव्हा तिला वर बघावेच लागले. समोर खांबाला टेकून बसलेल्या पुरुषोत्तमाकडे ती नकळत एकटक बघू लागली ! आश्चर्य म्हणजे पुरुषोत्तमदेखील त्याचवेळी तिच्याकडे बघत होता—रोखून बघत होता ! तो हसतो आहे, असेही तिला वाटले नि ती भलतीच चपापली, थरारली ! तिला नजर मुळी हलवताच येईना. चिकटल्यासारखे तिचे डोळे पुरुषोत्तमावरच खिळून राहिले !

तेवढयात सभामंडपातल्या बत्तीचा प्रकाश मंदावला. कुणीसे उठून बत्तीचे बटण उलटसुलट पिळले——

——क्षणभर मिट्ट काळोख ! क्षणभरच ! नि वातावरण पुन्हा उजळले. एक क्षणच ! पण त्या क्षणी जानकीचा रोमरोम लहरून गेला. एक गोड भास तिला झाला...

कुणी मैत्रिण आख्यानातल्या सीतेसारखीच आपली वेणी घालते आहे. पुरुषोत्तमाचे नि बसलेला असला तरी आपले लग्न त्याच्याशी केव्हाच लागले नव्हते—पुढेही ते होणार नाही, कुणी दुसराच राक्षसी माणूस आपल्या नशिबी आला आहे, हे तिला जाणवले.

ती आख्यान ऐकू लागली.

बुवांनी खाकरून म्हटले, " काय सांगावं महाराज ?

' नवमणिमय मंडप साजे,
संपूर्ण मिळाले राजे,
नभि गंभिर दुंदुभि वाजे
गणिकाजन मंजुळ गाये ऽऽ
मज वरिले श्रीरघुराये ! ... '

' भूमिकन्येचा आणि भूपतीचा तो विवाह, महाराज ! तो काय साधासुधा ? असा तसा? ' न भूतो न भविष्यति ' असा थाटमाट...

आपलं लग्न जुळले तरी कसें, म्हणून कुतूहलाने विचारते आहे. आपण तिला हे नवल कसे घडले ते पुलकित होऊन सांगत आहो. वेणी गुंफली जाते आहे—तीन बटांची कौशल्याने गुंफण होते आहे...शब्द सगळा संकोच दूर करून बाहेर पडताहेत. पण शब्ददेखील नाममात्र. खरा आहे तो एक अनुभव—ते उजळआगळे विश्व ! आज त्यात प्रत्यक्ष सहभागी व्हायला मिळाले आहे. तेच सुख आपण सांगत आहो—मुक्तपणे सांगत आहो. मोहरलेले झाड वाऱ्यावर डुलावे, तसे डुलत—झुलत सांगत आहो ! ...

कुणीतरी मध्येच जोरजोराने खोकू लागले नि जानकीची तंद्री भंगली—पुरुषोत्तम समोर हो ! पुंडलीक वरदा हा ऽ ऽ रि विठ्ठऽऽल्...'

हातातले सुंदर भांडे निसटून ठणकन् खाली पडावे, फुटावे नि त्याचा चक्काचूर व्हावा, तसे जानकीला वाटले !

स्वतःचे लग्न मग चटकन् तिच्या डोळयांसमोर उभे राहिले——

' आपलं लग्न—लग्न ? ते काय लग्न ? छे : ! या कानाचे त्या कानाला न कळता झालेला तो विधी ! रोजची भात आमटी शिजावी, तसा तो झाला ! व्हायलाच हवा म्हणून ! कुणालाच त्याचे कौतुक नव्हते, कुणीतरी, कुठलातरी, कसातरी माणूस अंतरपाटाआड उभा—अंतरपाटाखालून त्याची मळीमक्कम पावले बघूनच पोटात गोळा

उठत होता ! त्या पावलांवरल्या टचटचीत शिरा, करपलेली नखे कशीशीच दिसत होती. पिवळ्या पाटावर त्या पावलांचा कुळकुळीत रंग उठून दिसत होता ! टीचभर जागेत लग्न पार पडले होते – इन्‌मिन् तीन माणसांच्या मेळाव्यात—मेळावा कसला तो ?

ज्यावेळी वास्तविक कायेचा कण न् कण मोहरून जावा, त्यावेळी चोरटेपणाने, बळी देतात तसे अंतरपाटासमोर उभे राहावे लागले होते ... भटजींनी अंतरपाट दूर केला त्यावेळी माळ घालवेचना ! ... "

सीतास्वयंवराचे निरूपण पुढे सरकले होते—
इतक्यात आला ग बाई मेला !
दशवदन शैलसा ठेला !
सर्वांस त्रास उदियेला



'इतक्यामध्ये काय झालं महाराज ? डोंगरासारखा प्रचंड रावण येता झाला, पुढे सरसावला अन् —'

जानकीला पुढे ऐकवेना. तिने डोळे गच्च मिटून घेतले. रावण पुढे सरसावतच होता ! ...

रावण ! ...

हो, रावणच तर काय ? नवरा झाला म्हणून काय झालं ? त्याची नजर पडली की चटका बसतो—फुलावर निखारा पडल्यासारखं वाटतं ! त्याच्या संगतीतील बोचकारणारी रात्र—बैलासारखी ती वागणूक ! आपल्याच वाट्याला हा छळ का आला, कोण जाणे ! नवा संसार सुरू होऊन चार महिने झाले असतील—नसतील, पण इतक्यातच अगदी वीट आला. राकट, अडाणी माणसांची कळकट संगत सोसवेनाशी झाली. ! ...

* *

लग्नापूर्वी दारिद्र्यात जगावे लागले तरी जानकीचे दिवस बरे जात होते. आई वारल्यावर बापाचा पाच मुलांचा संसार एकटीच्या अंगावर पडला, तरी त्या खस्ता काढताना असा कंटाळा कधीच वाटला नाही. हे आपले आहे, ही जाणीव मनोमन होती. भावंडांच्या मायेची ओढ होती—रोज तेच काम करताना शिणल्यासारखे वाटले नाही. तसे वाटलेच तर शाळेचा विरंगुळा होता. घर नि शाळा यात दिवस कधीच जाई. शिवाय नशिब थोर, म्हणून पुरुषोत्तमासारखा सालस तरुण शिकवायला लाभला होता ! वयाने वाढलेली मुलगी म्हणून शाळेत जाण्यात मग लाज वाटत नसे—सहावी-सातवीची दोन वर्षे भुर्रकन् गेली. पुरुषोत्तमाने पुस्तके वाचण्याचा नाद लावलाच होता. नाही म्हणायला त्याची बदली झाली तेव्हा जानकीला चुकल्यासारखे वाटले होते खरे. पण उरल्या दिवसांत शाळेतल्या रम्य आठवणी, पुस्तकांची अवीट संगत यामुळे वेळ मजेत जाई ...

पण वयाने वाढलेली मुलगी घरात किती दिवस ठेवायची ? बापाने नाइलाजानेच लग्न ठरविले. त्याला दुःख वाटत होते ते मुलीच्या वियोगाचे नव्हे. घरात बायको नंतर जेवणखाण करायला आता कोण, याच पेचात तो होता ! अखेर एक दिवस एका दिडकीची देखील तोशीस न पडता जानकीचे लग्न लागले. आयुष्याची अशी परवड झाली. जिथे हौशीने संसार सुरू व्हायचा, तिथे त्याच्या पहिल्या विराट् दर्शनानेच धडकी भरली ! दिवस जाता जाईनासे झाले. रोजरोज तेच धुणेपाणी, तेचतेच जेवणखाण, तशीच ओरबाडणारी रात्र—अगदी वीट आला, संसाराच्या रगाड्यातून डोके वर काढताच येईना, मार्गच दिसेना ! ...

... चैत्र उजाडला. रामाच्या देवळातला उत्सव सुरू झाला नि त्या निमित्ताने चार दिवस का होईना, मन कुठेतरी गुंतवता येईल, अशी आशा जानकीच्या मनात मूळ धरू लागली !

—देवळात येताना जानकीला अगदी मोकळे सुटल्यासारखे वाटले. खूपखूप दिवसांनी सुटका झाली होती. वास्तविक सासू परवानगी द्यायची नव्हे. पण तीच जाणार होती कीर्तनाला ! तेव्हा गाड्याबरोबर नाळ्याची यात्रा व्हावी, तशी जानकीही घराबाहेर पडली ! घराच्या बाहेर एकदाचे पडायला मिळाले, हेच खूप, असे मानून ती हरखून गेली. नवरा घरीच राहणार होता, हे तर सोन्याहून पिवळे !

रस्त्यावर मंदमंद चांदणे, मोकळे मोकळे आकाश नि हवीहवीशी हुरहूर लावणारा झुरझुर वारा—आजची रात्र मोठी सुखाची आली होती, कीर्तनाच्या मिषाने देवळात राहायला मिळणार होते.

जानकी देवळात आली. वातावरण शांत पवित्र होते. उदबत्त्यांचा दरवळ सुटला होता. सभामंडपात स्वच्छ हंड्या लोंबत होत्या. त्यात शांत निर्मळ मेणबत्त्या तेवत होत्या. एकेका मेणबत्तीची दोनदोन प्रतिबिंबे काचेत हलत होती. गाभाऱ्यासमोर दोन भल्या समया चकचकत होत्या. त्यांच्या पाच-पाच वातींचा उजेड गाभाऱ्यातल्या संगमरवरी मूर्तीवर पडला होता. राम-सीता-लक्ष्मण—तिघेही सुखात न्हाऊन निघाल्यासारखी वाटत होती. जानकी कितीतरी वेळ तिकडे बघत

राहिली. देहमान विसरून तिथेच उभी राहिली–खिळल्यासारखी !

" ठण्ङ ! "–

मागे घंटा वाजली. भानावर येऊन जानकीने वळून बघितले–

ती दचकलीच.

पुरुषोत्तम,–हो ! पुरुषोत्तमच !

डोळे मिटून हात जोडून तो उभा होता. त्याची गोरीगोमटी, हसतमुख मुद्रा देखणी दिसत होती. आपण आड असतानादेखील तो गाभाऱ्यासमोर उभा होता. अजूनही आहे. दिसत नसून देखील तो उभा आहे–डोळेमिटून !

" कदाचित् आपली तर आठवण–

जानकी चटकन् बाजूला झाली. सर्वत्र पुरुषोत्तमाचीच रूपे तिला दिसू लागली. तो या गावात बदलून आल्याचे तिला कळले होते, तो दिसला-भेटला देखील होता. पण या सुखाच्या क्षणी तो येईल, असे तिला वाटले नव्हते. आश्चर्य करीत ती बायकांत मागे जाऊन बसली. पण पुरुषोत्तमाची मूर्ती तिच्या डोळ्यासमोरून हलेचना ! ...

बुवांनी ' जयजयरामकृष्ण ' करून कीर्तन सुरू केले. आता तरी आपण सावरायला हवे, असे जानकीने आपल्यालाच मनोमन बजावले.

पण छे: !

–पुरुषोत्तम नेमका तिच्या समोरच्या खांबाला टेकून बसला होता. तो आपल्याकडे बघतो आहे, असे तिला उगीच राहूनराहून वाटू लागले. पुरुषोत्तमाविषयी आज असे विलक्षण विलक्षण का वाटते ते तिला समजेना. ती विचार करू लागली–" वास्तविक पुरुषोत्तम आजच नजरेला पडतो आहे, असं नाही. थोड्या दिवसांपूर्वीच तो दिसला होता. नंतर तो एकदा घरी नव्हता का आला ? ' वेळ जात नसला तर पुस्तकं पाठवून देईन ' म्हणाला होता......

पण त्यावेळी त्याच्याबद्दल असा लोभसपणा वाटला नव्हता. नवऱ्याचे रानवट कुरूप टोचत असतानादेखील पुरुषोत्तमाचे नक्षत्रासारखे रूप हवेहवेसे वाटले नव्हते ! आजच्यासारखा वेगळा धुंद भाव त्यात जाणवला नव्हता–अनावर आकर्षण वाटलं नव्हतं–

–आकर्षण वाटलं नव्हतं ?

–मग आजच ते असं उसळून-उफाळून का आलं ?"

*          *

कीर्तनाचा पूर्वरंग संपून उत्तररंग केव्हा सुरू झाला ते जानकीला कळलेच नाही. बुवानी सीतास्वयंवराचे आख्यान लावले होते.

" आयके, अये ऋषिजाये
भज वरिले श्रीरघुराये !......"

सीतेचें हे उद्‌गार ऐकताच जानकीसमोर एक वेगळेच विश्व उभे झाले......आख्यानातली सीता आपणच आहोत नि रामरायांच्या ठिकाणी–

ती लाजली. पण तिच्या डोळ्यांनी तिला जुमानले नाही. ती नकळत पुरुषोत्तमाकडे बघतच होती. सगळ्या कडूगोड आठवणी होत होत्या......

आख्यान पुढेपुढे सरकत होतें–

" रघुसिंहशाव तव उठला,
सावरुनी कुंतलजाला,
शिवचापासनिध आला "–
आला ! आला ! ! ...

जानकीला वाटले, ' आपल्या हातातली माळ थरथरते आहे. पुरुषोत्तम प्रसन्नपणे इकडे येतो आहे. आला, आलाच तो ! अगबाई !

–" कडाड्-कड्-कडाड् ! "

' अं ? हे काय ? पुरुषोत्तम कुठं आहे ? हा भयंकर आवाज कसला ?...'

बुवा निरूपण करीत होते–

" रामानं सहज शिवधनुष्य उचललं आणि महाराज, काय चमत्कार ! त्याला प्रत्यंचा चढविणार तोच ' कडाड्–कड्–कडाड् ' ध्वनी झाला. शिवचाप कडाडून मोडला. पण पूर्ण झाला. सीतास्वयंवर पार पडलं... !

बुवानी मग ' हेंचि दान देगा देवा ' केले. मंडळी उठली.

पण जानकी बसूनच होती. मिटल्या डोळ्यांनी सीता-स्वयंवराचे चित्र बघत वेड्यासारखी अजून बसूनच होती !

कुणीतरी तिला हलवले नि म्हटले, " झोपलीस की काय ग ? ऊठ ऊठ ! कीर्तन संपलं ! "

" कीर्तन संपलं ?" जानकी दचकून पुटपुटली, " संपलं ? छे : ! नुकतच तर कुठे सीतेचं लग्न लागलं ना ? ..."

प्रसाद घेऊन मंडळी पांगू लागली होती. गलबला सुरू होता. खांबापाशी कुणीच नव्हते ! पुरुषोत्तम निघून गेला होता !

जानकीच्या लक्षात येऊ लागले– ' आपण कीर्तनाला आलो आहोत. ते आता संपलं ! आता घरी– घर कुठचं ?...'

तेवढ्यात सासू बाहेरून आली नि तिला म्हणाली,

" अजून तू इथंच ? मला वाटलं तू बाहेर उभी असशील ! ए– इकडे कुठे चालली आहेस ? झोप आवरत नाही नि मग भ्रमिष्टासारखं होतं. चल ऊठ ! जागी झालीस का ? तिकडे बायका वाट बघताहेत. चल ! हं, अशी या इकडच्या दरवाज्यानं ये. हं ! हळू ! काय बाई तरी, झोप आवरत नाही, तर यावं कशाला ?..."

हळूहळू पायऱ्या उतरून जानकी सासूबरोबर देवळाच्या ओवरीत आली. तिथल्या सगळ्याजणी एकदम खळखळून हसल्या. कुणीतरी जानकीला विचारले,

" काय ग, उद्या येणार आहेस ना ?"

जानकीची सासूच जानकीकडे रागाने बघत म्हणाली,

" आज एकदा जाऊंदे बया नीट ! इतकी झोप कसली किळसवाणी !

" तर काय ! "

सगळ्या बायका पुन्हा मोठ्याने हसल्या नि चालू लागल्या.

जानकीची गुंगी आता थोडीशी उतरली होती. चालताचालता तिने वर पाहिले. चांदणे ओसरले होते. रात्र थोडी अधिक दाटली होती. हवेत गारवा होता. वारा झोंबल्यासारखा वाटत होता. देवळाबाहेर पडलेली माणसे कलकलाट करीत थोड्या अंतरावर पुढे चालली होती...

त्याच घोळक्याच्या पुढेमागे कुठेतरी पुरुषोत्तम चालत असेल...! जानकीला वाटले,– ' ही गुंगी सपू नये, हे चांदणं ओसरू नये... ही रात्र, ही चाल अशीच कायम राहावी–पुरुषोत्तम पुढे, आपण मागे ! खरच ! '– मध्येच वाऱ्याची एक झुळूक आली. जानकीने शिरशिरून पदर लपेटून घेतला. चालता चालता तिच्या कानात स्वर रुंजी घालत होते–

–" आयके, अये ऋषिजाये ऽऽ
मज वरिले श्रीरघुराये ! ..."

● ● ●

तो मात्र पुढे पुढे येतो आहे, स्नेहाचे एक एक पाऊल पुढे पुढे टाकतो आहे. हसत. पण ती त्याला पुढे येऊ देणार नाही....

# टेकण

## जयश्री खिरे

ती खाली पाहात वाचत बसलेली असते. वाचनालयात अजून विशेष गर्दी नसते. मधूनच कुणीतरी एखादं येऊन जातं. वर न बघताच ती पुस्तकाचं नाव, नंबर लिहून घेते. सहीसाठी रजिस्टर किंचित् बाजूला सरकविते. यांत्रिकपणे पुस्तक मिळाल्याची सही करणारा तिच्या डाव्या बाजूनं टेबलाशी येतो. तोच त्याचा रस्ता. तो सही करण्यासाठी तिच्याजवळ उभा राहतो. ती किंचित् उजवीकडे झुकते. सही करणाऱ्याबरोबर हवेची झुळुक येते. झुळकीला ती नाकारते तरी ती तिच्या शरीरात शिरतेच. चेहऱ्यावरून ती खाली सरकते थेट कमरेपर्यंत. पुढे ती झुळुक घोटाळते. मग तिला त्रास होतो. ती सही करणाऱ्याकडे पाहत नाही. वर पहायचंच झालं तर ती बाजूच्या खिडकीबाहेर पाहते. पुस्तकांच्या नोंदीचं काम नसलं की तिनं जे पुस्तक वाचायला घेतलेलं असतं त्यात डोकं खुपसते. डोळ्यापुढची अक्षरं वाचली जातात. कधी कधी कितीतरी वेळ पान उलटलंही जात नाही. एकाच पानवरची अक्षरं तिच्या डोळ्यांसमोर मिलिटरीच्या सैनिकांसारखी खडी असतात.

ती बाहेर पाहते. बाहेर दुपार तडकलेली असते. कडकडीत ऊन अंगावर घेत रस्ता सुस्त पडलेला असतो. क्वचित् कुणीतरी गेलं की रस्ता चाळवतो. तिच्या मनाला जाग येते. जाणाऱ्याच्या चालीकडे ती निरखून पाहात राहते. एरवी सारं शांत.

ह्या रणरणत्या उन्हापेक्षा ती संध्याकाळ किती चांगली. येते तीच कशी नाचत बागडत. रस्ता अगदी फुलून जातो. वाचनालयात गर्दी उसळते. तिला भरभर काम करावं लागतं. तरी तिचे हात कधीच दमत नाहीत. सायंकाळ सुरू होण्यापूर्वी ती खिडकीबाहेर पाहू लागते. काही काम नसतं. वाचायचा कंटाळा आलेला. मग ती बाहेर पहात मनात काही साठवू लागते. पाच वाजता त्या समोरच्या दुकानात येणाऱ्या तरुणाची चाल कशी नजर बांधून टाकते. पाहतच रहावंसं वाटतं. ऊन संपल्यावर बाहेर पडणाऱ्या जोडप्यांची चाल कशी धुंद असते. जगाचं भान विसरूनच चालतात की काय कोण जाणे. ते नेहमी जाणारं जोडपं... एकवेळ सायंकाळ चुकेल पण त्यांचं फिरणं... त्या जोडप्यातला तो अगदी भरभर चालतो. ती भरभर चालायचा प्रयत्न करते. पण तिला ते जमत नाही. तसं केलं तर ती थकते. मग आपल्या नेहमीच्या चालीनं चालू लागते. त्याच्या ते लक्षातच येत नाही. तो पुढेच जातो. ती मग चिडून उभी राहते. जागच्या जागीच. त्याच्या ते लक्षात आल्यावर तो मागे पाहतो, ओशाळतो. परत येतो. काहीतरी बोलतो. मग दोघं बरोबर चालू लागतात. त्याची मुद्दाम मंद पडणारी पावलं ती पाहते. तो चालतो... तिच्या गतीनं... तिच्या चालीनं... दिवसा दोन दिवसांआड हे वाचनालयाच्या खिडकीसमोर घडतं.

साडेपाचला कोपऱ्यावरची शाळा सुटते. मग घोळक्याघोळक्यांनी बाहेर पडणारे चिमणे जीव ह्या रस्त्यावरून असे बागडतात, असे धावतात की रस्त्याला अगदी नको करून सोडतात. त्यांची चिमणी पावलं तर तिच्या डोळ्यांपुढून हलायलाच तयार नसतात. आणि नंतर अगदी जपून पावलं टाकीत चालणाऱ्या गर्भारशीची मंद मंद चाल तर तिला पुरी अगतिक बनवते. कशी चालते ही... अगदी तोलून तिच्या पोटात न चालणारी पावलं आहेत. त्या चिमण्या जीवाची चिमणीं पावलं हिच्या चालीत मिसळली आहेत.... ?



तिचं लक्ष समोर वेधतं. समोरच्या म्युझियमचा हा एक कोपरा इथून किती स्पष्ट दिसतो. जुनी भांडी तांब्याची, कसल्यातरी धातूची— आणखी कितीतरी वस्तू. एक दोन शिलालेख नि कोपऱ्यातली ती रेखीव मूर्ती सारखी हसत असते. बघतच रहावं. किती कोरीव... किती सुबक...कमरेपर्यंतच. मूर्तीला

एक संपूर्ण पाय होता. दुसरा मात्र नाही. उत्खननात सापडलेली ही मूर्ती मूळची पूर्ण असावी ...? कुठल्यातरी काळी सपूर्ण गाडली गेली असावी. मग मातीतून बाहेर काढताना ती अशी... पाय तुटलेली निघाली... ती त्या मूर्तीकडे पाहात आपल्या केसावरची माती सारखी झटकू लागते.

बराच वेळ ती काम पाहते. मधूनच पुस्तकातली वाक्यं वाचते. आज त्या वाक्यां-पुढे तिची नजर जात नाही. 'पळता पळता तो थांबला. दम घेण्यासाठी त्यानं मागे वळून पाहिल. पण मागाहून पुन्हा मोटारीचा आवाज आलाच. तो जीव घेऊन धावत सुटला. त्यानं रस्ता सोडला. तो समोरच्या टेकडीकडे धावू लागला'. पळणाऱ्या त्याच्याऐवजी तिला दम लागतो. अंगावर शहारे येतात. ती डोळे मिटून घेते.

'बाई, हे पुस्तक नोंदून घेता ना ?'

बाहेर अंधार पडायला सुरवात होते. तिला चाहूल लागते. त्याच्या येण्याची. ती दचकते. मान अधिक खाली घालते. तो जवळ येतो. ती त्याच्याकडे दुर्लक्ष करते. तो मुद्दाम काही तरी प्रश्न विचारतो. तिला वर पाहा-वच लागतं. तो हसतो. नेहमीच्या पद्धतीनं. तिच्या स्तब्धतेकडे दुर्लक्ष करून तो मग बडबडतच राहतो. शेवटी तो जायला निघतो. मग तिला हायस वाटतं. हा नेहमीच असा उशीरा येतो. कधी एखादा दिवस वाचनालय बंद होईपर्यंत थांबला तर...... घरापर्यंत बरोबर येतो म्हणाला तर...... कशाला ह्याची आपली ओळख झाली ? कशाला आपण ती वाढू दिली ?

तिला आठवतं— इथच त्याची आपली ओळख झाली. झाली कसली— त्यानच मुद्दाम करून घेतली. नाहीतर तिच्या अंत-र्बाह्य स्तब्धतेला हा तडा गेलाच नसता. त्यानंच मुद्दाम ओळख वाढविली. त्याच्या आवडीच्या पुस्तकावर तो तिच्याशी बोलतच राहिला आणि नेहमीचं पुस्तकाचं रजिस्टर लिहीत व वाचत टेबलाशी बसलेली ती ऐकत राहिली, पहात राहिली. ती पहात राही त्याची वेड लावणारी चाल...... वाचना-लयाच्या पायऱ्या उतरताना उडी मारून एकदम दोन दोन पायऱ्या उतरण्याची त्याची लकब.

एकदा तो आलाच नाही. लागोपाठ चार

## माझी कविता

माझी कविता इवले
एक निळे तृणफूल
तुझी पोपटी चाहूल.
माझी कविता दवाचा
चमकता रत्न-थेंब
ज्यात तुझे प्रतिबिंब.
माझी कविता देखणे
लाजलेले ओले ऊन
तुजऐसे हे कुलीन !
माझी कविता विजेचा
तिमिरातील विलास
तुझ्या स्मृतीचा सुवास !
माझी कविता स्वप्नील
स्निग्ध शुक्राची चांदणी
तुझी अनोखी कहाणी !
माझी कविता माझ्याच
मुक्त अस्मितेचे स्मित !
व्हावी तुझ्या ओठी गीत !!

—उ. रा. गिरी

पाच दिवस. ती मग कासावीस झाली होती. काय झालं ? रागावला तो... की आजारी... आपण उगीचच त्याची उपेक्षा केली. तिला वाटलं होतं, नुसतं त्याच्याशी बोलायला काय हरकत होती ? पण नाही...आधी परिचय... मग स्नेह... पुढे... नाही... त्याच्याशी बोला-यचं नाही .. हसायचं नाही. चार पाच दिव-सांनी तो आला होता. मग तिचा निश्चय विरला होता. ती हसली. एकदम उत्साहित झाली होती. त्याच्याशी बोलली होती. जाता जाता बदलून घेतलेलं पुस्तक हातात खेळवत तो म्हणाला होता, 'चार पाच दिवस काही वाचताच आल नाही.'

'का ?' ती एकदम विचारून गेली होती. तसा प्रश्न तिला टाकायचा नव्हता.

'क्रिकेटची मॅच होती ना आमची.' तो निघून गेला होता. हसून.

आणि ती मात्र सुन्न झाली होती. क्रिके-टची मॅच... तिच्या डोळ्यांपुढे तो धावताना दिसू लागला होता. तिनं मनाशी म्हटलं होतं, त्याच्याशी यापुढे बोलायचं नाही. का बोललो आपण ?

मानावर येऊन ती समोर पाहते. तो निघून गेलेला असतो. समोरून एक वृद्ध पेन्शनर येत असतात. थरथर कापणारे पाय. हातातल्या काठीचा आधार... नुसता आधार. पायांत पुणेरी जोडे. पाय थरथरणारे. तरी चालणारे.

'हे नवीन टेबल आता पुरतं ना तुम्हांला?' वाचनालयाच्या पदाधिकारी तिला विचारतात.

'हो.' ती म्हणते.

मग तिच्या लक्षात येत. आपलं टेबल आज बदललेल आहे. पूर्वीच्या लहान टेबला-पेक्षा मोठं. मोठं पण कस छान आहे टेबल. चार भक्कम पायावर कसं डौलदार उभं आहे. चार पाय...भरीव, भक्कम, सागवानी. टेबलापेक्षा खुर्चीचे पाय किती बारिक. पण बसणाऱ्याला तोलून धरणारे. न मोडणारे, न मोडलेले. त्या मानाने ह्या कपाटाचे पाय किती छोटे. पण ह्या बडया ग्रंथासकट पुस्त-कांचा भार ते कसे आनदानं पेलतात. त्याच्या पायांना कळ ठाऊक नाही.

मुलीचा घोळका किलबिलत वाचनालयात शिरतो. वर न पहाताच ती ओळखते. गोऱ्या-पान पायात काळी नाजूक चप्पल घातलेली ही लता देशपांडे. सही इंग्रजीत करते. तिच्या बरोबरची, पायाची नखं रंगवलेली, उंच टाचांची चप्पल घातलेली ही सुनीता कुळ-कर्णी, सॅंडलसचा टक्‌टक् आवाज करणारी ही कुंदा केळकर आणि त्याच्यामागून संथ चालत येणारी ही सौ. सुधा पानसे. पायात साधीच चप्पल आहे. नुकतंच लग्न झालंय हिचं. पोरीचा चिवचिवाट फार वाढतो. तेव्हा तिचे कान त्यांच्याकडे वळतात. कुठल्या तरी ट्रिपबद्दल त्या बोलत असतात. बहुधा बरोबर न आलेल्या सौ. सुधा पानसेला सहलीच्या गमती ऐकवत असाव्यात. तिचे कान त्याच्या-कडे वळतात. मन मात्र मागे उलटं चालू लागत. त्याच्याबरोबर तो स्वत.ला धावताना, झाडावर चढताना पाहू लागते. दोरीच्या उड्या खेळणाऱ्या स्वतःला पहात ती आकडे मोजू लागते. एक...दोन...तीन. ते आकडे संपता सपत नाहीत.

ती भानावर येते. तिची नजर कुंदाच्या पायातील सॅंडलसवर स्थिर होते. कानात त्या मुलीच्या गोंगाटाचा केवढा तरी आवाज होऊ लागतो.

'हे वाचनालय आहे. शांतता ठेवा.' ती त्या मुलीवर ओरडते. त्याच वेळी कुठं तिचं लक्ष त्यांच्या चेहऱ्याकडे जात. नंतर वर पाहण्याचं धैर्य तिला होत नाही. त्याच्या ऐवजी तीच ओशाळी होते.

आता जरा वेळानं वाचनालय बंद होईल. तिला घरी जावं लागेल. जातायेतानाची ही वेळ तिला अगदी नको होते. इथं ह्या ठिकाणी बसायला कसं बर वाटतं. म्हणून तर ती दुपारी घरीच जात नाही. जेवणाचा डबा आणते. उरलेला वेळ वाचते. ह्या वाचनालयात किती पुस्तकं. सारीच तिला आवडतात. सारेच तिचे सोबती, तिला जिव्हाळा दाखवणारे. तिला दिलासा देणारे. त्या तरुणापेक्षा हे तिचे मित्र किती चागले. तिच्याशी बोलतात. तिला हसवतात. तिला रडवतात. पण तिला कधी बोलायला लावत नाहीत. कधी स्वत:बद्दल सागायला लावत नाहीत. तू नुसती ऐकत बसून का राहतेस ? असं विचारत नाहीत. पण तो ... तो तसा नाही. तिला माहित आहे तो नुसत्या बोलण्यावरच थाबणार नाही. तो तिला बोलायला लावणार आहे. तिच्याबद्दल विचारणार आहे. कधीतरी वाचनालय सुटल्यावर तो तिच्याबरोबर घरापर्यंत येणार आहे ... नाही, ती त्याला येऊ देणार नाही. तिला ते नको आहे. त्याच्याकडे ती दुर्लक्ष करणार आहे. उद्यापासून जास्त तुसडेपणानं त्याच्याशी वागणार आहे. त्याचं भरभर चालणं, पायऱ्यांवरून उड्या मारणं तिला मोह घालणार नाही. ती त्याच्याकडे पाहणार नाही.

त्यापेक्षा हे खिडकीबाहेरच जग किती बरं. तिला सुखवणार पण दूर. कधी तिच्याकडे पाहत नाही की तिची विचारपूस करत नाही, आपल्याच धुंदीत चालणारी ती जोडपी, चिमण्या विश्वात दुडदुडणारी चिमणी पावल आणि चिमण्या पावलांचं स्वप्न अनुभवीत जड पावलानी चालणारी ती गर्भारशी स्त्री. कुणीच तिला छेडत नाही. तिच्याशी बोलत नाही. नजरेनसुद्धा, फक्त त्याची पावल, त्याची चाल--तीच तिच्याशी बोलतात, हितगुज करतात. एकेकाच्या चालीचा एकेकाच्या पावलाचा खोल ठसा तिच्या हृदयावर उमटून राहतो. त्या जगात मग ती कुठे कुठे जाऊन येते. कधी त्या जोडप्याबरोबर धुंदीत चालते. कधी त्या चिमण्या पावलांबरोबर लपडाव खेळून येते, कधी उड्या मारत समोरच्या दुकानाच्या पायऱ्या चढते तर कधी त्या गर्भारशीची मंद जड चालही अनुभवून घेते. त्या सर्वांपैकी कुणीच तिला रोखत नाही. तिच्याकडे बघत नाही की तिची दखल घेत नाही.

पण तो...तो मात्र पुढे पुढे येतो आहे. स्नेहाचं एक एक पाऊल पुढे टाकतो आहे. हसत पण ती त्याला पुढे येऊ देणार नाही. मग त्यासाठी तिला त्याचा अपमान करावा लागला तरी चालेल. तिच्या हृदयात कळ उमटली तरी चालेल. तिचं मन मोडून गेलं तरी चालेल.

विषण्ण चेहऱ्यानं निश्चय करीत ती समोरचे कागद आवरते. कसल्यातरी चिडीनं तिचा खालचा नाजूक ओठ दाताखाली चिरडला जातो. आपल्या रेखीव सुंदर चेहऱ्यावरून हातरुमाल फिरवत ती उभी राहते. पातळ नीट करते. मग चालताना ती समोर पाहते. म्युझियममध्ये ठेवलेल्या एका पायाच्या मूर्तीला टेकण असतं.

• • •

## एकदा

मी मेघांच्या संगतीने जलबिंदु झालो एकदा
अन् जलबिंदूंच्या मार्गानेहि सिंधु झालो एकदा
मी समीराच्या नावाने लहर बनलो एकदा
अन् लहरींच्या मिठीतच चिंब झालो एकदा
मी पहाटेच्या कुशीमध्ये फुल बनलो एकदा
अन् फुलण्याच्या नादातच गंध झालो एकदा
मी शब्दांच्या सोबतीने स्वर झालो एकदा
अन् स्वरांच्या चाहूलीतच गीत बनलो एकदा.

—धन्या साठे

## नामदेवास

तुवा घातलेला घास
"दगडा"चा वेव घेई
त्याची जाणीव ठेवून
तुला उच्चपदी नेई
माझा साहेब हुशार
पैसा माझ्या हाती खाई
मला बेड्या घालवून—
स्वत: उच्चपदी जाई...

## रखुमाईस

अबीर गुलाल नित्य उधळती
धूप काकड्यांची चाले सरबत्ती
काय कंटाळून सांग कोमलांगी
जाऊनिया दूर राहिलीस उभी

—मधुसूदन गोखले



टेबलावर आलारामचं घड्याळ दिसत नव्हतं. शामराव टेबलाच्या अधिकच जवळ गेले. थोडेसे गोंधळले आणि त्यांनी बारकाईनं पाहिलं. पाहता पाहता त्यांच्या लक्षात आलं की टेबलावरचा पानाचा डबाही दिसत नव्हता. कोपऱ्यातल्या तवकडीत असणारं जुनाट पेनही जाग्यावर नव्हतं. शामराव सुन्न होऊन पहातच राहिले, झालं तरी काय ? त्यांनी मान वर करून पाहिलं तेव्हा त्यांना खिडकीचा एक गज वाकवलेला दिसला. आता मात्र त्यांच्या चक्क लक्षात आलं की त्यांच्याकडे चोरी झाली आहे !

आयुष्यात त्यांना कधी याचा अनुभव आला नव्हता. पूर्वी त्यांच्या घरी कधी चोरी झाली नव्हती. एवढंच नव्हे, त्यांच्या ओळखीच्या एकाद्या घरीही कधी चोरी झालेली नव्हती. कुठंच कधी चोरी झाल्याचं, पाहिल्याचं त्यांना स्मरत नव्हतं.

शामरावांच्या घरांत कुणी नव्हतं. आठवड्यापूर्वीच बायको मुलांना घेऊन माहेरी गेली होती. शामराव नुकतेच ऑफिसातून आले होते. आणि त्यांनी प्रकार पाहिला तर हा असा !

काय करावं हे काही शामरावांना लौकर सुचलं नाही. थोडा वेळ ते स्वस्थ बसले. नंतर त्यांनी कपाट उघडून पाहिलं. त्यांतील सामान व्यवस्थित होतं. आतल्या खोलीत त्यांनी जाऊन पाहिलं. सर्व वस्तू तेथे ठाकठीक दिसत होत्या. सारं पाहून झाल्यावर त्यांच्या लक्षात आलं की खिडकीचा गज वाकवून चोरट्यानं फक्त टेबलावरचा माल खिडकीतून आत हात घालून लांबवला.

शामरावांनी पुन्हा कोट अंगावर चढवला. पोलीसाकडे जाऊन फिर्याद देण्याच्या तयारीनं ते बाहेर पडले. रस्त्यावर येऊन चालू लागल्यावर त्यांच्या लक्षात आलं की कुठल्या पोलीसचौकीवर जायचं हे आपल्याला माहीत नाही. पण पुन्हा दुसऱ्या क्षणीच त्यांच्या लक्षात आलं की कुठल्याही गेटावर गेलं तरी ते पोलीसच. ते नोंद करून घेणारच ! शामराव घाटे पोलीस चौकीकडे जाऊ लागले.

आदाम गल्लीच्या नाक्यावरच्या चौकीत शामराव मोठ्या विश्वासानं शिरले. तेथे एक हवालदार काहीतरी लिहीत बसला होता. दोन पोलीस संथपणे विड्या ओढीत होते. शामरावांनी मनाशी काहीतरी विचार केला आणि ते त्या दोघांकडे गेले.

" माझ्याकडं चोरी झालीय. "

त्या दोघांपैकी एकानं विडीचा झुरका घेत घेत, एकाद्या झुरळाकडं पहावं तसं शामरावांकडे पाहिलं. तर दुसऱ्यानं त्यांना खुणेनंच हवालदाराला भेटायला खुणावलं.

शामराव हवालदारासमोर जाऊन उभे राहिले.

हवालदारसाहेब काहीतरी लिहिण्यात इतके रंगून गेले होते की त्यांना वर मान करून पाहायला सवडच नव्हती. दहापंधरा मिनिटं त्या अवस्थेत उभं राहिल्यावर मात्र शामराव कंटाळले. त्यांनी शक्य तेवढ्या हलक्या आवाजात हाक मारली——

" फौजदारसाहेब– "

" फौजदार रात्री दहाला येतील. " मान वर न करताच हवालदार उत्तरले.

मोठा धीर करून शामरावांनी विचारलं– " मग तुम्हांला सांगू का ? "

" काय आणलंय ? " असं म्हणत हवालदारांनी मान वर केली. आपल्या आकडेबाज मिशांना उगाचच पीळ दिला. त्यांनी शामरावांना निरखून घेतलं.

शामराव म्हणाले –

" माझ्याकडं चोरी झालीय, लौकर चला. "

" चोर काय आमची वाट पाहत तुमच्या घरी बसलाय का ?... लौकर चला काय म्हणताय ? " हवालदाराने लालसर दिसणारे डोळे उडवले.

शामराव पहिल्या फेरीतच नरमले.

" चोरी - चोरी म्हणत गेटावर पळण्याची लोकांना सवयच झाली आहे ... " हवालदाराच्या या बोलण्याने शामराव सर्द झाले...मनाशी म्हणाले-चोरी झाली तरी शहाण्या माणसाने गेटावर जाऊ नये ... ।

# चोरी प्रकरणांत शामराव

**मधुकर परांजपे**

" माझ्याकड चोरी झाली म्हणून खबर द्यायला आलोय. "

असं म्हणून शामरावांनी ऑफिसातून घरी गेल्यावर कायकाय प्रकार पाहिला ते सविस्तर सांगितलं.

सारं ऐकून झाल्यावर हवालदारांनी विचारलं—

" घड्याळ किती साली विकत घेतलं होतं ? "

" आठवत नाही. "

" कोणत्या मेकचं होतं ? "

" तेही आठवत नाहीं. "

" केवढ्याला घेतलं होतं ? "

" ब्रहुतेक अठरा रुपयाला. "

" बहुतेक नको. नक्की आकडा सांगता येईल का ? "

" आता बरेच दिवस झाले. नक्की आकडा कसा सांगू ? "

" कुठून घेतलं होतं ? "

" दुकानाचं नाव आठवत नाही. "

" बरं, पानाचा डबा केव्हा घेतला होता ? "

" तेही आठवत नाही. "

आपण शामरावांचा नक्षा कसा उतरविला हे दर्शविणारे चेहऱ्यावरील भाव अधिकच स्पष्ट करीत हवालदार म्हणाला--

" पावतीही नसेलच.

" नाही. "

" पेनची तरी काही माहिती आहे का ? मेक, कुठून घेतलं, केवढ्याला घेतलं सांगता येईल का? "

शामरावांना चोरट्यासारखं वाटलं. त्यांनी मानेनंच नकार दिला.

हवालदाराला आनंद वाटला. तो म्हणाला—

" घरी जा परत...शांतपणे साऱ्या वस्तू शोधून पाहा. चोरी झालीय अशी तुमची खात्री झाली म्हणजे मग सगळी व्यवस्थित माहिती टिपून आणा. " असं म्हटल्यावर हवालदार पोलीसांकडे पाहून म्हणाला—

" चोरी झाली, चोरी झाली म्हणत गेटावर पळत सुटण्याची लोकांना सवयच झाली आहे. "

यानंतर हवालदारांनी मिशीला पीळ दिला.

शामराव चौकीतून बाहेर पडले. चौकीत येण्यापूर्वी त्यांच्या मनात जेवढा गोंधळ उडाला होता, त्याहीपेक्षा अधिक गोंधळ आता त्यांच्या मनात उडाला. घड्याळाचा मेक, पावती, कुठून घेतलं, केव्हा घेतलं, कुणी घेतलं, केवढ्याला घेतलं—सारे प्रश्न त्यांच्याभोवती फेर धरून विचकट हास्य करू लागले.

घरी गेल्यावर त्यांनी डोक्यातली घरघर थांबविण्यासाठी एक सिगारेट पेटवली. टेबलासमोरच्या खिडकीचा वाकवलेला गज त्यांना खिजवू लागला. त्यांनी कोपऱ्यातून पावत्या वगैरे अडकविण्यासाठी गेली अनेक वर्षे वाळगलेली तार काढली. तासभर बारकाईनं शोधाशोध केल्यावर त्यांना पानाच्या डब्याची पावती सापडली. पण घड्याळाची आणि पेनची पावती काही सापडली नाही. घड्याळ बावीस रुपयाला घेतलं होतं हें त्यांना अचानक जेव्हा आठवलं, तेव्हा त्यांना भीती वाटू लागली. कारण त्यांनी हवालदाराला तर अठरा रुपयाला घड्याळ घेतल्याचं सांगितलं होतं. पेनचं नक्की काही आठवत नव्हतं. पण पेन बहुधा दोन रुपयांचं असावं असं त्यांना वाटत होतं.

शामराव उठले. पुन्हा त्यांनी कोट अडकवला. वाकवलेल्या गजावर त्यांनी एक पातळ टाकलं. न जाणो, आणखी एकादा चोर यायचा, आणि वाकलेल्या गजाचा फायदा घेऊन आणखी काहीतरी चोरी व्हायची. शामरावांनी खानावळीत जाऊन जेवून घेतलं आणि पुन्हा ते गेटावर गेले. रात्रीचे नऊ वाजत आले होते. हवालदार कुठंतरी पेट्रोलिंगला गेले होते.

शामराव बराच वेळ गेटावर थांबल्यावर हवालदारसाहेब एकदाचे उगवले.

शामरावांनी लगेच उठून त्यांच्यासमोर पानाच्या डब्याची पावती धरली.

हवालदारांनी न पहाताच विचारलं—

" काय आहे ? "

" डब्याची पावती. "

" बरं बसा. "

शामराव मुकाट्यानं बसले. अर्घ्या तासानंतर हवालदारांनी विचारलं—

" हे आता सगळं थोडक्यात सांगा. "

शामरावानी आपण ऑफीसमधून घरी आल्यावर काय प्रकार पाहिला, त्याची खुलासेवार माहिती सांगितली. सगळी माहिती सागितल्यावर आपण पावत्या कशा शोधल्या आणि एकच पावती कशी सापडली, तेही सांगितलं. पेन दोनच रुपयांचं होतं, तेव्हा पावती घेतलीच नसेल असा आपला युक्तिवादही हवालदाराला ऐकवला.

" च्यायला दोन रुपयाचं पेन ते काय आणि त्यासाठी तुम्ही अख्या पोलीसखात्याला हैराण करताय ? मोठी जहागीरच गेली की नाही ?"

शामराव यावर काही बोलले नाहीत. बोलणार तरी काय ? तेवढ्यात पेंगू लागलेला एक शिपाई पुढं आला व म्हणाला—

" हवलदारसाहेब, चहा मागवायचा का?"

हवालदारांनी खुणेनंच शामरावाना चहासाठी पैसे देण्यास खुणावलं. काही इलाजच नव्हता. शामरावानी मागवलेला चहा प्यायल्यानंतर हवलदारानी एक कागद पुढं ओढला व म्हणाला—

" एरवी आम्ही असल्या फालतू चोरीची फिर्याद घेत नाही. पण तुम्ही जरा चांगले दिसताय, तेव्हा घेऊ."

शामरावांनी स्वत:चं संपूर्ण नांव सांगून, नंतर पत्ता सागितला. पत्ता सांगताच हवालदारानी जोरानं कपाळावर हात मारून घेतला.

" च्यायला तुम्ही शिकले सवरले लोक असे अडाण्यासारखे वागता म्हणजे कमाल आहे! "

शामरावाना वाटलं, आपण पत्ता सागायलाच चुकलो. त्यानी घसा खाकरला व पुन्हा एकदा पत्ता सांगितला. हवालदारानं पेनला टोपण बसवून पेन बद करून टाकलं. शामरावाचा नावपत्ता लिहिलेला कागद फाडून टाकला आणि हवालदार शांतपणे म्हणाला—

" तुमचं घर आमच्या हद्दीत नाही. फुकट वेळ घेतलात ! "

शामरावांना पुन्हा एकदा चोरट्यासारखं वाटलं. त्यांनी हलक्या आवाजांत विचारलं—

" मग फिर्याद कुठं देऊ ?"

" आमच्याकडे नाही एवढंच मला माहीत आहे." अस म्हणून हवालदार आपल्या मिशाना पीळ देत दुसऱ्या कामाला लागला. शामराव तेथेच उभे राहिले. थोडा वेळ गेल्यावर पुन्हा त्यांनी विचारल—

" हवालदारसाहेब, सांकळी गेटावर जाऊ का ?"

" जाऊन पहा."

शामराव उठले आणि चालू लागले. थोड्याच वेळात ते सांकळी गेटावर आले. तेथे बसलेल्या हवालदाराला मिशा नव्हत्या, हे पाहून त्याना उगाचच बर वाटलं. मिशीवाल्या पोलीसाचा त्यानी उगाचच धाक घेतला होता.

हवालदारानं शामरावाना समोरच्या बाकावर बसायला खुणावल

" माझ्याकडे चोरी झाली आहे."

" असं ? केव्हा ?"

" बहुतेक सकाळी झाली असेल."

" किती रुपयांचा माल गेला ?"

" घड्याळ वीस एक रुपयाचं, पानाचा डबा आठएक रुपयांचा आणि एक पेन दोन रुपयांचं..... एकूण तीसएक रुपयाचा माल गेला असेल."

हवालदारानं जांभई दिली. समोर बसलेला कॉन्स्टेबल म्हणाला—

" किरकोळ दिसतंय."

हवालदारानी पुन्हा जाभई दिली. कॉन्स्टेबलनं हवालदारांचा इरादा ओळखला. तो शामरावाना म्हणाला—

" चहा मागवा की—"

शामरावाना चहा पिण्याची कल्पना एकदम आवडली. चहा मागवला गेला. चहा पितापिता हवलदारानं-सार काही ऐकून घेतलं. चहा संपल्यावर सिगारेटी झाल्या, पान झालं. शामरावांनी दोनएक रुपये खर्च केले. हवालदारानी आपल्या खाकी पिशवीत टेबलावरचे कागद भरायला सुरवात केली व म्हणाले—

" आता शामराव, तुम्ही सकाळी नऊला या. माझी रात्री आठलाच ड्यूटी सपली आहे. मी उगाचच इथे काम संपवीत बसलो होतो. रात्रपाळीचा जमादार रात्री १२ ला येईल."

" फार वेळ लागणार नाही. मी थोडक्यात सांगतो."

" ते झालं. केस माझ्या ध्यानात आली ......पण कायद्यानं मला फिर्याद घेता येत नाही......सकाळी या."

शामराव आणि हवालदार बरोबरच बाहेर पडले.

दुसऱ्या दिवशी सकाळी शामराव चौकीवर गेले, तेव्हा हवालदार माने काहीतरी कामाच्या गडबडीत होते. कुठतरी दारूची भट्टी पकडली होती. पंचनामे चालले होते. आरोपीना विगरमिशीवाला हवालदार मानेही शिव्या देत होता याचं शामरावाना आश्चर्य वाटलं. वेळात वेळ काढून हवालदार शामरावाशी दोन शब्द बोलले—

" सिगारेट काढा."

त्यानंतर त्यानी दहा मिनिटांनंतर शामरावांना विचारलं—

" तुमचा कोणावर संशय आहे का ?"

" नाही."

" तुम्हांला एक सांगतो एवढं करा. तुमची फिर्याद काय, आम्ही केव्हाही घेऊ. तुमच्या चाळीत बिन्हाडं किती आहेत ?"

" वीसबावीस आहेत."

" तुम्ही काहीतरी निमित्त करून चाळीतल्या सगळ्याकडे जरा जाऊन या. कुठं तुमचा माल दिसतो का पहा. थोडी चौकशी करा आणि मग या."

" पण मला कुणाचा संशय नाही तर जाऊ तरी कुणाकड " ?

" थोडा तपास करा. तुमच्या मालाची तुम्हीही काळजी केली पाहिजे. तुम्ही थोडा प्रयत्न करून तर पहा. "

शामरावांनी हवालदाराना फिर्याद घेण्यासाठी दोनचार तऱ्हेनं विनवून पाहिलं, पण हवालदार काही ऐकेना ! शेवटी हवालदारानी एका नवख्या कॉन्स्टेबलला खूण केली. तो शामरावाच्या कानाशी लागला—

" हवालदार आज बिझी आहेत. तुम्ही काही बदोबस्त केला, तर सांगतो लगेच घ्यायला. "

" बंदोबस्त म्हणजे ? "—शामराव.

" पाचदहा रुपये हवालदाराला देऊन टाका. लगेच काम सुरू करतील. "— कॉन्स्टेबल हसून हलक्या आवाजात म्हणाला.

थोड्याफार टोलवाटोलवीनंतर शामराव तयार झाले. त्यांनी कॉन्स्टेबलला बाहेर नेऊन दहाची नोट दिली. पोलीस स्टेशनवरचा रग

लगेच पालटला. शामरावांना बाकावर बसवल गेलं. हवालदारानी पंचनामे बाजूस सारले. शामरावांची फिर्याद दहा मिनिटात लिहिली गेली. हवालदारानं सबंध फिर्याद स्वतः पुन्हापुन्हा वाचून पाहिली आणि फिर्याद उत्तम झाल्याबद्दल शामरावाना निर्वाळा दिला. शामरावाचा चहा आला, सिगारेटी फुंकल्या गेल्या.

"बरं आहे मिस्टर शामराव—आम्ही आता काम सुरू करतो. उद्या सकाळी येतो तुमच्याकडं."

शामराव खुष झाले. हवालदार मानेला पहिल्या प्रथम त्यांनी पाहिलं तेव्हाच त्याचं मानेबद्दल चांगलं मत झाल होतं. हा हवालदार आपलं काम नक्की तडीला नेणार असं त्यांना तेव्हाच वाटलं होतं.

दुसऱ्या दिवशी ऑफिसला जायच्या वेळेपर्यंत शामरावानी हवालदाराची वाट पाहिली, पण हवालदार फिरकले नाहीत. संध्याकाळी शामराव चौकीवर गेले, पण त्यावेळी हवालदार माने काहीतरी महत्त्वाच्या कामगिरीवर गेले होते.

सातआठ दिवस शामरावानी एकसारख्या फेऱ्या मारल्या, तेव्हा एकदाचे हवालदारसाहेब मोकळे सापडले. चहापाणी झाल्यावर हवालदारांना शामरावची ओळख पटली व जागेचा पचनामा करायला म्हणून हवालदार आपल्या कॉन्स्टेबलचा ताफा घेऊन निघाले. शामरावाना फार आनंद वाटला.

शामरावांच्या घरी गेल्यावर हवालदार मानेनी सगळी जागा बारकाईनं पाहिली व शामरावांनी दहा दिवसापूर्वी दिलेली फिर्याद पिशवीतून काढली.

"हू बोला, मिस्टर शामराव...... कुठली खिडकी? दाखवा पाहू!"

शामरावानी टेबलासमोरच्या खिडकीकडे बोट दाखवलं. हवालदार पुढे झाले. त्यानी खिडकीचे सगळे गज हलवून पाहिले. एकही गज हलतदेखील नव्हता, कोणताही गज वाकल्यासारखा दिसत नव्हता!

मानेनी चेहरा गंभीर केला, व पुन्हा एकदा शामरावाची फिर्याद बारकाईन वाचली. पुन्हा एकदा त्यांनी सगळे गज पाहिले. आपल्या कॉन्स्टेबलला सागून त्याच्याकडून सगळे गज पाहून घेतले. हवालदार अधिकच गंभीर बनले.

## आज

उमटेना पाण्यावर
एकही तरंग नवा
दूर दूर क्षितिजावर
आज नसे रंग नवा.
आज नसे मजजवळी
काहीही रुतणारे
झाकळल्या सांजवेळी
मिटलेले पर्णतुरे.
आज असे स्तब्ध कसा,
जाळीतिल कवडसा—
आज असे खिन्न असा,
शब्दांचा अर्थ पिसा!

—सुमन करमरकर

"मिस्टर शामराव घाटे, तुम्हांला अटक करावी लागणार आहे." शामरावाचा स्वत:च्या कानावर विश्वासच बसेना! आपल्या घरात चोरी झाली आणि आपल्यालाच अटक? त्याना धड बोलताही येईना! त्यांच्या डोळ्यापुढे बेंड्या चमकू लागल्या.

"पण......पण साहेब, मी काय केलं?"

"तुम्ही खोटी फिर्याद दिली आहे...ही पहा तुमची फिर्याद. याच्यावर सही तुमचीच आहे ना?"

शामरावांनी आपणच दिलेली फिर्याद बारकाईनं पाहिली. स्वत ची सही न्याहाळली. त्यात काय वाचायच हेदेखील त्याच्या लक्षात येईना, म्हणून त्यांनी पुन्हा एकदा वाचली. अखेर ते म्हणाले—

"हो, सही माझीच आहे."

"तुम्ही फिर्यादीत स्पष्ट लिहिलं आहे की तुमच्या खिडकीचा गज वाकवून आत हात घालून कुणीतरी चोरी केली आहे—"

"हो...लिहिलंय."

"आणि आता या खिडकीचा तर एकही गज वाकलेला दिसत नाही! सगळे गज भक्कम आहेत. आम्ही आता तसा स्पष्ट पंचनामा करणार आहोत आणि पोलीसाकडे खोटी फिर्याद दिल्याबद्दल तुम्हाला अटक करणार..."

शामरावाना जवळजवळ घेरीच आली. तरी त्यांनी स्वतःला कसबसं सांवरलं. ते पुटपुटले—

"हवालदारसाहेब, तुम्हाला फिर्याद दिल्यावर एकदोन दिवस मी थांबलो होतो व नंतर तो गज दुरुस्त करून घेतला. म्हटलं पुन्हा चोरी होईल."

"दुरुस्त करण्यापूर्वी आम्हांला खिडकी दाखवली होती का?"...आमचा मुळीच विश्वास बसत नाही. कॉन्स्टेबल सुर्वे, या शामरावाना बेड्या ठोका!"

शामराव रडू लागले. ते अक्षरशः हवालदाराच्या पाया पडले. प्रकरण मिटवा म्हणू लागले.

शेवटी हवालदार मानेंच्या चांगुलपणामुळे अवघ्या पन्नास रुपयांत प्रकरण मिटलं. शिवाय फिर्यादीत दिलेले सर्व सामान सापडले आहे, आता काही तक्रार नाही, असे शामरावांनी लिहूनही दिले.

बिगरमिशीवाला हवालदार माने एका मोठ्या चोरीच्या प्रकरणाचा निकाल लावून शामरावाच्या घराबाहेर पडले तेव्हा शामरावाना हायसे वाटले!

• • •

खा दि ष्ट
मिठाईसाठी
शर्मा स्वीट मार्ट
दत्त मंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २

या गढीची माती
हे अेक वेगळंच प्रकरण आहे



# गढी

प्रा. अनंतराव पाटील

आग्रा रोड सोडून गावच्या रस्त्याला लागले की गढीच्या माथ्यावर वसलेल्या शाळेच्या माथ्याचा लाल कौलारू पदर प्रथम नजरेला पडतो. लांबूनच गढीचा माथा नजरेला पडला की गाव आल्याचे समाधान शरीराला व मनाला मिळते. आग्रा रोड सोडून गावच्या रस्त्याला लागताच गावाचे वातावरण सुरू होते. आमचे कुशल, पोरेबाळे यांची विचारपूस अहिराणीतून सुरू होते. नागपूरची मराठी टाकून खानदेशी अहिराणीतून संभाषणे सुरू होतात.

"काय भौ, आते कोठेशे ?"

"नागपूर."

"नोकरीले आसशीन नै भौ ?"

"हौना."

"खूप पगार आशीन नै ?"

"हौना. मितस दोनेकशे."

"वापरे !"

"मंग काय जिभाऊले देस का नै ?"

"देसना."

"वर भौ. पोरवाये ठीक शेतना ?"

"सम्दा ठीक."

"वयखपायख ठेव भौ गरीबस्नी."

संभापण वरेच लांबण्याची शक्यता असते. पण पाय आवरून गाव लवकर गाठायची घाई असते.

पूर्वी गावापर्यंत एस्. टी. नव्हती तेव्हा सडकेच्या फाट्यावरून गावाला येईपर्यंत अशा अनेक कुशल प्रश्नांना तोंड द्यावे लागे. पगार, पोरेबाळे, बायकोचे शिक्षण या साऱ्यांचे कौतुक व आपरुक असे. अनेकदा निष्कारण कौतुकाचा विषय व्हावा लागे. परंतु आता थेट गावच्या भवानीच्या देवळापर्यंत एस. टी. भिडली आहे. त्यामुळे एस. टी. च्या खिडकीतून डोकावलं की प्रथम गढीच नजरेला पडते. एस. टी. तून उतरल्यावर ती काळीकभिन्न गढी माझ्या सामोरी येते. निम्या शिरावर पाय रोवून बसलेली ती तांबडी दगडी शाळेची इमारत मनात जुन्या आठवणी उमळून काढते.

गावच्या गढीबद्दलचे ते गूढ कुतूहल मला अजूनही वाटते. शाळेची ७।८ वर्षे त्या गढीच्या संगतीत काढली; पण अजूनही मला त्या गढीचे गूढ उकलेले नाही. गढीच्या खालून तिच्या पायांना खेटून भात नदी वाहते. गढीचा काळाकभिन्न फत्तर राक्षसासारखा उभा दिसतो. नदीच्या पात्रात पाय टाकून बसलेल्या गढीचे पाय वर्षातून आठ महिने कोरडेच राहतात. पावसाळ्यात मात्र ती पाण्यात मनसोक्तपणे पाय टाकून बसलेली असते. सुटीच्या दिवशी मळ्यात सालदाराला भाकरी पोचवायचे काम आमच्याकडे असे. मळ्याचा रस्ता नदीच्या पायातून गढीच्या बाजूने जातो. नदीच्या कोरड्या पात्रातून जाताना गढीचा तो उंचच उंच उभा कडा अंगावर येतो की काय असे वाटायचे. तो धिप्पाड कडा माझ्या छोट्या मनाला व शरीराला भलताच भयानक व अक्राळविक्राळ वाटायचा. नदीच्या बाजूच्या गढीच्या त्या उभ्या कडांना मोठमोठी भगदाडे असायची–आहेत. त्या गुहेसारख्या वाटणाऱ्या भगदाडामुळे तर त्या गढीचा गूढपणा आणखीनच दाट व्हायचा. लहानपणी आमचा सालदार सांगायचा, ती प्रचंड भगदाडे म्हणजे राक्षसाची घरे. रात्रीच्या वेळी राक्षस तिथे झोपायला येतात. अन् मग काय ? संध्याकाळी मळ्यातून घरी येताना गढीच्या बाजूने तोंड न वळविताच मी घरचा रस्ता काटायचा. न जाणो एखादा राक्षस त्या गुहेच्या दाराशी उभा राहून मला बोलवायचा. नदीच्या कोरड्या पात्रात निर्जन संध्याकाळी त्या भगदाडांचा भयानकपणा भेदरविण्याइतपत वाटे. पुढे थोडी समज आल्यावर ती भगदाडे म्हणजे आमच्या गावच्या डुकरांचे निवासस्थान हे कळल्यावर लहानपणच्या त्या भीतीची स्वत:लाच लाज वाटायची. सुटीच्या दिवशी ४।५ मित्र गोळा करून त्या भगदाडातून डुकरांना हुसकविणे हा मोठा विरंगुळ्याचा व पुरुषार्थाचा विषय होऊन बसला. शाळेत मास्तर जुन्या क्रमिक पुस्तकातल्या 'प्राण्यावर दया करा' म्हणून तळ्यातल्या बेडकांचा तो प्रसिद्ध घडा सांगत व शाळा सुटल्यावर आमची प्राण्यांवरची दया अशी प्रगट व्हायची. मोठमोठी दगडी त्या

भगदाडांत भिरकावून डुकरांना हुसकावणे व किती डुकरे हुसकविली यावरून मित्रमंडळीत आमची पत व शौर्य अजमावले जायचे. एवढे असले तरी भगदाडाच्या अगदी जवळ जाण्याची हिंमत नसे. आपल्या असंख्य पोराना पाजत असलेली डुकरीण कुणी जवळ दिसताच सिंहिणीच्या क्रूरतेने चवताळायची व मग मात्र चड्डी पिवळी व्हायची वेळ यायची. आमच्या गढीतल्या भगदाडांइतकी सुरक्षित व सोईची जागा भारतातल्या कोणत्याही डुकराना नसेल. आमच्या खानदेशांत गढी हे हे मानाचे व खानदानीचे लक्षण समजतात. गढीवर राहाणाऱ्या भुक्कड पाटलाच्या घरी बिनगढीवाला श्रीमत पाटील खुषीने पोर देतो. तद्वतच आमच्या गढीत राहाणारी ती डुकरीण सगेसोयरीकीच्या बाबतीत अशीच उच्चभ्रूपणे वागत असेल का ?

गढीबद्दलच्या गावातल्या आख्यायिका तरफारच सुरस आहेत. कुणा गवळी राजाची ती गढी होती. गढीच्या दक्षिण बाजूला घडीव दगडाचा चिरेबंदी ओटा आहे. त्या ओटयावर गवळी राजाचा राजवाडा होता. राजाने पुरून ठेवलेल्या धनाचे हंडे अजूनही गढीत आहेत अशी समजूत आहे. गावात कुणी अचानक श्रीमंत झाला तर म्हणतात की गढीत धन सापडले का ? आमच्या गावच्या ३।४ श्रीमंत असामींची श्रीमती गढीतल्या धनामुळे आहे असे वडीलधारी मंडळी सागतात.

—मावडू ठाकराची नुकतीच परजवून आणलेली सून अचानक वारली अन् गावात वेगळीच अफवा फोफावू लागली. अमावास्येच्या रात्री त्याने त्याच्या सुनेला गढीची माती खोदून आणायला सांगितली. तिने कुदळीने खणताच कुदळीला हंडा लागला. ती लगबगीने घरी सासऱ्याला सांगायला गेली व तिथेच झपाटून खतम झाली. मावडू शांतपणे तिथे गेला व पाटीत हंडा घालून घरी परतला. काही दिवसानी मावडू भराभर जमिनी, मळे व घरे खरेदू लागला.

—त्या गढीची माती हे वेगळेच प्रकरण आहे. घराच्या भिंती पोतायला इतकी चिकणी व मुलायम माती कुठेच मिळणार नाही. आमच्या गावच्या घराच्या भिंती त्या गढीच्या मुलायम मातीनेच शोभायमान झालेल्या आहेत. गढीची माती ही आमच्या गावची सार्वजनिक प्रॉपर्टी आहे. शिवाय गढीची माती खणताना एखादेवेळी धनाच्या हंडयाची प्राप्ती व्हायची शक्यता असते. परंतु मावडू ठाकरानतर कुणाला हडा सापडल्याची वार्ता नाही. वडीलधारी माणसे म्हणतात. हंडा मिळायला कांही इलम लागतो. तो इलम माहीत नसला तर हंडयाच्या ऐवजी कोळसाच हाती यायचा. आमच्या गावच्या भिलणी रोजगार नसला तर गढीची मातीच खोदतात. एकेक मातीच्या पाटीला पोटाला एक आख्खी भाकर मिळते.

—आमच्या गावच्या गढीच्या मातीची ख्याती दूरदूर सगेसोयऱ्यात पसरली आहे. आमच्या गावच्या पोरी सासरी गेल्यावर जात्यावर गाणी गाताना गावच्या गढीच्या मुलायम मातीला आळवतात. लग्नात उखाणे घेताना गढीच्या मातीचा उल्लेख होतो. सासरी पोरीना डोहाळे सुरू झाले म्हणजे आमच्या गावच्या आया गढीच्या मातीचा खडा पोरीकडे गुपचुप पाठवून देतात.

पिढयान् पिढया गाव गढीच्या मातीचा वापर करीत आहे. परतु गढीची माती संपली नाही. गढीच्या मातीवर शाळेच्या हेडमास्तरचा नैतिक अधिकार आहे. इतर कुणीच हटकू शकत नाही. या हटकण्यावरून एक गोष्ट आठवते. कुळकर्णी हेडमास्तरने एकदा बारकू पाटलाच्या पोरीला गढीची माती नेताना हटकले. रिकामी पाटी व कुदळी घेऊन पोरगी रडतच घरी गेली. तिने बापाला सांगितले. अन् मग काय ? बारकू पाटील संतापाने लाल होत काठी सावरीतच शाळेत आला.

" कोठे शेतो मास्तरडा ? "– बारकू पाटील काठी परजवीत ओरडला.

कुळकर्णी हेडमास्तर व्हराडयात आमचे शुद्धलेखन घेत होते. पाटलाचा चेहरा पाहिल्यावर हेडमास्तरला हा काय प्रकार आहे हे कळेना.

" कायरे मास्तर, गढी का तुना बापनी शेका ? "

" पण काहो पाटील, काय झालं ते तर सागाल की नाही ? "

—पाटलाने त्याच्या अस्सल भाषेत कुलकर्णी मास्तरला बरच सुनवल. कुलकर्णी मास्तरच्या सर्वांचा उद्धार केला. मास्तर गयावया करीत होते. आकाशातल्या वळीवाच्या ढगासारखा गडगडणारा पाटील शिव्या देत निघून गेला.

—आम्हा पोरांना मनापासून आनंद झाला. मास्तरचा बाप काढणाऱ्या पाटलाबद्दल आदर वाटला. कारण कुलकर्णीमास्तर उठल्या बसल्या पोराच्या आईबापावरून शिव्या काढायचा; अचकटविचकट शिव्या द्यायचा. त्यांच्या मारकुटेपणामुळे घरी कुणी सांगायला धजायचा नाही. पाटील गेल्यानतर कुलकर्णीमास्तरने एक गोष्ट केली. ओल्या छडीने त्याने सर्व वर्गाला झोडपून काढले. पाटलावरचा राग त्याने इतर पाटलांच्या पोरांवर काढला. गावच्या स्कूलपंचाच्या चेअरमनकडे तक्रार अर्ज खरडला. त्यात आम्हा पोराची लेखी साक्ष काढली. त्यातल्या त्यात माझे अक्षर चागले म्हणून माझ्याकडून त्या शिवीगाळीचा वृत्तात लिहून चेअरमनकडे सादर केला.

—शाळेच्या बाजूने नदीच्या पात्रात खाली डोकावून पाहिले म्हणजे डोळे गरगरतात. त्या बाजूने भक्कम तारेचे कुंपण होते. परतु कुपणातून हळूच शिरून वरून खालचे नदीचे रिकामे व कोरडे पात्र पाहाण्यात धाडस व साहस होते. पावसाळयात नदीला मोठा पूर आला म्हणजे गढीवरून खालचा पूर पाहाणे हा आगळा आनंद असे. अशा वेळी मास्तरलोकांना पोरांना आवरता आवरता नाकी दम येई. कधी कधी भिल्लांची ती काटक पोरे गढीवरून खालच्या नदीच्या पूर आलेल्या पात्रात बेधडक उडी मारत. अशा वेळी आमचे छातीतले हृदय भीतीने बाहेर डोकावेल की काय अशी भीती वाटायची. त्या लाल गढूळ पाण्याच्या फेसात ते बारके पोर दिसेनासे होई. क्षणभर वाटे सारे आटोपले—पण थोडयाच वेळात पलीकडे भवानीच्या मदिराच्या बाजूला ते पोर हात हलवून आम्हाला खुणा करी. त्याला पलीकडे जिवत पाहिला म्हणजे जिवात जीव येई.

इतर वेळी नदीचे पात्र कोरडे असले तर वरून सरळ घसरगुंडीसारखे खाली नदीच्या पात्रात उतरणे हा काही उपद्व्यापी पोरांचा रिकामा उद्योग असे. परतु ते काही सर्वांना साधेल असे नसे. ठराविक धाडसी पोरेच तो प्रयोग करीत. अन् मग त्याबद्दल त्यांना कोरा कागद, पेणसल, व पट्टीचे बक्षीस असे. परतु एवढयाशा बक्षिसाकरता जीव धोक्यात न घालण्याची पाढरपेशी सुरक्षावृत्ती माझ्यात उपजतच होती.

गढीवर उभे राहिले की गावाकडे येणारा

माणूस ४।५ मैलावरून दिसतो. त्याचा फायदा मास्तरलोक नेहमीच घेत. शाळा-खात्याचा कुठलाही डेप्युटी यायचा तर तिकडूनच यायचा. तेव्हा मास्तराना ताबड-तोब अॅलर्ट होता येई. गाडी, मोटर, तांगा लाबूनच नजरेला पडे. एकदा नव्यानेच लग्न झालेल्या सोनार मास्तरची बायको धुळया-हून यायची होती. लोटन न्हाव्याच्या पोराला गढीवर उभे राहून गाडीची वाट पहायला मास्तरने सांगितले. लाल पडद्याची गाडी दिसल्यावरोबर मास्तरला कळवायचे होते. न्हाव्याच्या पोराच्या मनात मास्तरची गमत करायची लहर आली. गाडी न दिसताच त्याने लाल पडद्याची गाडी आताच गावाकडे भरधाव गेली म्हणून थाप ठोकली. अन् मग काय ? मास्तर खुर्चीत विंचू असल्यागत ताडकन उठून बसले व आम्हांला सुटी देऊन तुरतुर घरी निघून गेले.

दुसऱ्या दिवशी सोनार मास्तरने लोटन न्हाव्याच्या पोराला तोंडातून फेस येईपर्यंत बेदम चोपले.

कधी दिपोटी यायचा असला तर गढी-वरून टेहळणी करण्याकरता पोराची रवानगी व्हायची. दिपोटी मोटरीने केव्हा येऊन थड-केल याचा नेम नसे. एकदा असेच झाले. आमच्या हेडमास्तरने गावात घर बांधायला काढले होते. सातवीची भक्कम पोरे माती विटा चुना या कामाकरता राबत होती. हेड-मास्तराना रजा न काढताना घरी राहाणे जरुरीचे होते. त्यानी २।३ पोराना टेहळणीच्या कामावर ठेवले. डोळयांत तेल घालून आम्ही पहारा करू लागलो. दिपोटीची काळी मोटर लांबून दिसताच आम्ही शाळेतल्या इतर मास्तरांना (त्यावेळी गुरुजी हा मानवाचक शब्द अस्तित्वात आला नव्हता) कळवायचे होते. हेडमास्तरांना घरी जाऊन सावध करायचे होते. पण दिपोटीची काळी मोटर नजरेला पडलीच नाही. त्यामुळे हेडमास्तर निर्धास्त होते. परतु नंतर विपरीतच झाले. नवीन दिपोटी बिलंदर होता. मास्तरांना चकविण्यात तो तरबेज होता. इन्स्पेक्शन-करता तो शाळेत गढीच्या बाजून न येता दुसऱ्या बाजूनेच आला. कुणाला न कळविता दिपोटी अचानक शाळेत शिरला. दिपोटी बुटका होता. आल्या आल्या तो ६ वीच्या वर्गातच शिरला; व एकदम पोरांबरोबर बाकावरच बसला. पोरे एकदम धाबरली. जोग मास्तर टेबलावर पाय लांबवून खुर्ची भिंतीला टेकवून कपाळावरून टोपी ओढून घोरत होते. आता मास्तरला दिपोटी आल्याचे कुणी सांगावे ? आता काय होणार म्हणून पोरे आतल्या आत चुळबुळत होती. दिपोटी घड्याळाकडे बघून वेळ पहात होते. वर्गा-तल्या एकदम अचानक शांततेने जोग मास्त-रची झोप चाळवली. किलकिल्या डोळयानी जोग मास्तरानी वर्गावरून नजर फिरवली. बाकाच्या शेवटी चुळवुळणाऱ्या एका मुलाला त्यानी दरडाविले.

" काय करतो रे साल्या ! काय चूळबूळ चाललीय. गप्प नाही का बसता येत ? "

—गंमत अशी की चुळबुळ करणारा वर्गा-तला मुलगा नसून खुद्द दिपोटीच होते.

पुढे काय झाले ते का सांगायला हवे ?

शाळेच्या अशा अनेक गमती जमती गढीच्या पोटात दडलेल्या आहेत. काही आठवणी फार क्रूर आहेत. एकदा गावात दोन हेल्यांची टक्कर झाली. एकाने दुसऱ्याचा पाठलाग केला. दुसरा हेला गढीकडे पळाला. त्याच्यापाठोपाठ दुसरा-पण गढीकडे पळाला. शाळेच्या आवारात गढीवर पुन्हा टक्कर सुरू झाली. टक्कर सोडविण्याचा प्रयत्न झाला. पण दोन्ही हेले जिद्दीला पेटले होते. त्या टकरीत एक हेला शेवटी गढीवरून खाली कोसळला. त्याच्या लालपाढऱ्या मासाचे तुकडे व रक्त खालच्या कोरड्या पात्रात सर्वत्र विखुरले. डोळयानी पाहिलेला त्या धिप्पाड हेल्याचा चक्काचूर गढीच्या काळ्या फत्तरात चांगलाच कोरला गेला. अजूनही अमावस्येच्या रात्री महिषासुर लालभडक डोळयानी गढीच्या कड्यावर उभा असलेला कधीतरी कुणाच्या नजरेला पडतो म्हणतात.

सातवी फायनलच्या वर्गात अभ्यासाकरता शाळेतच झोपत असू. गढीच्या कुशीत रात्र काढताना अनेक प्रकारची भीती मनात डोकावत. पूर्वीच्या पोराना भेटलेली भुते, चेटूक यांच्या आठवणी जागृत व्हायच्या. अंधाऱ्या रात्री तर जिवाचा थरकाप उडे. २।३ पोराच्या गटांनी बाहेर लघवीला जात असू. आमच्यातला रात्री कुणी झोपेत बरळला तरी मुंज्याची आठवण व्हायची. कुवाऱ्या पोरांना मुंज्या चाळवून नेतो ही भीती सारखी मनात असे. गढीवर पिंपळाचे एक झाड होते. त्यावर मुंज्या रात्री ठिय्या देऊन असतो ही समजूत. मुलांना प्रलोभन दाखवून तो चाळ-वितो असे आई बोलल्याचे आठवते. त्यामुळे आधीच भयानक वाटणाऱ्या गढीतल्या त्या पिंपळाच्या झाडामोवती आणखीनच गूढ वातावरण दाटायचे. रात्रीच्या शांत वेळी काळया अंधारात पिंपळाची पाने सळसळली तरी मुंज्याचे नवे कपडे सळसळल्यासारखे वाटायचे व मनात भयकर भीती वाटायची. त्या पिंपळाच्या बुध्याखाली शेंदूर लावलेला एक खडबडीत दगड व बुंध्याला काळा लाल दोरा गुंडाळलेला असे. त्यामुळे पिंपळामोव-तीचे वातावरण आणखीनच गूढ भासे.

खाली नदीच्या पात्रात गढीच्या काळघा-शार दगडावर आसराचे निवासस्थान होते. आसरा या पाण्याच्या सानिध्यात राहणाऱ्या देवता बायकांना झपाटतात. त्या जागी काळ्या दगडावर शेंदराच्या २।३ जाड रेषा असतात. त्याच्यावर तिथेच गुलाल बुक्का किंवा रंगीत दोरा, धूप असे काही ना काही असे. नदीचे पात्र आठ महिने कोरडेच असे. पावसाळयाचे चार महिने गावच्या बायका गढीच्या पाय-थ्याशी धुण्याकरता जमलेल्या असत. त्याच वेळी येथल्या आसरा कुणाच्या तरी सुनेला, लेकीला झपाटत. सून किंवा मुलगी अशी झपाटल्यावर त्या आसराना हिरव्या बांगड्या, धूप, गुलाल यांचे बोहने दाखविल्यावर त्या शात होत. कुणा एका पाटलाच्या चुकार सुनेला धुणे बडविण्याचा कंटाळा आला होता. तिने अंगात आसरा आल्याचा बहाणा केला. पाटलाने अंगातून आसरा काढणारा भगत आणला. त्या भगताने ओल्या दोराने तिला बांधून पाठीवर चाबूक उठवले. अन् त्यासरशी ह्या आसरा खोट्याच होत्या हे तिने चटदिशी कबूल केले.

गढीच्या पश्चिम कोपऱ्यावर एक थडगे होते. त्यावर दरवर्षी मोहरमच्या दिवसात हिरवागार कपडा गुडाळलेला दिसे. मोहरमच्या रात्री त्या थडग्याभोवती एक पांढरा घोडा नाचतो असे आमच्या गल्लीतला रुस्तुम पिंजारी सांगे. परतु मोहरमच्या रात्री प्रत्य-क्षात जाऊन नाचणारा घोडा पाहण्याचे भाग्य-मात्र कधीच लाभले नाही.

• • •



एकदा एका माकडाने
घर बांधायचे ठरवले
मात्र ते कसे हवे
हे बायकोला विचारले. १

माकडिणीला आनंद झाला
घरोघरी ती फिरली
विचार करून आपली मागणी
माकडासमोर तिनें मांडली. २

" घर असे बांधा की
पूर्वेकडे तोंड हवे,
पश्चिमेचा वारा यावा
गर्दीपासून दूर हवे. ३

मुलांसाठी अभ्यासाची
एक स्वतंत्र खोली हवी
आल्या गेल्या पाहुण्यांसाठी
निराळीच रूम हवी. ४

बाहेरच्या दिवाणखान्यात
छान सोफा-सेट हवा
मर्फि किंवा सीमेन्सचा
एक सुंदर रेडियो ठेवा ५

बेडरूममध्ये डबल पलंग,
त्याला मच्छरदाणी हवी
विसरू नका त्या खोलीत
चावी आणि मोरी हवी ! ! ६

स्वयंपाकघरात बर्नर
बाथरूममध्ये गीझर हवा
माझ्या खोलीत शिवणमशीन
तुमच्या खोलीत इस्त्री ठेवा. ७

बाकी किरकोळ सामानाचे
तुमचे तुम्ही काय ते ठरवा
कमीत कमी सांगितलेले
हे एवढे लक्षात ठेवा. " ८

माकडिणीने मागणी मांडली
माकड मोठ्या चिंतेत पडले,
सारे कसे जमायचे
याचा विचार करू लागले. ९

असले घर थाटण्यासाठी
' क्लास वन् 'ची नोकरी हवी.
शिवाय थोडाफार पैसा
खाण्याचीही संधी हवी. १०

तसली नोकरी मिळवण्याचा
तो प्रयत्न करू लागला
मिनिस्टरांच्या बायकांमागे
वशिल्यासाठी फिरू लागला ११

पण बिचाऱ्या माकडाला
अजून नोकरी मिळाली नाही
माकडिणीचे स्वप्न काही
अजून खरे झाले नाही ! १२

--मधुसूदन गोखले



# माकडिणीचे स्वप्न !



# पोरका पाय !

सीमा कांदळगावकर

माझ्या भोवतालच्या गाद्या-उशा व्यवस्थित करून सगुणा निघून जाते. जाताना पलंगाजवळच्या खिडक्या वंद करून घेते अन् वजावते, " खिडक्या उघड्या टाकू नका हं ! थंडी भरेल !" तिची पाठ वळताच, चादरीखालून एक हट्टी पाय हळूच खिडकी ढकलून उघडून टाकतो. हा माझा पाय फारच लाडोवा झालाय ! मनाला येईल तसे वागायला वघतो ! पहावे तेव्हा याचे भलतेच हट्ट ! आज काय लंगडी खेळायला जाऊ या ! उद्या काय सायकलवरून ट्रिपला... परवा पोहायला .. तेरवा... याचे हट्टच कधी संपत नाहीत. कधी कधी कुणाचंच हा ऐकत नाही. मी नसते तर कदाचित् शंभर, दोनशे, हजारो मैल धावून पळूनसुद्धा गेला असता.

दुसरा पाय चादरीखालीच गुपचुप पडून असतो. हा अगदी गरीव आहे विचारा. पण घरात कुणालाच तो विशेष आवडत नाही. तो आल्यापासून आमचं घरच मुळी वदलून गेलंय ! घराचा, दाराचा, खिडक्यांचा, सगळ्यांचाच रंग पालटलाय ! अभ्यास केला नाही की, ऐकू येणारं वावांचं करड्या आवाजातलं रागावणं, अचानक वंद झालंय ! खूप दंगा केला की, घरात फक्त मलाच मिळणारे आईच्या हातचे धपाटे अदृश्य झाले आहेत. मुद्दाम वोट लावून ओवळे करण्यासाठीच ठेवलेले आजीचे सोवळे खूप दुरावलेय ! आजी तर या पायाकडे पहातसुद्धा नसे ! चुकून नजर पडलीच तर " काय रे देवा हा प्रसंग !" असं काहीसं पुटपुटत डोळ्याला पदर लावते. मला देखील त्याचा फार फाऽर म्हणजे अगदी आभाळाएवढा राग यायचा ! सुरवातीला तर जोरजोरात लाथा मारून याला दूर कुठे तरी फेकून द्यावंसं वाटायचं ! ज्या दिवशीं डॉक्टरकाकांवरोवर हा घरी आला त्या दिवशी तर थडाथड आपटून मोडूनच टाकणार होते ! खरं म्हणजे तो पाय नाहीच ! ते लाकूड आहे ! ! नाही, नाही. तो किनई माझाच पाय आहे. कारण त्याला असलं काही म्हटलं की, फार वाईट वाटतं. मागे मी रागानं त्याला तसं वोलले तर कितीतरी वेळ हुंदके देत रडत वसला होता ! चामड्याच्या पट्ट्यानं गुंडाळलेल्या त्याच्या त्या केविलवाण्या चेहऱ्याकडे पाहिलं आणि माझं मलाच वाटू लागलं कीं, आपण फार दुष्ट आहोत. अगदी सोनसाखळीच्या सावत्र आईइतक्या दुष्ट आहोत ! हा आपला सावत्र पाय आहे अन् त्याचा आपण फार छळ करतोय म्हणून हा असा दुःखी असतो. तेव्हापासून खरं म्हणजे मी त्याच्यावर रागवायचं, चिडण्याचं, सोडून दिलंय ! तरी देखील नेहमीच हा उदासवाणा राहतो. त्याला हसवण्याचा किती कुणी प्रयत्न करा ! कधी म्हणून याची कळी खुलत नाही. याच्याकडे पाहिलं की, मला न हसणाऱ्या राजकन्येची गोष्ट आठवते. तो हसावा म्हणून त्यालासुद्धा मी ही गोष्ट सांगितली होती. पण अंहं ! शेवटी मीच नाद सोडून दिला. त्याच्या वापड्या चेहऱ्याकडे पाहिलं की, मलाही उदासवाणं वाटू लागतं. पापण्या थरथरतात. म्हणून मी झटकन् त्यावर पांघरुण घालते.

खरं म्हणजे याच्यामुळे मला काकांनी दिल्लीहून आणलेल्या जरीच्या सपाता वापरता येत नाहीत. पण आमच्या लाडोवाला त्या चकचकीत चपलांचा मोह काही आवरत नाही. घरात कुणी नाहीसं पाहून तो एकटाच एक चप्पल घालून फिरून वघतो. अन् मग याला विचाऱ्याला वाटतं, आपण सावत्र म्हणून आपल्याला कुणी चपला देत नाहीत ! कसं समजवायचं याला आता ? खाली चौकात जाऊन खेळता येत नाही. दूर कुठे फिरता येत नाही. मग ह्या दुसऱ्या राव-साहेवांची फुणफुण सुरू होते. दणदण आवाज करीत वसतो. सगुणेने सांगितले, " खिडकी उघडू नको " तर हा मुद्दाम ती उघडून टाकतो. वाहेर पाऊल काढून रुसून वसतो. आई मला म्हणते, " राणी, एकटीच काय ग वडवडत असतेस ?" आईला कुठं ठाऊक

**पोरका पाय चादरीखाली पडून राहतो. आईला त्याचा कठीण स्पर्श जाणवतो. ती त्याला जवळ ओढून घेते...**

आहे की, हे दोघेजण नेहमी भांडत असतात ते ! त्यांची भांडणं मलाच मिटवावी लागतात.

अगबाई ! आतून रडण्याचा आवाज ऐकू येतोय ! ताईचा छोटा बाळ रडतोय. पाळण्यात एकटाच असेल बिचारा ! उचलून घ्यावे म्हणून हातपाय उंचावत असेल ! ताईला मी म्हणाले होते की, माझ्या खोलीत त्याचा पाळणा राहू दे म्हणून. पण ऐकलंन् नाही तिनं माझं. आमच्या बाळाचे पाय मला खूप आवडतात. फार छान आहेत ! गुलाबी, गुबगुबीत, छोटे छोटे ! तळवे इतके लाल अन् मऊ आहेत, सारखे त्याचे पापेच घ्यावेसे वाटतात ! माझा उजवा पाय त्यांच्याकडे टक लावून पहात बसतो. मी त्याला दटावून म्हणते, "अरे असं पाहू नये हं बाळाकडे ! त्याला दृष्ट नाही का लागायची तुझी !" तो हिरमुसला होऊन खिडकीबाहेर पाहू लागतो.

रस्त्यावर मुलांचे खेळ चाललेत. खाली चौकात आरडाओरडा चाललाय. अशोकचा आवाज येतोय. क्रिकेट चाललं असावं, लंगडी खेळायचं सोडून दिलेलं दिसतंय ! माझ्याशी उगीचच त्यानं अबोला धरला होता ! लंगडी खेळताना सणसणीत थाप बसली असेल ! म्हणून काय लंगडी खेळायचं सोडून द्यायचं ? मी का मुद्दाम मारलं होतं ? नाही तरी आजी म्हणते तशी मी मुळातच आडदांड ! पण– आता बोलायला काय हरकत आहे ? आता काही मी कुणाला तसं मारणार नाही.

चिव...चिव...चि...चि...चिव––


चिवचिवाटानं नुसतं सगळं घरं भरून गेलंय. आजी म्हणते, "काय मेल्यांनी उच्छाद मांडलाय !" मी मात्र नाही हं तसं म्हणत ! कारण त्यातली एक चिमणी माझी मैत्रीण आहे. पूर्वी दाणा खाऊन उडून जाणारी चिऊताई बरीच धीट झालीय आता ! तिची 'च'ची बाराखडी केव्हा संपणार देव जाणे! टुणटुण उड्या मारीत, इवल्याशा पायावर इवलंसं शरीर सावरीत इकडून तिकडे सदा धावपळ चाललेली असते हिची. तिच्या आईने बहुतेक एक पाय उचलल्यावर दुसरा पाय टाकून 'चाली चाली' करायला शिकवलेलंच दिसत नाही ! कदाचित्–कदाचित् तिचे पाय जुळे असवेत ! त्याशिवाय का अशा उड्या मारता येतील ? तिच्याकडे पहाता पहाता मला देखील तसेच जुळे पाय फुटतात. अन् घरभर मी तशाच उड्या मारत हिंडते.

उदबत्तीचा मंद चंदनी सुवास दरवळतोय. माझ्या आवडीचा सुवास आहे हा. मागे मी डॉक्टरकाकांना म्हणाले होते, "मला चंदनाचा पाय बसवून द्या म्हणजे सुंदर वास येईल !" पण माझ्या पाठीवर हात फिरवून ते नुसतेच हसले ! आजी देवाचा अंगारा घेऊन येईल. तिचे दत्तगुरु माझ्या पायावर कृपा करणार आहेत. तिने कपाळाला लावलेला अंगारा मी माझ्या त्या पायाला लावते अन् डोळे मिटून नमस्कार करते.

वाऱ्याच्या झुळकेने पायावरली चादर दूर होते. बाहेरच्या गमती-जमती पाहून थकलेला खिडकीला टेकून उभा राहिलेला पाय पेंगुळतो; पण त्याला झोप येत नाही. आईच्या अंगावर एक पाय टाकून झोपण्याची लहानपणची सवय अजून गेलेली नाही. आईच्या मऊ, उबदार लुगड्याची वाट पाहात तो ताटकळत राहतो. घरातली सारी आवराआवर करून दमलेली आई येते. ओचेपदर झटकते अन् मला कुशीला घेते. हल्ली मात्र ती चुकूनसुद्धा मला म्हणत नाही, "एवढी मोठी घोडी वाढलीय, तरी झोपताना आई हवी !" खरं म्हणजे तसं पाहिलं तर काही वर्षांपूर्वीपेक्षा आता नाही का मी मोठी वाढलेयं ? आईचं मला काही कळतच नाही ! सख्खा पाय आईच्या अंगावर हळूच रेलून केव्हाच झोपी जातो. एक हात लडिवाळपणे तिच्या गळ्यामोवती पडतो. दुसरा एक पोरका पाय ताठ अंग करून चादरीखाली पडून राहतो. आईला त्याचा कठीण स्पर्श जाणवतो. तिला त्याची तगमग समजते की, काय कोण जाणे ! ती त्यालादेखील जवळ ओढून घेते. तिच्या डोळ्यातल्या ऊन पाण्याचे थेंब माझ्या गालावर ठिबकतात. मी तिला अधिकच जवळ बिलगते.

आता मात्र तेथे कुणीच नसते. कुणाचेच पाय नसतात. सख्खा नाही सावत्रही नाही. तेथे फक्त असते आई, तिची छोटी राणी अन् मंद श्वासांची अंगाई.

● ● ●



सहस्रबुद्धे यांच्या वयाला या महिन्यात साठ वर्षे पूर्ण होत असून आपल्या प्राध्यापकीय व्यवसायातून ते आता निवृत्त होत आहेत. यानिमित्त त्यांच्या वैचारिक कामगिरीची सर्वसामान्य वाचकाला ओळख करून देणारा हा एक साधा, सोपा व सरळ लेख.

# व्यवहारी राष्ट्रधर्माचे व्यासंगी भाष्यकार

# डॉ. सहस्रबुद्धे

चंद्रशेखर मराठे

चांगला निबंध वाचत असताना मला नेहमी एकाद्या वडीलधाऱ्या माणसाचे बोलणे ऐकत असल्यासारखे वाटते. या माणसांनी खूप पाहिलेले असते– अनुभवलेले असते आणि आपल्या अनुभवाचा लाभ नव्या पिढीस करून द्यावा अशी त्यांना तळमळ असते. गेल्या काही वर्षांत साहित्यातील या वडीलधाऱ्या माणसाची भेट दुर्मिळ झाली आहे. निबंध हा साहित्यप्रकार जवळ जवळ लुप्त झाला असून त्याला केवळ शाळा-कॉलेजांतच स्थान उरले आहे. निबंधाची जागा लेख या प्रकाराने घेतली आहे हे खरे, परंतु लेखामध्ये निबंधाची संपन्नता व कळवळा नसतो. केवळ विषय साजरा करण्याची भूमिका असते.

साहित्यप्रकार म्हणून निबंधाचे अस्तित्व असे संपुष्टात का यावे ? मला वाटते ही घटना आपल्या जीवनातील एकंदर बदलाचेच एक चिन्ह आहे. न वाचता लिहिण्याची, व्यासंग नसता विषय साजरा करण्याची सध्याची पद्धत जीवनात सध्या जो एक प्रकारचा तिऱ्हाईतपणा आला आहे, त्याचेच निदर्शक आहे. निबंधाचा आवाका खूप मोठा असतो. एकाद्या सामाजिक वा आर्थिक विषयातील एकादी भूमिका अनेक प्रमाणे देऊन मांडावयाची असे निबंधाचे स्वरूप असते. या प्रकाराची प्रेरणाच मुळी समाजाचे, राष्ट्राचे व व्यक्तीचे काही भले व्हावे ही असते. सामाजिक हिताशी, व्यक्तीच्या भल्याशी साहित्याचा काही संबंध आहे ही भूमिका जसजशी बदलत गेली व साहित्यासाठी साहित्य (वाचकासाठीसुद्धा नव्हे !) ही भूमिका जशी रूढ झाली तसे निबंध या प्रकाराचे प्रयोजनच नष्ट झाले. हेतुशून्यता ललितसाहित्याला मानवली (असे मानले) तरी निबंधाला ती मानवत नाही. निबंध हा नेहमीच हेतुप्रेरित असतो. काही हेतू कारण नसता निबंध आकारच घेऊ शकणार नाही. साहित्याच्या सध्याच्या हस्तिदंती महालात निबंधाला काही कार्य उरले नाही म्हणून तो अस्तंगत पावला असावा.

असे जरी असले तरी निबंधाच्या माध्यमाने सामाजिक व आर्थिक राजकीय विषय हाताळले तर ते किती प्रभावी होतात याचे उदाहरण पाहावयाचे असेल तर श्री. पु. ग. सहस्रबुद्धे यांचे साहित्य वाचावे. श्री. सहस्रबुद्धे यांनी आपले बहुतेक लिखाण निबंधाच्या स्वरूपात केले आहे. हेतुपूर्वक सामाजिक व आर्थिक जीवनाबद्दल काही हेतुप्रधान लिखाण करणारे व अतिशय वाचकप्रिय असे असलेले विचारवंत लेखक म्हणून श्री. सहस्रबुद्धे यांची ख्याती आहे. त्यांचा एक फार मोठा चाहता वर्ग आहे. पु. ग. सहस्रबुद्धे हे नाव मासिकाच्या प्रमुख आकर्षणांपैकी ठरते हा कित्येकांचा अनुभव आहे.

## राष्ट्रधर्म जागरणाची प्रेरणा

गेली कित्येक वर्षे कोणाचाही मुलाहिजा न ठेवता समाजप्रबोधनाचे उद्दिष्ट समोर ठेवून लिखाण करण्याचे व्रत श्री. सहस्रबुद्धे आचरीत आहेत. त्यांच्या निबंधसंपदेची व्याप्ती व समृद्धी पाहून मन थक्क होते. राजकारण, अर्थशास्त्र, धर्मकारण, समाजशास्त्र, मानसशास्त्र अशा ज्ञानाच्या अनेक शाखांतून ज्ञानाचे कण जमा करून श्री. सहस्रबुद्धे यांनी असे एक परिपूर्ण, तत्त्वज्ञान निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे की ज्यायोगे, समाजाचे राष्ट्राचे व व्यक्तीचे हित व्हावे. समाजहिताची ही प्रेरणा सहस्रबुद्धेंच्या लिखाणास एक प्रकारचा विशिष्ट घाट देते. किंबहुना ज्ञानाच्या विविध क्षेत्रांत संचार करणारी त्यांची प्रज्ञा त्या त्या शास्त्रातील असा भागच तेवढा उचलते की जो या त्रिविध हितास उपकारक होईल. मानसिक विकृतीच्या गलिच्छ कथा रंगवून मानसशास्त्राचे एक अक्षरही न कळता त्याचा हवाला देण्याच्या या काळात समाजहिताची ही प्रेरणा फार मोलाची आहे. समाज समर्थ व्हावा, संपन्न व्हावा, त्रिखंडात आपले राष्ट्र मानाने मिरवावे– आणि या सर्व प्रक्रियेत व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व फुलवावे, समृद्ध व्हावे, व्यक्ती, समाज, राष्ट्र यांची मनोमन एकात्मता होऊन त्यातून दैवी संपत्ती निर्माण व्हावी, तिच्या झळाळीत अवघ्यानी न्हाऊन निघावे ही तळमळ सहस्रबुद्धे यांना लिहावयास लावते. या एकाच प्रेरणेने सहस्रबुद्धे लिहितात आणि या प्रेरणेचे वत्सल दर्शन वाचकांना त्यांच्या साहित्यात घडते.



## डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचे ग्रंथ

राजविद्या • भारतीय लोकसत्ता
स्वभावलेखन • विज्ञानप्रणीत समाजरचना
माझे चिंतन • वैयक्तिक व सामाजिक
लपलेले खडक • पराधीन सरस्वती
• लोकसत्तेला दंडसत्तेचे आव्हान •

सहस्रबुद्धे यांचा प्रत्येक निबंध पूर्णाकृती असतो. त्यांना जो विचार मांडावयाचा आहे त्याचे सर्व बाजूंनी ते विवेचन करतात. त्या विचाराशी संबंधित असा, जवळजवळ सर्व सामाजिक शास्त्रातील भाग, ते निबंधामध्ये आणतात. इतिहासाच्या पानांमधून त्या विचारास पोषक असे साक्षीपुरावे जमा करतात. त्या दृष्टीने त्यांचा निबंध म्हणजे ऐतिहासिक व तात्त्विक अशा दोन्ही विवरणपद्धतींचा अवलंब करून निर्माण केलेली एक विचाराची साखळीच होय. त्यांचा कोणताही निबंध वाचला की वाचकास त्या विषयाची काही माहिती तर मिळतेच. शिवाय त्या विषयावर आणखी काही वाचन करण्याची प्रबळ इच्छा होते. याखेरीज त्यांच्या निबंधातील विचारप्रक्रियेतून कोणत्याही मुद्याचा विचार कसा करावा याचीही थोडी कल्पना वाचकास येते. सामाजिक व आर्थिक क्षेत्रातील एकाद्या विचारप्रवाहाबाबत वाचकास व्यापक अशी कल्पना द्यावयाची व त्या विषयाबाबत त्याचे कुतूहल जागृत करावयाचे हे निबंधाचे कार्य सहस्रबुद्धे यांचा निबंध प्रायः नेहमीच करतो.

कोणत्याही सामाजिक स्वरूपाच्या घटनेबद्दल, विचारप्रवाहाबद्दल एका विचारशील व व्यासंगी मनात स्फुरलेले विचार, असे सहस्रबुद्ध्यांचे स्वरूप आहे. त्यांच्या एकाएका निबंधात जी संगती दिसते तीच संगती त्यांच्या संपूर्ण निबंधसाहित्याचा विचार करता दिसते. त्यांच्या सर्व साहित्यामध्ये 'व्यवहारी राष्ट्रवाद' या तत्त्वज्ञानाची उभारणी त्यांनी केली आहे. हे करताना त्यांनी रूढ अर्थाने परस्परविरोधी अशा राजकीय तत्त्वज्ञानातून आवश्यक तेवढा भाग घेतला आहे. या व्यवहारी राष्ट्रवादाच्या तत्त्वज्ञानाची निर्मिती करताना त्यांनी ज्ञानाचे वा मनाचे कोणतेही क्षेत्र त्याज्य मानलेले नाही. धर्मकारणापासून अर्थशास्त्रापर्यंत व अंधश्रद्धेपासून बुद्धिवादापर्यंत सर्वातून त्यांनी आपल्या तत्त्वज्ञानासाठी आवश्यक तो आधार घेतला आहे. या समृद्धतेमुळे त्यांचे हे तत्त्वज्ञान बरेच प्रभावी होते. 'व्यवहारी राष्ट्रवादाचे भाष्यकार' म्हणून सहस्रबुद्धे यांना त्यांचा वाचकवर्ग ओळखतो.

या एका तत्त्वज्ञानाच्या कसोटीवर ते समाजजीवनातील सर्व घटना व प्रवाह पारखून बघतात. जेथे त्यांना विसंगती दिसेल, पोरकटपणा दिसेल, भेकडपणा दिसेल तेथे त्याच्यावर ते हमला चढविल्याशिवाय राहात नाहीत. व्यवहारी राष्ट्रवाद या शब्दसमूहात 'राष्ट्रवाद' या शब्दाइतकेच किंवा त्याहून अधिक महत्त्व 'व्यवहारी' या शब्दास आहे. राष्ट्रवाद प्रखर व्हावा, विजयशाली व्हावा आणि त्याचबरोबर आपली मर्यादाही सोडू नये यासाठी जी पथ्ये पाळावयाची ती सर्व या एका "व्यवहारी" या शब्दात येऊन जातात.

### इतर प्रेरणांची दखल

सहस्रबुद्धे यांच्या व्यवहारी राष्ट्रवादाचे वैशिष्टच हे की त्यामध्ये मानवी मनाच्या सर्व गुणधर्मांची दखल घेतलेली आहे. प्रचलित ठोकळेबाज राजकीय वाद मानवी मनाच्या एकाएका गुणावर भर देतात. जसे साम्यवाद मनुष्य म्हणजे राजकीय प्राणी समजतो वा भांडवलशाही मनुष्याकडे केवळ आर्थिक प्राणी म्हणून पाहते तसे सहस्रबुद्धे पाहात नाहीत. ते मानवाकडे एक एकसंध व्यक्तित्व या नात्याने पाहतात. मानवी मनाला आवश्यक वाटणारी सर्व मूल्ये —श्रद्धा, चिकित्सा, अहंभाव, सामाजिक जाणीव इत्यादि— व त्यांचे कार्य सहस्रबुद्ध्यांनी ओळखले आहे. व्यवहारी राष्ट्रवादाच्या तत्त्वज्ञानात या सर्व मूल्यांचा परिपोष योग्य तऱ्हेने होईल असा त्यांचा प्रयत्न दिसतो.

मानवी मनाच्या चांगल्या गुणधर्मांची व प्रेरणांची दखल त्यांचे तत्त्वज्ञान घेते. शिवाय व्यक्तिगत पातळीवर दोषस्वरूप भासणाऱ्या काही निकृष्ट भावना, उदाहरणार्थ— द्वेष, हिंसा, मत्सर वगैरे— यांनीदेखील राष्ट्रवादाचे स्वरूप अधिक परिणामकारक होऊ शकेल असे प्रतिपादन सहस्रबुद्धे करतात व ते अनेक प्रमाणे देऊन सिद्ध करतात. मानवी मन जसे नाही तसे कल्पून त्यानुसार तत्त्वज्ञान उभारण्याने काही फायदा नाही. उलट जसे ते आहे त्याचे स्वरूप यथार्थपणे जाणून त्याचा सर्वांचा एकत्रित उपयोग राष्ट्राच्या व व्यक्तीच्या

हितासाठी कसा होईल हे पाहण्याची सहस्रबुद्धे यांची दृष्टी असते.

एकच उदाहरण देतो. चागल्या अर्थाने प्रखर बुद्धिवादी असूनसुद्धा सहस्रबुद्धे यानी धर्मभावनेला आपल्या राष्ट्रवादात आवर्जून स्थान दिले आहे. साम्यवादी राष्ट्रानासुद्धा अखेरीस या सनातन प्रेरणेची कास कशी धरावी लागली हे स्पष्टपणे विशद करून श्री. सहस्रबुद्धे असे प्रतिपादन करतात की धर्मप्रेरणा ही मूलभूत प्रेरणा आहे. तिला योग्य वळण लावल्यास राष्ट्ररचनेच्या कार्यात ती फार मोठे कार्य करू शकते. धर्मभावनेतील श्रद्धा बुद्धिवादात कशी बसू शकते ? तर त्याचे उत्तर असे की राष्ट्ररचनेतील श्रद्धेचे कार्य बुद्धीच्या साहाय्याने आकलन झाले असता, श्रद्धेची हेटाळणी करणे हे अबुद्धिवाद होईल. खऱ्या बुद्धिवाद्याप्रमाणे सहस्रबुद्धे श्रद्धेचे हे महत्त्व ओळखतात आणि तिला आवर्जून योग्य ते स्थान देतात.

सहस्रबुद्धे याचा आणखी एक विशेष असा की मनुष्य म्हणजे बुद्धिवादाच्या साहाय्याने नेहमी चालणारा प्राणी असे ते समजत नाहीत बरेच विचारवंत ही चूक करतात. बुद्धी व तर्क यापेक्षा अन्य प्रेरणा मानवी जीवनात आहेत हे सहस्रबुद्धे जाणतात व त्या सर्व प्रेरणाचा समन्वय करून राष्ट्रवादास त्या पोषक व्हाव्यात असा त्यांचा प्रयत्न असतो. थोडक्यात म्हणजे सहजप्रेरणाना माणसाळविण्याची (डोमिस्टिकेट) प्रक्रिया सहस्रबुद्धे याना अभिप्रेत आहे.

भारतीय जनतेची शतकानुशतके जी हीनदीन परिस्थिती आहे तिच्या दर्शनाने सहस्रबुद्धे व्यथित होतात. या दुःखद परिस्थितीस व्यक्ती किती प्रमाणात जबाबदार आहे– समाज किती प्रमाणात जबाबदार आहे असा त्याचा विचार सुरू होतो. त्यातून मग व्यक्ती व समाज यातील परस्परसबंध मानवी जीवनातील राजकीय, आर्थिक, सामाजिक भाग व त्यातील परस्परसंबंध, पृथ्वीच्या पाठीवरील निरनिराळ्या देशाचा उत्कर्ष-अपकर्ष–त्याची सर्व बाजूने संगती व पुन्हा या सर्वांच्या विचारानंतर भारताची दैन्यावस्था पालटण्यासाठी कोणत्या मूल्याची जोपासना करावयास पाहिजे, व्यक्ती व समाज याचे परस्परसबध कसे असावेत, दोहोंस किती मर्यादेपर्यंत स्वातत्र्य द्यावे अशा अनेक विषयावर सहस्रबुद्धे याच्या निबंधांत विचार आढळतो. या एवढ्या प्रदीर्घ वैचारिक मंथनामागे जनतेची सद्य स्थिती व ती पालटण्याची आवश्यकता या दोन गोष्टी सदैव उभ्या असतात.

सहस्रबुद्धे याच्या ग्रंथांची नुसती नावे जरी वाचली तरी त्यामागील भूमिका समजते. 'राजविद्या' 'लोकसत्तेस दडसत्तेचे आव्हान' 'वैयक्तिक व सामाजिक' 'पराधीन सरस्वती' 'भारतीय लोकसत्ता' या नुसत्या नावामध्ये चागल्याच्या विजयाची सदैव इच्छा करणारी व त्याच्यासाठी अविरत प्रयत्नशील अशी प्रज्ञा आपली ओळख पटवून जाते. या सर्व पुस्तकात त्यांनी भारतीय जीवन, व्यक्तिजीवन, त्याबरोबरच राष्ट्रजीवन– अधिक उन्नत कसे होईल याचे विवेचन केले आहे. त्याचे विवेचन कोणास पटेल, 'कोणास पटणार नाही. पण या सर्व विवेचनात माणसाच्या स्वाभाविक चागुलपणावर व जनतेच्या सामर्थ्यावर त्याची जी श्रद्धा दिसते ती प्रत्येकास जाणवते.

### लोकसत्ता, दंडसत्ता, राष्ट्रवाद

माणसाच्या व जनतेच्या सामर्थ्यावर अपार श्रद्धा हे सहस्रबुद्धे याचे फार मोठे सचित आहे. जनतेच्या सामर्थ्याला ते महाशक्ती म्हणून सबोधतात व ही महाशक्ती कोणताही चमत्कार घडवू शकेल असे त्याना मनोमन वाटते. भारतीय जनतेच्या दुरवस्थेने, अधश्रद्धेने, अज्ञानाने, दारिद्र्याने व दैववादानेसुद्धा सहस्रबुद्धे याच्या या श्रद्धेस तडा गेला नाही हे त्यांच्या बुद्धिवादाचे वैभव आहे. या सर्व दोषाचे अत्यत सडेतोड असे विवेचन करणारे कठोर सहस्रबुद्धे जनतेच्या महाशक्तीच्या स्मरणाने पुलकित होतात. हे सर्व दोष घालवून भारतभूमी परत सुवर्णभूमी होऊ शकेल व भारतीय जनताच हे करील हा त्याचा विश्वास आहे.

जनतेबद्दल अशी जवळीक व श्रद्धा असल्याने सहस्रबुद्धे याना लोकशाहीबद्दल फार अगत्य वाटते. मानवाच्या वाटचालीतील हा एक महान प्रयोग आहे आणि तो यशस्वी झाला पाहिजे अशी त्यांना फार तळमळ आहे. गेल्या काही वर्षांत जगात ठिकठिकाणी लोकशाहीस जे एक आसुरी आव्हान मिळत आहे, काही ठिकाणी लोकशाहीची पीछेहाट होत असल्याचे दृश्य दिसत आहे या परिस्थितीचा सहस्रबुद्धे याच्यावर खूप परिणाम झाला. लोकशाही पद्धतीचे मूलभूत स्वरूप, सामर्थ्य, मर्यादा व पथ्ये यावर त्यानी सखोल विचार केला. लोकशाहीविरुद्ध ज्या शक्ती उभ्या आहेत त्याच्या स्वरूपाचाही त्यानी असाच साकल्याने विचार केला. या दोन्ही पद्धतीविषयी त्यांनी विस्तृत वाचन केले. या सर्व विचारवाचनाचे निष्कर्ष त्यानी 'लोकसत्तेस दडसत्तेचे आव्हान' या ग्रथात समाविष्ट केले आहेत. एक मूलग्रामी व नेमका अभ्यास म्हणून या ग्रथाचे महत्त्व आहे.

या ग्रथात व त्याच्या इतर ग्रथात असे एक परिपूर्ण प्रतिपादन आढळते की लोकशाही असो वा हुकुमशाही असो, यशस्वी व्हायचे असेल तर या दोन्ही राज्यपद्धतीस राष्ट्रवादाचा आश्रय घेतल्यावाचून गत्यतर नाही. राष्ट्र ही बूर्झ्वा कल्पना आहे असे सागणाऱ्या मार्क्सपासून क्रातीची प्रेरणा घेतलेल्या सोव्हिएट रशियात कसोटीच्या क्षणी हेच आढळून आले की राष्ट्रवादावाचून तरणोपाय नाही. नव्या निष्ठा जनतेस अद्यापि बाधू शकल्या नाहीत. साम्यवादी चीनमध्येही राष्ट्रवादाची अति प्रखर उपासना चालू आहे. ही सर्व उदाहरणे देऊन सहस्रबुद्धे म्हणतात की राष्ट्रवाद हे समाजाचे प्राणतत्त्व आहे. तो नसेल तर समाज नामशेष होईल. कोणत्याही आर्थिक, राजकीय समाजरचनेत अभ्युदय साधावयाचा असेल व सामर्थ्यशाली व्हावयाचे असेल तर राष्ट्रवाद हीच एकमेव गुरुकिल्ली आहे. सहस्रबुद्धे याच्या राष्ट्रवादात व्यक्तीच्या व समाजाच्या सर्व प्रेरणांचे विरेचन व उदात्तीकरण होते. कोणतीही प्रेरणा मूलतः वाईट व म्हणून त्याज्य हे त्याना मान्य नाही. नैसर्गिक प्रेरणाना वाव देण्याची राष्ट्रवादाची क्षमता हे राष्ट्रवादाचे खरे सामर्थ्य आहे.

**सध्या रशियात व अन्य काही देशात जे असामान्य ऐहिक यश प्राप्त झाले आहे त्याचा तेथील दंडसत्तांशी काही संबंध नाही; तसेच काही देशांच्या पीछेहाटीशी तेथील लोकशाहीचा काही संबंध नाही. अपयश व यश यांतील हा फरक केवळ राष्ट्रवादाच्या उपासनेवर अवलबून आहे. दंडसत्ताक देशांचे यश हे तेथील दंडसत्तांचे नसून राष्ट्रवादाचे आहे हे अत्यत निस्संदिग्ध भाषेत सहस्रबुद्धे यांनी सिद्ध केले ही त्यांची वैचारिक क्षेत्रातील सर्वांत मोठी कामगिरी होय.** राष्ट्रवादाची हेळसाड, राष्ट्रीय चारित्र्याकडे दुर्लक्ष हे लोकशाहीच्या पीछेहाटीस अवलबून असून लोकशाही पद्धतीत कोणताही मूलभूत

दोष नाही हे त्यानी स्पष्ट केले आहे. हे फार महत्त्वाचे आहे. नव्याने लोकशाहीचा स्वीकार करणारे देश अभावितपणे असे समजू लागतात की आता लोकशाही सर्व काही करू शकेल. या समजुतीमुळे त्याचे राष्ट्रवादाकडे दुर्लक्ष होऊ लागते व त्यामुळे त्यांची पीछेहाट होते वा तेथे दडसत्ता अवतीर्ण होते. राष्ट्रवादाची जोपासना सूक्तासूक्त मार्गाने करून देशाचा अभ्युदय साधते. यावरून असा भ्रम निर्माण झाला आहे की लोकशाहीपेक्षा दडसत्ता अधिक गतिमान व विकासक्षम असते. हा भ्रम नाहीसा करण्याचे कार्य सहस्रबुद्धे यानी केले आहे.

दडसत्तेच्या आव्हानास तोड द्यावयाचे असेल तर लोकशाहीस अतिप्रखर असा राष्ट्रवाद निर्माण केला पाहिजे. एका अर्थाने राष्ट्रवाद हा समाजाचा स्वधर्म आहे. सध्या समाज ज्या अवस्थेला पोहोचला आहे त्या अवस्थेत राष्ट्रवाद हा समाजाचा स्वधर्म आहे. विश्ववाद अद्याप लांब आहे. ग्रामवाद आता कालबाह्य झाला आहे. या परिस्थितीत राष्ट्रवाद हाच समाजाचा स्वधर्म आहे. काही भ्रात तत्त्वज्ञानाच्या आहारी जाऊन या स्वधर्माला टाळू बघणे म्हणजे सामाजिक आत्मघात करण्यासारखे आहे. राष्ट्रवादाची ही अपरिहार्यता सहस्रबुद्धे नेमक्या शब्दात स्पष्ट करतात.

राष्ट्रवाद हा घटक लोकशाही व दडसत्ता या दोहोंत गृहीत धरला तर लोकशाहीच अधिक यशस्वी होईल यात शंका नाही.

**राष्ट्रवाद–अनेक प्रेरणांचा समन्वय**

राष्ट्रवाद हे अतिशय प्रभावी हत्यार आहे अशी इतिहासाची साक्ष आहे. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धापासून जगाचा सर्व इतिहास म्हणजे राष्ट्रवादाच्या विजयाचा इतिहास आहे. पण त्याचबरोबर हेही खरे आहे की राष्ट्रवादाने मर्यादा सोडली की तो अतिशय अनिष्ट ठरतो व अती राष्ट्राच्या अधःपातास कारणीभूत होतो. दोन्ही युद्धात जर्मनीचा उदय व अस्त झाला तो राष्ट्रवादाने त्याची मर्यादा सोडल्यामुळेच. अमर्याद राष्ट्रवादाचे धोके दोन. अतर्गत दृष्टचा ज्या व्यक्तीचे मिळून राष्ट्र बनते त्या व्यक्तीनाच अमर्याद राष्ट्रवादात काही स्थान उरत नाही, त्यांना केवळ बाहुली बनविण्यात येते. आतरराष्ट्रीय दृष्टचा अमर्याद राष्ट्रवाद किती अनर्थकारी ठरतो याची साक्ष दोन्ही महायुद्धाच्या इतिहासावरून पटते. असे होऊ नये यासाठी राष्ट्रवाद व्यवहारी पाहिजे. कोणत्याही विचारपद्धतीतील चांगला भाग त्याने सतत स्वीकारला पाहिजे. इतर पद्धतीतील सामर्थ्य ओळखून त्यानुसार सतत परिवर्तनशील राहिले पाहिजे. विशेषतः **राष्ट्रवाद ही स्वतंत्र प्रेरणा नसून व्यक्ती व समाजजीवनातील अनेक प्रेरणांचा समन्वय आहे हे जर विसरले तर राष्ट्रवाद हा अत्यंत भयानक होऊ शकेल.** अतिरेकी राष्ट्रवादात नेमके हेच होते. इतर प्रेरणा राष्ट्रवादाच्या अंकित समजल्या जाऊ लागल्या की राष्ट्राचा अपकर्ष होतो. थोडक्यात म्हणजे राष्ट्रवादाचे कार्य पतप्रधानासारखे आहे. सर्व प्रेरणास व प्रवृत्तीस कार्यप्रवण करावयाचे व त्याच्या समन्वयातून विकासाची एकात्म प्रक्रिया अखड ठेवावयाची हे या पतप्रधानाचे कार्य आहे. हे विसरून राष्ट्रवाद जर हुकूमशहाप्रमाणे वागू पाहील तर त्यास इतर प्रेरणा– धर्म, जाती, कुटुंब, स्वार्थ, सहकार्य देण्याचे नाकारतील व खुद्द राष्ट्रवादाचे सामर्थ्यच संपुष्टात येईल. चागल्या प्रवृत्तीचा परिपोष करावयाचा, वाईट प्रवृत्तीच्या विरेचनास शुभ कार्यासाठी राबवून घ्यावयाचे ही राष्ट्रवादाची राजविद्या आहे.

वर एका ठिकाणी म्हटल्याप्रमाणे भारतीय जनतेच्या दैन्यावस्थेने व भारताच्या विकल अवस्थेने सहस्रबुद्धे विचारप्रवण होतात व या परिस्थितीची मीमासा करू लागतात. त्याचबरोबर स्वतत्र भारताने आतापर्यंत जी वाटचाल केली आहे ती त्यांना आश्वासक वाटते. या प्रगतीतून पुढील उत्कर्षाची त्याना प्रसादचिन्हे दिसतात. लोकशाहीच्या या महान प्रयोगात धोक्याच्या जागा कोणत्या व त्या कशा टाळावयास पाहिजेत याचे ते विस्ताराने विवेचन करतात. त्याच्या विवेचनाचे सूत्र मुख्य एकच. ते म्हणजे व्यवहारी राष्ट्रवादाशिवाय गती नाही. भारताचा विकास व्हावयाचा असेल तर अव्यवहारी, भ्रातिनिष्ठ मूल्ये उराशी न बाळगता व्यवहाराच्या कठोर पण सत्यभूमीवर आपल्या नेतृत्वाने उतरले पाहिजे असे त्याना वाटते. राष्ट्रीय चारित्र्याची जोपासना केली, जनतेच्या महाशक्तीस कार्यप्रवण केले, प्रत्येक घटकाने आपली जबाबदारी पार पाडली तर भारत सपन्न होईल, समर्थ होईल अशी त्याची श्रद्धा आहे. गेली अनेक शतके भारतीयानी राष्ट्रवादाची, सघविद्येची करटेपणाने हेळसांड केली असे सहस्रबुद्धे यांना वाटते. याची त्याना अतिशय चीड येते. त्यानी एका ठिकाणी असे म्हटले आहे की, पाव खाणाऱ्या मनुष्यास परत समाजात येणे अत्यत दुर्लभ होते. पण स्वजनद्रोह करणारे विनासायास समाजात परत येत असत. धार्मिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रात भारतामध्ये व्यक्तिगत रीत्या फार मोठा पल्ला गाठला गेला होता. तथापि या सर्व क्षेत्रातील ' सामाजिक जाणीव ' येथे नसल्याने भारताची सतत पीछेहाट होत गेली. ही सामाजिक जाणीव राष्ट्रवादाचा पाया आहे. व्यक्तिगत मूल्याची जाणीव व त्याचा देदीप्यमान आविष्कार हा राष्ट्रवादाचा कळस आहे. व्यक्ती आणि समाज याच्यात जेव्हा प्राकृतिक एकात्मता निर्माण होते, दोहोचे हितसंबध जेव्हा– नियमन व पूर्ती याच्या योगाने– एकच होतात, या दोहोंतून निर्माण होणारी शक्ती जेव्हा हेतुनिष्ठतेने कार्यप्रवण होते आणि विश्वकल्याणास राष्ट्राचा अंशतः तरी हातभार लागतो तेव्हा राष्ट्रवादास राष्ट्रधर्माचे तेज चढते. अशा राजस व सात्त्विक, विजिगीषु पण सहिष्णु, स्थिर पण गतिमान अशा राष्ट्रधर्माची जोपासना जोपर्यंत राष्ट्र अनन्यभावाने करील तोपर्यंत त्यास कोणीही आव्हान देऊ शकणार नाही असा या राष्ट्रधर्माचा– समाजाच्या स्वधर्माचा– महिमा आहे. या राष्ट्रधर्माची पताका फडकावीत ठेवण्याचे, परिस्थितीच्या भोवऱ्यात सापडून किंकर्तव्यमूढ झालेल्या जनतेस या पताकेने दिलासा देण्याचे व राष्ट्रधर्मास जागण्याचे आवाहन करण्याचे कार्य सहस्रबुद्धे सातत्याने आणि श्रद्धेने करीत आहेत.

समाजपुरुषास तुष्टीपुष्टी यावी म्हणून सहस्रबुद्धे यांनी ज्ञानाचे कण ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रातून वेचले आहेत. त्यासाठी अपार कष्ट केले आहेत. त्याच्या या भगीरथ प्रयत्नाबद्दल समाज त्याचा ऋणी राहील यात शका नाही. त्याच्या निबंधसाहित्यातील ज्ञानाचे हे वैभव मराठी साहित्याचे एक महत्त्वाचे भूषण होईल, झाले आहे यातही तिळमात्र शका नाही. त्याच्या निबधसाधनेमागील समाजहिताची प्रेरणा सर्व थरामध्ये सक्रमित होईल व ही प्रेरणाच आपल्यापुढे असलेल्या महान प्रश्नाची तितकीच महान उत्तरे स्वतःच्या अगभूत प्रज्ञेने शोधून काढील तेव्हा सहस्रबुद्धे याच्या या साहित्यज्ञानाची गौरवशाली सागता होईल.

● ● ●

[पृष्ठ १६ वरून चालू]

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

या सैन्याने १४ मार्च १९२० रोजी, हॉफमनचे सोशल डेमोक्रॅटिक सरकार पदच्युत करून ज्या जागी संपूर्ण उजव्या गटाचे सरकार व्हॉन् काहर याच्या नेतृत्वाखाली स्थापन केले.

आता बव्हेरिया हे सैन्याधिकाऱ्यांचे एक मोहोळच बनले होते. लुडेन्डोर्फ हा हिंडेनबुर्गच्या हाताखाली सेनापती असला तरी महा-युद्धाची शेवटची दोन वर्षे तो जर्मनीचा अनभिषिक्त सर्वाधिकारी होता. युद्ध संपले. एबर्ट (Ebart) हा 'वायमार' प्रजासत्ताकाचा पहिला अध्यक्ष व शीडमन (Scheidemann) हा पहिला चॅन्सेलर झाला. लुडेन्डोर्फ हा स्वीडनमध्ये वेषांतर करून पळून गेला होता.

आता बव्हेरियात पुनः सैन्याच्या हाती राजकारणाची सूत्रे येताच लुडेन्डोर्फ म्युनिकमध्ये परत आला. फेब्रुवारी १९१९ मध्ये आपल्या बायकोला त्याने पत्र लिहिले. त्यात तो लिहितो–

"आम्हांला क्रांतिकारकांनी जिवंत ठेवले हा मोठाच मूर्खपणा आहे. मी जर पुन्हा अधिकारावर आलो तर मुळीच दया वगैरे दाखवणार नाही. एबर्ट, शीडमन आणि कंपूला मी फासावर चढवल्या-खेरीज राहाणार नाही..."

असा हा लुडेन्डोर्फ म्युनिकमध्ये आला होता.

ज्यांनी व्हर्सायच्या तहावर सह्या केल्या त्यांतील एक बव्हेरिअन नेता मथाईस एरबरगर याचा म्युनिक येथे दिवसाढवळ्या खून कर-ण्यात आला. जेथे सैन्य हे राज्यकर्तेपद मिरवीत होते अशा या बव्हेरियात हिटलरही येऊन दाखल झाला होता.

हिटलरने आल्याबरोबर बव्हेरियन सैन्यात आपली भरती करून घेतली. परंतु आता सैन्याने प्रत्यक्ष राजकारणात भाग घेण्यास सुरु-वात केलेली असल्यामुळे हिटलरची नेमणूक सैन्याच्या राजकीय खात्यात करण्यात आली. या खात्यामार्फत सैनिकांना राजकीय पाठ देण्यात येत असत. एकदा सैन्यापुढे असेच व्याख्यान चालू असताना वक्त्याने 'ज्यू' सबंधी काही बरे उद्गार काढले. हिटलरला ते सहन झाले नाही. त्याने उठून शंका विचारण्याच्या निमित्ताने आपली एकांगी मते .. मोठ्या दिमाखाने मांडली. परिणाम असा झाला की श्रोता खूष झाला. सैनिकांनी टाळ्या वाजवल्या. लगेच हिटलरला सैन्यात शिक्षणाधिकारी म्हणून बढती मिळाली. या अधिकाऱ्याचे मुख्य काम म्हणजे सैनिकांमध्ये बेदिली माजेल असे सोशॅलिझम-विषयक विचार प्रसृत होणार नाहीत याची काळजी घेणे! म्हणजे जर्मनीत नुकतेच स्थापन झालेले प्रजासत्ताक राज्य स्थिर करण्याची हमी ज्या सैन्याने दिली होती त्यानीच सैन्याला अधिकाधिक प्रजा-सत्ताकविरोधी बनवण्याचा हा उद्योग होता.

### वक्तृत्वगुणाची जाणीव

मात्र हिटलरला ही नोकरी फारच पथ्यावर पडली. मोठमोठ्या सैनिकसमुदायापुढे भाषणे करण्याची संधी त्याला आयतीच चालून आली त्याने शिक्षणाधिकारी म्हणून पहिले जाहीर भाषण करताच त्याच्या ध्यानात आले की वक्तृत्वाचा गुण त्याच्यापाशी होताच. आपल्याला चांगले बोलता येईल अशी त्याची भावना होती. आणि आता पहिल्याच भाषणानंतर त्याची खात्री झाली की उत्तम वक्तृत्व हे त्याच्या उपजत गुणांतच जमा होते. युद्धात विषारी धुराच्या हल्ल्यात तो सापडल्यामुळे आवाज बिघडला असेल असे त्याला वाटत होते. परंतु तसे काहीही झालेले नव्हते. शब्दाचे आरोह, अवरोह, आवाजातील कंप तो आपल्या इच्छेनुसार करू शकत होता. शिरर सांगतो–

"This was a beginning of a talent that was to make him easily the most effective orator in Germany, with a magic power, after he took to Radio, to sway millions by his voice."

[ही नुसती सुरुवात होती यांच वक्तृत्वगुणाच्या जोरावर लवकरच हिटलरची जर्मनीतला अत्यंत परिणामकारक वक्ता म्हणून ख्याती झाली. पुढे तो जेव्हा रेडिओवर भाषणे देऊ लागला तेव्हा त्याच्या आवाजाने तो लक्षावधी श्रोत्यांना मंत्रमुग्ध करू लागला.]

सप्टेंबर १९१९ मध्ये हिटलरला सैन्याच्या राजकीय खात्यातून आज्ञा झाली की .. 'जर्मन वर्कर्स पार्टी' नावाची राजकीय संघटना जन्माला आली आहे .. तिचे स्वरूप काय आहे ते प्रत्यक्ष पाहून त्याचा अहवाल पाठवावा. सर्वसाधारण कामगार-वर्गाच्या संघटनांकडे त्या कम्युनिस्ट असतील या भीतीने सैन्य साशंकतेनेच पाहात असे.

लवकरच म्युनिकमध्ये 'जर्मन वर्कर्स पार्टी'ची एक सभा झाली. या सभेला हिटलर उपस्थित झाला. यावेळी राजकीय सभा एखाद्या बिअर हॉलमध्ये घेण्याची पद्धत होती. अशाच एका सभागृहात सुमारे पंचवीस माणसे जमली होती. फेडेर नावाच्या वक्त्याने लहानसे भाषण केले व तो खाली बसला. या भाषणावर आक्षेप घेण्यासाठी एक प्रोफेसर उभे राहिले. या प्रोफेसरांनी आपल्या भाषणात... बव्हे-रियाने प्रशियापासून फुटून निघावे व ऑस्ट्रियाच्या मदतीने दक्षिण जर्मनीचे स्वतंत्र राज्य स्थापावे असा तोडगा सांगितला. ही कल्पना म्युनिकमध्ये चर्चिली जात होती ही गोष्ट हिटलरला माहित होती. परंतु प्रत्यक्षात एका वक्त्याच्या तोंडून ती ऐकताच हिटलर संतापाने लाल झाला. त्याला स्वस्थ राहवेना. प्रोफेसर मजकुरांना उत्तर देण्यासाठी तो पुढे सरसावला. असल्या फुटीरपणाचा निषेध करणारे जळजळीत भाषण त्याने केले. या भाषणातील एकराष्ट्रीयत्वाचे आवा-हन इतके प्रबळ होते की भाषण संपण्यापूर्वीच त्या प्रोफेसरमहाशयांनी सभागृहातून काढता पाय घेतला!

हिटलर खाली बसला. जमलेल्या लोकांनी त्याचे अभिनंदन केले. सभा पांगली व हिटलर बाहेर पडणार तोच त्याच्या मागोमाग धावत एक व्यक्ती आली व तिने एक लहानसे चोपडे त्याच्या हातात दिले.

ही व्यक्ती म्हणजे अँटन ड्रेक्सलेर (Anton Drexler) ही होय. नॅशनल सोशॅलिझमचा हाच प्रणेता म्हणावयास हवा. आजारी वाटावा

असा किरकोळ आणि डोळचाला चष्मा लावणारा हा माणूस म्युनिकच्या रेल्वे वर्कशॉपमध्ये घिसाडी काम करीत असे. १९१८ च्या मार्च महिन्यात त्याने 'कमिटी ऑफ इंडिपेंडन्ट वर्कमेन' नावाची एक संस्था सुरू केली होती. या कमिटीचा उद्देश कामगारांना मार्क्स तत्त्वज्ञानापासून वाचवणे हा होता. जर्मनीला न्याय मिळावा व याकरता झालेला अन्याय्य तह रद्द करण्यात यावा अशी या कमिटीची आणखी एक मागणी होती. सुमारे चाळीस सभासद ड्रेक्सलेरने मिळवले होते. अशाच वृत्तीची आणखी एक संघटना कार्ल हारर् (Karl Harrer) नावाच्या वृत्तपत्रप्रतिनिधीने स्थापन केली होती. तिचे नाव होते "पोलिटिकल वर्कर्स सर्कल." जेव्हा ड्रेक्सलेर याचा हाररशी परिचय झाला तेव्हा दोघांनी आपापल्या संघटना विलीन करून 'जर्मन वर्कर्स पार्टी' स्थापन केली होती. हारर् हा बऱ्यापैकी वक्ता होता. त्यामुळे ही संघटना थोडीफार टिकून राहिलेली होती.

त्या सभेच्या दिवशी हिटलरला घरी यायला रात्र झाली. पहाटे जाग आल्यावर उठून त्याने त्याच्यापाशी दिलेली पुस्तिका चाळून पाहाण्यास सुरुवात केली. पुस्तिकेचे नाव होते, 'My political awakening (माझी राजकीय जागृती). या पुस्तिकेवरून हिटलरच्या एक गोष्ट ध्यानात आली की ड्रेक्सलेरच्या पक्षाची मुख्य तत्त्वे दोन होती—

१ कामगारांची संघटना उभी करणे;

२ सोशल डेमोक्रॅटिक संघटनेप्रमाणे ही संघटना जर्मन राष्ट्रीय भावनेपासून विचलित होऊ न देणे.

थोडक्यात जर्मन राष्ट्रीयत्वाची कामगारात जोपासना करणारी ही संघटना होती.

पुस्तिका चाळून झाली. मग वाचून झाली. तोपर्यंत सकाळ उजाडली. हिटलरला आश्चर्याचा धक्काच बसला. पोस्टाने एक कार्ड त्याच्या नावे आले व त्यात त्याला 'जर्मन वर्कर्स पार्टी'चा सभासद करून घेण्यात आल्याचे कळवण्यात आले होते. हिटलरला या आगाऊपणाचे हसू आले. परंतु गंमत म्हणून या पक्षाच्या पुढच्या सभेला तो गेला.

सभा नेहमीप्रमाणे सुरू झाली. नवा सभासद म्हणून त्याचे स्वागत झाले. मग मागील सभेचा अहवाल झाला. तो मंजूर झाला. मग फक्त 'सात' मार्क एवढा प्रचंड फंड असलेल्या रकमेचा जमाखर्च मंजूर करण्यात आला. अध्यक्षांनी त्यांना आलेल्या एकदोन पत्रांची दखल घेतली. हिटलरला हे सर्व सोपस्कार हास्यास्पद वाटले. निष्कारण कालापव्यय आणि संस्था चालविण्याचे बेगडी समाधान त्याला नको होते. क्षणभर तो विचारात पडला की या संस्थेचे सभासदत्व घ्यावे की नाही! त्याला एक गोष्ट मात्र स्पष्ट दिसत होती. येथे जमलेल्या माणसांना भूक आहे ती एका नव्या राष्ट्रीय पक्षाची! ते ज्या मार्गाने निघाले आहेत तोच जर्मनीच्या उद्धाराचा मार्ग आहे. त्याच्या हे लक्षात आले की ज्या संघटनेत आज नेतृत्वाच्या अभावी मरगळ आहे अशा संघटनेतच आपल्या कर्तृत्वाला वाव आहे. दोन दिवसांच्या संपूर्ण विचारांती हिटलरने जर्मन वर्कर्स पार्टीचे सभासदत्व स्वीकारले. या आपल्या निर्णयासंबंधी हिटलर लिहितो—

"It was the most decisive resolve of my life. From here there was and could be no turning back!

[हा माझ्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा निर्णय होता. आता या निर्णयानंतर माघार घेणे शक्य नव्हते—मागे वळून पाहणेही शक्य होणार नव्हते.]



हिटलरने जर्मन वर्कर्स सोसायटीचे सभासदत्व स्वीकारले

या जर्मन वर्कर्स पार्टीमध्ये हिटलर येण्यापूर्वीच दोन प्रमुख सभासद दाखल झाले होते. त्यांची ओळख वाचकांनी आताच करून घेतली पाहिजे. यांतला एक म्हणजे कॅप्टन एर्न्स्ट रोएम (Ernst Roehm) व दुसरा डिट्रिश एक्कार्ट (Dietrich Eckart)

रोएम हा सैन्यात अधिकारी होता. त्याच्या नाकाच्या वरच्या भागाचा टवका युद्धात उडाला होता. पुढे नाझी पक्षाच्या स्टॉर्म ट्रूपर्सचे नेतृत्व याचेकडे आले. सैन्य सोडून गेलेले बेकार तरुण, आणि जुने निवृत्त सैनिक यांची भरती मुख्यतः रोएम यानेच नाझी पक्षात केली. प्रजासत्ताक उलथवण्याच्या हिटलरच्या यशात याचा वाटा प्रमुख होता. १९३४ मध्ये हिटलरनेच याचा खून केला.

एक्कार्ट हा हिटलरपेक्षा २१ वर्षांनी मोठा होता. हा विनोदी वृत्तीचा पत्रकार होता. सामान्य दर्जाचा कवी होता, आणि बऱ्यापैकी नाटककार होता. इब्सेनचे Peer Gynt हे नाटक त्याने रूपान्तरित केले होते. हा मनसोक्त दारू पीत असे. ज्यूंचा नायनाट करून आर्यन रक्ताच्या जर्मनांचे राज्य स्थापन केले पाहिजे अशी हिटलरप्रमाणे याचीही ठाम भावना होती. हिटलरला एक्कार्टने अनेक प्रकारे साहाय्य केले. त्याने त्याला वाचनासाठी निवडक पुस्तके पुरवलीच आणि शिवाय म्युनिकच्या सांस्कृतिक वर्तुळात त्याने हिटलरविषयी आपुलकी निर्माण करून ठेवली. रुडॉल्फ हेस आणि आल्फ्रेड रोझेनबर्ग याना एक्कार्टनेच नाझी संघटनेत खेचून आणले. या माणसावर मात्र हिटलरची अखेरपर्यंत श्रद्धा राहिली. हिटलरने 'माइन काम्फ' पुस्तकाच्या अखेरच्या ओळीत एक्कार्टचा गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे.

नाझी पक्षाच्या गगोत्रीत अशी ही विविध मंडळी एकत्र आलेली होती. याच जलौघाचा पुढे फेसाळता, उग्र प्रवाह झाला आणि त्याच्याच रेट्यात जर्मनी हा युरोपातील सर्वांत बलाढ्य देश होऊन फक्त तेरा वर्षांत जर्मनीचे वैभव दोस्तांच्या मनात धडकी उत्पन्न करू लागले. घिसाडी काम करणारा ड्रेक्स्लेर्, कवी आणि नाटककार एक्कार्ट, अर्थशास्त्राची प्रमेये उलगडू पाहणारा फेडेर, दांडगट रोएम् याच्या या टोळीला एकतीस वर्षे वयाचा, उनाड प्रवृत्तीचा हिटलर येऊन मिळाला.

व्हिएन्ना शहरात घालवलेल्या भुकेकंगाल आयुष्यात ज्या कल्पना हिटलरच्या मनात अनेक वेळा घोळत असत, परंतु ज्याचा उच्चार करण्याची संधी त्याला आजवर मिळाली नव्हती, ती या संघटनेच्या प्रचारकार्याच्या निमित्ताने आता त्याला उपलब्ध होऊ लागली. पक्षात दाखल होताच, पहिली जी पक्षाची सभा झाली, त्यासाठी हिटलरने प्रथमच हस्तपत्रके वाटली. सभेत त्याने केलेल्या भाषणाने श्रोत्यांची अंत करणे हेलावली जाऊन, पक्षाच्या साहाय्यासाठी जागचे जागी ३०० मार्कस् जमा झाले. ७ मार्कस् फंड असलेली कर्जबाजारी संघटना एकदम हिटलरने कर्जमुक्त केली.

या यशाचा परिणाम म्हणून १९२० च्या सुरवातीला हिटलर पक्षाच्या प्रचारकार्याचा प्रमुख झाला. ख्रिश्चन सोशॅलिस्ट पार्टीच्या कामकाजातील प्रचारयंत्रणा हिटलरने व्हिएन्नात पाहिली होती. त्या धर्तीवर आता हिटलरने पक्षाच्या वतीने मोठाल्या सभा आयोजित करण्याचे ठरवले. अशी पहिली हजारोंची सभा २० फेब्रु. १९२० ला हिटलरने घेतली. पक्षाच्या इतर सभासदांनी हिटलरला मूर्खातच काढले. जेमतेम तीस-चाळीस माणसांची सभा पाहिलेल्या पक्ष-सभासदांना या सभेची कल्पनाच करवेना ! कार्ल हारर् हा लगेच पक्ष सोडून निघाला.

या सभेत हिटलर हा प्रमुख वक्ता म्हणून बोलणार नव्हता. डॉ. डिंगफिल्डर नावाच्या एका पक्षसदस्याच्या गळयात, त्याने प्रमुख वक्तेपणाची माळ अडकवलेली होती. सभेला सुमारे २-३ हजार लोक जमले होते. या सभेने आपल्या पक्षाचे छोट्याशा क्लबचे स्वरूप पालटून जनतासंपर्काला सुरुवात झाली, असे हिटलरने नमूद केले आहे.

या सभेचे वर्णन करताना आपल्या पुस्तकात हिटलर म्हणतो—

" मी बोलावयास उभा राहिलो, तेव्हा सभागृहात चोहोबाजूंनी परस्परविरोधी आरोळयांनी वातावरण भडकलेले होते. सोशॅलिस्ट व कम्युनिस्ट पक्षाचे लोक सभेत घुसून धुडाई करू पाहात होते. हळहळू माझा आवाज घुमू लागला. आरडाओरडा क्षीण होत होत अखेर माझ्या आवाजात विलीन झाला. सुमारे चार तासानंतर जेव्हा मी खाली बसलो, तेव्हा माझी खात्री होऊन चुकली की आमच्या पक्षाची तत्त्वप्रणाली ही आता जर्मन जनतेत हळूहळू पसरू लागली आहे.

या सभेत हिटलरने आपल्या पक्षाचा पंचवीस कलमी कार्यक्रम जाहीर केला. हा कार्यक्रम आखण्याचे काम ड्रेक्स्लेर, फेडेर व हिटलर यानी केले होते. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने, 'जर्मन वर्कर्स पार्टी' हे पक्षाचे नाव अपुरे वाटू लागले. अखेर १ एप्रिल १९२० रोजी पक्षाचे नवे नामकरण झाले—

**" नॅशनल सोशॅलिस्ट जर्मन वर्कर्स पार्टी "**

या पंचवीस कलमी कार्यक्रमातील फारच थोडी कलमे हिटलरने पुढे प्रत्यक्ष अमलात आणली. मात्र त्यातील प्रमुख कलमे सर्वच्या-सर्व नाझी पुढाऱ्यानी अमलात आणली. त्यातील दोन खालीलप्रमाणे होती :

(१) सर्व जर्मन भूभागाचे एकीकरण करून विशाल जर्मनी प्रस्थापित करणे.

हिटलरने चॅन्सेलर होताच ऑस्ट्रिया आणि सुडेटेनलॅन्डचा कबजा घेतला तो याच कार्यक्रमाच्या पूर्तीसाठी ! याच कार्यक्रमाला अनुसरून त्याने पोलंडच्या डँझिग बंदरावर हल्ला चढवताच १९३९ साली दुसरे महायुद्ध भडकले.

(२) ज्यू लोकांना जर्मनीचे नागरिकत्व देऊ नये व सर्व सरकारी अधिकारावरून त्यांची हकालपट्टी करावी.

या दुसऱ्या महत्त्वाच्या कार्यक्रमाची अमलबजावणी तर हिटलरने अमानुषपणे केली. २ ऑगस्ट १९१४ नंतर जे ज्यू जर्मनीत घुसले, त्या सर्वांना त्याने अत्यंत क्रूरपणे जर्मनीबाहेर पिटाळून लावले.

याशिवाय जो कार्यक्रम दिलेला होता त्यात, श्रमाने न मिळविलेल्या पैशाची जप्ती, सर्व विश्वस्त निधींचे राष्ट्रीयीकरण, मोठ्या कारखानदारीच्या नफ्यात सरकारचा वाटा ठेवणे, जमिनीवरील सारामाफी, देशद्रोह्यांना देहान्त शासन, मध्यमवर्गाला आर्थिक दिलासा, अशा अनेक गोष्टी होत्या.

विशाल जर्मनीच्या निर्मितीच्या या कार्यक्रमानंतर क्रमांक दोनवर मागणी होती की... व्हर्सायचा तह ठोकरण्यात यावा ! क्रमांक पंचवीसवर स्पष्टपणे सांगितले होते की मध्यवर्ती सत्ता बर्लिनमध्ये बळकट करणे हे पक्षाचे ध्येय आहे.

वस्तुत. बव्हेरियामध्ये प्रशियातून फुटून निघावे, या कल्पनेचा जोर होता. ज्यावेळी हिटलरने आपला पंचवीस कलमी कार्यक्रम बव्हेरियात जाहीर केला त्यावेळी बव्हेरियात बर्लिनची सत्ता जवळ जवळ नव्हतीच. असे असूनही काहीसे लोकमताविरुद्ध जाऊन... सामर्थ्यसंपन्न मध्यवर्ती सत्तेचा आग्रह हिटलरने धरला, याचे कारण केवळ बव्हेरियाचा भविष्यकाळ त्याच्या नजरेपुढे नव्हता. सर्व जर्मनीच्या उत्थापनासाठी त्याला सत्ता हवी होती. आणि बव्हेरिया हा जर्मनीचा केवळ एक भाग होता. तात्पुरत्या लोकप्रियतेकडे पाठ फिरवून विशाल जर्मनी आणि सामर्थ्यवान मध्यवर्ती सत्तेचा आग्रह

हिटलरने धरावा, यात त्याच्या देशभक्तीचा आणि धूर्ततेचा प्रत्यय येतो. शिरर यासंबंधात याचा निर्वाळा देतो–

" When his Party was hardly known outside Munich, he was casting his eyes on further horizons even at the risk of losing popular support."

(स्वतःचा पक्ष म्युनिक शहराबाहेरही फारसा कुणाला ठाऊक नसताना, हिटलरची नजर विशाल क्षितिजावर रोखलेली होती... यासाठी तावडतोब थोडीशी अप्रियता लाभेल, हा धोकाही त्याने पत्करला.)

प्रखर वक्तृत्व आणि पकड घेणाऱ्या घोषणा याचो राजकीय पक्षाला नितांत आवश्यकता असतेच. परंतु सर्वसामान्य जनतेचे लक्ष वेधून घेण्यासाठी एवढेच पुरेसे होत नाही. यापेक्षा अधिक काहीतरी करावे लागते. हे अधिक काय ह्याचे हिटलरने बांधलेले आडाखे इतके प्रभावी ठरले की हिटलर हा एक दैवी बुद्धिमत्तेचा पुरुष (Genius) होता याबद्दल शंका उरत नाही.

**ध्वज, बोधचिन्ह, उत्सव :**

सामान्य जनतेला फक्त कल्पना पुढे मांडणे पुरेसे नसते. सोप्या साध्या विचारांना त्यांच्या डोक्यात थारा मिळण्यासाठी त्या पुनः पुनः उच्चारल्या की पुरेसे होते. परंतु राजकीय यश मिळण्यासाठी या कल्पनांना साकार करतील, आणि पक्षावरील श्रद्धा अधिकाधिक बळकट करतील अशी बोधचिन्हे, शिस्तीचे आणि सामर्थ्याचे उत्सवी प्रदर्शन, सामर्थ्याचा प्रत्यय आणून देणाऱ्या काही हल्लेखोर घटना या सर्वांचा पक्षाने कुशलतेने वापर करणे आवश्यक असते, हे हिटलरने ओळखले होते.

या दृष्टीने हिटलरने प्रथम 'व्यायाम आणि खेळ' या नावाखाली जागोजागी तरुणांचे गट उभे केले. बर्लिन सरकारच्या नजरेत हिटलरचा हा उद्योग रिचवल्यावर या तरुणांची एक स्वयंसेवक संघटना त्याने जन्माला घातली. या संघटनेचा उल्लेख यापुढील निवेदनात एस्. ए. (S. A.) संघटना असा होईल. याखेरीज तुफानी दल (Storm Troopers) ही सैनिकी संघटना पक्षाच्या नावाखालीच सुरु केली. या संघटनेत मुख्यतः असंतुष्ट सैनिक सामील होत गेले. अेरझबरगर याचा खुनी कॅप्टन एरहार्ट याचा उजवा हात जॉन उल्रिश (Ulrich) याच्याकडे या तुफानी दलाचे नेतृत्व देण्यात आले.

S. A. संघटना आणि तुफानी दल या लोकांना पक्षाच्या सभांतून व्यवस्था ठेवणे हे प्राथमिक काम असे. परंतु अधून मधून इतर पक्षांच्या सभा उधळून लावण्याचे कामही हिटलर या संघटनांकरवी करवून घेत असे. १९२१ सालांत बालरस्टेट (Ballerstedt) या पुढाऱ्याने जर्मनीचे अमेरिकन पद्धतीने फेडरेशन करावे असा प्रचार करण्यासाठी सभा बोलावली होती. हिटलरच्या N. S. D. A. P. (National Socialist German Workers Party) या पक्षाला फेडरेशनची कल्पना विषासमान वाटत होती. त्यांना फेडरल राज्ये नको होती. एका मध्यवर्ती सत्तेखाली बांधलेला जर्मनी हवा होता. अर्थात् त्या पक्षाची सभा स्वतः हिटलरने आपल्या संघटित स्वयंसेवकांच्या मदतीने उधळली व त्यामुळे बालरस्टेट बोलू शकला नाही. झटापटीत हिटलरला पोलिसांनी अटक केली. खटला होऊन त्याला तीन महिने शिक्षा झाली. शिक्षा भोगण्यासाठी तुरुंगात जाताना

हिटलरचे हे 'स्वयंसेवक' बनले



...... असंतुष्ट सैनिक, व्यसनी–खुनी–मवाली–गुंड

हिटलरने सांगितले––

" It is all right. We got what we wanted. Ballerstedt did not speak. "

[ठीक झाले. आम्हांला जे हवे होते ते तर घडले ना! बालरस्टेटला भाषण करता आले नाहीच.]

१९२० च्या उन्हाळ्यातच हिटलरने पक्षाला आकर्षक निशाण उपलब्ध करून दिले होते. या निशाणाची कल्पना त्याला सुचावी हा दैवी बुद्धीचाच चमत्कार मानावयास हवा. जनतेच्या कल्पनाशक्तीला आवाहन करील असेच हे निशाण होते. लाल रंगाच्या निशाणावर मध्यभागी पौर्णिमेच्या चंद्रासारखा पांढरा गोल आणि या गोलात काळे स्वस्तिक ...... हे पक्षाचे निशाण म्हणून स्वीकारले गेले. या ध्वजावरील स्वस्तिक चिन्ह हे पुढे नाझी जर्मनीचे चिन्ह बनून शांततावादी दुर्बल राष्ट्रांना कर्दनकाळ भासू लागले.

हे स्वस्तिक चिन्ह हिटलरने कुठून पैदा केले? इजिप्त, चीनमध्ये व भारतातील हिंदू, बुद्ध संस्कृतीत हे चिन्ह शुभचिन्ह म्हणून शिल्पातूनही वापरलेले आढळते. लाल, पांढरा व काळा हे निशाणाचे रंग हिटलरने कायम ठेवले व प्रजासत्ताकाची काळा, लाल व सोनेरी ही रंगयुती साफ नाकारली. आपल्या निशाणावरील रंगांचे विवरण करताना 'माईन काम्फ' मध्ये हिटलर म्हणतो,

" In red, we see the social idea of the movement, in white the nationalist idea, in the Swastika the mission of the struggle–– for the victory of the Aryan man.

[ लाल रंगात आम्ही आमच्या चळवळीतील आशय पाहू शकतो, पांढऱ्या शुभ्रतेत आम्ही राष्ट्रीय भावना अनुभवतो, आणि स्वस्तिकाच्या रूपाने आम्ही आर्यनवंशाच्या जयाकरता धडपडत आहोत याची जाणीव मिळू शकते ].

पक्षाच्या स्वयसेवक संघटनांना बांधण्यासाठी दडावर स्वस्तिक चिन्हांचे पट्टे तयार करण्यात आले. पक्षाचे जे ध्वजदंड तयार झाले त्यात उच टोकाला धातूचे काळे स्वस्तिक व त्या खाली एका पुष्पमालेत साकार झालेली गरुडझेप होती. चौकोनी ध्वजावर स्वस्तिक चिन्ह होते व त्यावर अक्षरे होती....

**Deutschland Erwache-Germany Awake ...**

**जर्मन देशा जागा हो !**

हे ध्वज व चिन्हे कलात्मक होती की नाही हे सांगता येणार नाही. परंतु या सर्वस्वी नवीन ध्वजचिन्हात अगदी निराळ्या दिशेने हा पक्ष निघाल्याचे सूचित करून जनतेला मत्रमुग्ध करण्याचे अतोनात सामर्थ्य निश्चित होते.

पक्षात दाखल झाल्यापासून वर्षभरात हिटलरने श्रेष्ठतम वक्ता, चतुर सघटक आणि तुफानी प्रचारक या तिन्ही नात्यानी पक्षाच्या नेतृत्वावर आपला हक्क प्रस्थापित केला. सुरवातीच्या काही दिवसांतच त्याने आपल्या सहकाऱ्याना जरब बसेल अशा आपल्या नेतेपणाची चुणूक सर्वांच्या प्रत्ययास आणून दिली.

त्याचे असे झाले की १९२१ च्या उन्हाळ्यात हिटलर बर्लिनमधील राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांशी आपल्या पक्षाचे संबंध प्रस्थापित करण्याच्या हेतूने बर्लिनवारीला गेला. हिटलरची पाठ फिरताच त्याच्या सासुरवासाला कंटाळलेल्या अशा पक्षातील काही असंतुष्ट माणसानी त्याच्या नेतृत्वाला काटशह देण्याच्या इरायाने पाऊल उचलले. "जर्मन सोशॅलिस्ट पार्टी" नावाची जी संघटना ज्युलिअस स्ट्रायशर नावाच्या ज्यू माणसाने उभी केली होती त्या सघटनेशी आपल्या पक्षाने समझौता करावा असा बूट त्यानी काढला. यातला हेतू हाच होता की हिटलरच्या एककल्ली नेतृत्वाला अडसर पडावा.

हिटलरला याचा सुगावा लागताच तो बर्लिनहून धावत परत म्युनिकला आला. त्याने रागरग पाहून आपले आसन हलवून बळकट करण्याची सधी गमावली नाही. हिटलरने राजीनामा देण्याची धमकी दिली. हिटलर नाही म्हणजे पक्ष सपलाच. तेव्हा पक्षाने त्याला राजीनामा परत घेण्याचा आग्रह सुरू केला. हिटलरने लगेच पक्षाचे सर्वाधिकारत्व मागितले व स्ट्रायशरसारख्या माणसाशी पुन्हा चुवाचुवी पक्ष-सदस्यांनी करू नये अशी समज सर्वांना दिली.

त्या बडखोर पक्षसदस्याचा पुढारी दुसरा तिसरा कोणी नसून पक्षाचा एक संस्थापकच ड्रेक्स्लेर- हाच होता. पूर्वी पक्षावर हुकमत गाजवणाऱ्यांत ड्रेक्स्लेर एक होता. आता हिटलरने त्याला पक्षाचा नामधारी अध्यक्ष करून नेतृत्वाची सर्व सूत्रे सर्वाधिकारी या नात्याने आपल्याकडे घेतली.

आता पक्षाची चाके द्रुतगतीने फिरू लागली. Voelkischer Beobachter नावाचे आठवड्यातून दोनदा छापले जाणारे ज्यू-विरोधी पत्र तोट्यात आलेले होते. हिटलरने रोएममार्फत सैन्याकडून पैसे उभे केले व हे पत्र पक्षाचे मुखपत्र म्हणून ६०,००० मार्कस् रकमेला खरेदी करून टाकले. आता अनेक मार्गांनी पक्षाकडे पैसाही येऊ लागला होता. हिटलर पक्षसभांत पक्षासाठी फंड गोळा करी. लोक मोठमोठ्या संख्येने पक्षाकडे झुकू लागले होते. १९२३ पासून हे पत्र दैनिक करण्यात आले.

राजकीय पक्षाला प्रचारासाठी जे एक आवश्यक साधन दैनिक वृत्तपत्र, ते आता हिटलरने पक्षाला उपलब्ध करून दिले.

याच सुमारास हिटलरची दखल परराष्ट्रीय वकिलाती घेऊ लागलेल्या दिसतात. २५ नोव्हेंबर १९२२ ला कॅप्टन स्मिथ नावाच्या वार्ताहराने वॉशिंग्टनला पाठविलेल्या खलित्यात म्हटले होते—

"The most active political force in Bavaria at the present time is the National Socialist Labour Party. Less a political party than a popular movement, it must be considered as the Bavarian Counterpart of the Italian fascists ! ... Adolf Hitler is the dominating force. His ability to influence a popular assembly is uncanny."

[ बव्हेरियातील सध्याच्या काळातील सर्वात कार्यक्षम राजकीय पक्ष कोणता असेल तर तो नॅशनल सोशॅलिस्ट लेबर पार्टी हाच आहे. या सघटनेला पक्ष म्हणण्यापेक्षा एक लोकप्रिय चळवळ म्हणणेच अधिक योग्य होईल. तुलनाच करावयाची तर ही चळवळ इटलीच्या फॅसिस्टाशी मिळती जुळती आहे. अॅडॉल्फ हिटलर हा या चळवळीचा आधार आहे. जनसमर्दावर सभेतून छाप टाकण्याची त्याची हातोटी विलक्षण आहे. ]

**हेस, रोझेनबर्ग, गोअरिंग...**

हिटलरच्या प्रचंड उद्योगांत जे त्याचे प्रमुख सहकारी होते ते सर्वजण याच सुमारास पक्षात दाखल झालेले होते.

रुडॉल्फ हेस हा १९२० मधेच पक्षात दाखल झाला होता. इजिप्तमध्ये व्यापार करणाऱ्या एका जर्मन व्यापाऱ्याचा हा मुलगा- शिक्षणासाठी फाइनलॅंडमध्ये आलेला होता. हिटलरबरोबर त्याच्याच पथकात तो १९१४ च्या महायुद्धात भरती झालेला होता. परतु त्यांची ओळख नव्हती. युद्ध सपताच तो म्यूनिक येथील विश्वविद्यालयात शिक्षणासाठी दाखल झाला.

१ मे १९१९ ला म्यूनिकमध्ये अल्पायुषी 'सोविएट' सत्ता उलथवण्यात आली त्या वेळी झालेल्या धनचक्कर हातघाईत हेस होता. त्याच्या पायाला गोळी लागली. पुढे बरा होऊन तो एकदा हिटलरच्या सभेला गेला व त्याचा भक्त झाला. हिटलरने त्याला आपला चिटणीस नेमले. हेसवर हिटलरचे प्रेम होते. रुडॉल्फ हेसने विद्यार्थी असतानाच विद्यापीठात एक निबंध लिहला होता. विषय होता- "जर्मनीचा नेता कसा असावा ?" या निबधात हेसने लिहिले आहे-

"Where all authority has vanished, only a man of the people can establish authority. Where necessity commands he does not shrink before bloodshed. Great questions are always settld by blood and iron-"

[ जेव्हा सर्व राजसत्ता ही जवळजवळ नाहीशी होते, तेव्हा जनतेतून कुणीतरी पुढे येऊन सत्ता हाती घेतो. जर यासाठी रक्तपाताचा प्रसंग आला तर तो डगमगत नाही. मोठाले प्रश्न हे रक्ताने आणि

शस्त्रानेच निकालात काढता येतात.– ]

इतका उत्तम कल्याणस्वामी रामदासानाही मिळाला नव्हता !

आल्फ्रेड रोझेनबर्ग हा रशियात जन्माला आला– व या दृष्टीने तो रशियनच होता. १८९३ मध्ये अॅस्टोनियांत त्याचा जन्म एका कुशल चाभाराच्या घरी झाला. हा भाग त्यावेळी झारच्या साम्राज्यात मोडत असे. १९१७ मध्ये मॉस्को विद्यापीठातून आर्किटेक्चरचा डिप्लोमा त्याने घेतला. १९१८ साली तो म्युनिकला आला. येथे त्याची डिट्रिच एकहार्ट या कविवर्याशी ओळख झाली आणि एकहार्टने त्याला हिटलरपाशी आणुन सोडले. एकाहर्ट हा 'Voelkischer Beobachter' पत्राचे काम पहात असे. १९२३ साली एकहार्ट निधन पावला. परतु तत्पूर्वी रोझेनबर्गची हिटलरवर छाप पडली होती. रोझेनबर्गचे ज्ञान पाहून हिटलरला त्याचेविषयी आदर वाटला. त्याच्या ज्यू आणि बोल्शेविक लोकाविरुद्ध असलेल्या मताचा पक्षाला उपयोग आहे हे लक्षात येताच पक्षपत्राचे सपादन हिटलरने रोझेनबर्गकडे सोपवले.

याच सुमारास हेर्मन गोअरिंग हिटलरच्या पक्षात आला. अर्थशास्त्राचा विद्यार्थी म्हणून तो म्युनिक विद्यापीठात आला होता. १९१४ च्या महायुद्धात शौर्यामुळे तो अतिशय प्रसिद्धी पावलेला होता. युद्ध सपताच प्रथम त्याने डेन्मार्कमध्ये व नंतर स्वीडनमध्ये वैमानिकाची नोकरी पत्करली. एके दिवशी काउंट रोझेन या श्रीमंत गृहस्थाना घेऊन त्याने आपले विमान स्टॉकहोम येथे एकदम त्याच्या इस्टेटीवरच उतरविले. या ठिकाणी केलेल्या अल्प वास्तव्यात काऊंट रोझेनची लग्न झालेली मेहुणी बॅरोनेस फॉश् (Fock) हिच्या तो प्रेमात पडला. हिचा नवरा फिट्स् येत असल्यामुळे आजारीच असे. तिला एक आठ वर्षांचा मुलगा होता. परंतु ती या धाडसी वैमानिकावर खुष झाली. तिने पहिल्या लग्नाचा पट उधळून दिला व गोअरिंगबरोबर ती म्युनिकला आली.

हिटलरच्या कक्षेत गोअरिंग येताच गोअरिंगचा पैसा पक्षसंघटनेसाठी खर्च होऊ लागला. व्यक्तिशः हिटलरवर गोअरिंग फार खर्च करीत असे. १९२२ मध्ये गोअरिंग तुफानी दलाचा ( S. S. ) प्रमुख झाला.

या काही धाडसी माणसाप्रमाणे क्रूर आणि वाईट प्रवृत्तीची माणसेही पक्षात दाखल झाली होती. पक्षात सर्व तऱ्हेची माणसे घुसत आहेत याची हिटलरला जाणीव होती. एसेर (Esser) नावाचा, पक्षपत्रात ज्यूविरोधी लिखाण करणारा सदस्य हा तिरस्करणीय व गर्हणीय जीवन जगतो अशी तक्रार हिटलरकडे आली. त्याला हिटलरने दिलेले उत्तर पाहिले की हिटलरच्या मनःप्रकृतीत काहीतरी मूळ स्वरूपाचा बिघाड असावा अशी शंका दृढ होते. हिटलरने सांगितले—

"I know Esser is a scoundrel, but I shall hold on to him as long as he can be of use to me."

[एसेर हा नीच माणूस आहे हे मला माहित आहे. परंतु जोपर्यंत मला त्याचा उपयोग आहे तोपर्यंत मी त्याची पाठ सोडणार नाही.]

आपल्या पक्षबांधणीत हिटलरने सत्याचा, असत्याचा, सद्गुणदुर्गुणाचा कसला कसलाच विवेक पाळला नाही. सर्वसाधारणपणे माणूस स्खलनशील असतो हे मान्य केले तरी हातून घडलेला गुन्हा हा वाईट आहे हे स्पष्ट होताच जर राज्यकर्त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना वा अधिकाऱ्याना शासन करण्याचे टाळले, तर सपूर्ण राज्यसत्तेला अगणित अत्याचाराचे आणि अन्यायाचे धनी व्हावे लागते. ... व अशी राज्यसत्ता अखेरीस कोसळल्याखेरीज राहात नाही.

परंतु हिटलरच्या भोवती जमा झालेल्या पक्षसहकाऱ्यांत जसे काही लोभी, नीच होते तसेच काही शूर, निष्ठावत होते. या सर्वांची मोट बाधून हिटलर जर्मनीचा उद्धार करण्यासाठी बद्धपरिकर होत होता. ज्या जर्मनीने जगाला आजतागायत लूथर, काट, गटे, बाश्, बेथोवन यासारखी रत्ने दिली होती... त्याच जर्मनीत आता नादीरशाही प्रवृत्तीचा पुरुष उदयाला येत होता.

१ एप्रिल १९२० पासून जर्मन वर्कर्स पार्टीचे नाझी पक्षात रूपातर झाल्याबरोर हिटलरने सैन्यातील नोकरीचा राजीनामा दिला होता. तीन वर्षे त्याला क्षणाची उसत नव्हती. गेले चोवीस तास आपल्या पक्षाच्या वृद्धीसाठी तो राबत होता; आणि तीन वर्षांनंतर जेव्हा त्याने आपल्या कार्याचा आढावा घेतला तेव्हा त्याच्या लक्षात आले की बव्हेरिअन जनता त्याच्याकडे आता आशेने पाहू लागली होती. त्याच्या पक्षाची लोकप्रियता दिवसेदिवस वाढत होती.

जर्मनीच्या राजकारणाला निराळाच रंग भरू लागला होता. एप्रिल १९२१ मध्ये दोस्तांनी जर्मनीने दोस्ताना द्यावयाच्या नुकसानभरपाईचे बिल सादर केले. '१३२ बिलियन सुवर्ण मार्क' म्हणजे जवळ जवळ ३३ बिलियन डॉलर्स ! एका डॉलरला चार मार्क हा सर्वसाधारण दर त्यावेळेस होता. हळहळू बाजारात मार्कचा भाव घसरू लागला. १९२१ च्या उन्हाळ्यात एका डॉलरला ७५ मार्क मिळू लागले. १९२२ मध्ये एका डॉलरला ४०० मार्क मिळू लागले.

ऑगस्ट १९२१ मध्ये एरझबरगरचा खून झाला. जून १९२२ मध्ये फिलिप शीडमन याचा खून करण्याचा प्रयत्न झाला. यानेच जर्मन प्रजासत्ताकाची घोषणा केली होती. एरझबरगरचा गुन्हा काय ? तर त्याने व्हर्सायिच्या तहावर सही केली होती ! २४ जून १९२२ ला परराष्ट्र मंत्री रॅथेनॉ यांचा खून झाला. या तिन्ही प्रकरणात जे संशयित होते ते उजव्या गटाचे होते. आता मात्र बर्लिन सरकार स्वस्थ बसणे शक्य नव्हते. १९२१ मध्ये बव्हेरियात काहरचे जागी काऊंट लरचेनफेड् यांचे मंत्रिमंडळ स्थापन झाले होते. बर्लिनहून सुटलेल्या आदेशानुसार बव्हेरियाच्या राज्यसरकारला राज्यात स्थापन झालेल्या लष्करी स्वरूपाच्या सघटनाविरुद्ध हात उचलणे भाग पडले. परंतु बव्हेरिआतील हिटलरच्या हालचाली समजण्यासाठी प्रथम बर्लिनच्या राजकारणाचे या काळातले धागेदोरे लक्षात घेतले पाहिजेत.

## : ३ :

## जर्मन प्रजासत्ताकाचा प्रयोग

९ नोव्हेंबर १९१८ या दिवशी जर्मनीचा पराभव होऊन कैसर पळून गेला व जर्मन राजघराण्याचा अस्त होऊन, वुड्रो विल्सन याच्या आग्रहाप्रमाणे जर्मन लोकानी प्रजासत्ताकाचा स्वीकार केला. या घटनेचे विजयी दोस्तांना मोठे समाधान वाटले. आता नव्या दिशेने लोकशाहीमार्गाने जर्मन देशाची प्रगती होत राहील अशा मनोरजनात दोस्त मग्न झाले.

१९ जानेवारी १९१९ ला जर्मनीत नॅशनल असेंब्लीसाठी निवडणुका घेण्यात आल्या. या असेंब्लीचे मुख्य काम नवी राज्यघटना तयार करणे, हे राहणार होते. निवडणुकांचे निकाल जाहीर झाले. ४२१ जागापैकी १८५ जागा सोशल डेमोक्रॅट्सनी जिंकल्या, रोमन कॅथॉलिक चर्च व डेमोक्रॅटिक पार्टी या मध्यमवर्गीय जनतेच्या संघटनाना दोन्ही मिळून १६६ जागा मिळाल्या. या दोन्ही पक्षाना प्रजासत्ताक राष्ट्रच हवे होते.

उजव्या गटाच्या "जर्मन नॅशनल पीपल्स पार्टी" या पक्षाला ४४ जागा व "जर्मन पीपल्स पार्टी"ला १९ जागा मिळाल्या. जरी सपूर्ण उजव्या गटाच्या या प्रजासत्ताकविरोधी पक्षाना कमी जागा मिळाल्या असल्या तरी ४२१ जागाच्या सभागृहात ६३ विरोधी जागा या काही अगदीच क्षुल्लक नव्हत्या.

## लोकशाहीची नमुनेदार घटना

६ फेब्रुवारी १९१९ ला "वायमार" या ठिकाणी असेंब्लीची पहिली सभा झाली तेव्हा उजव्या गटाच्या नेत्यानी कैसरच्या व सैन्याच्या कार्याचा गौरव करणारी भाषणे केली. या असेंब्लीला वायमार प्रजासत्ताकाची जननी असे म्हणता येईल.

सहा महिन्यानंतर प्रजासत्ताक जर्मनीची राज्यघटना अध्यक्षानी तयार केली. कागदोपत्री ही घटना म्हणजे निर्मळ लोकशाहीची विसाव्या शतकातील सर्वोत्तम पताका होती. त्यात अतर्भूत केलेली मत्रिमंडळाची रचना ही इग्लडच्या राज्यघटनेप्रमाणेच होती. आणि अध्यक्षाचे अधिकार अमेरिकन अध्यक्षांइतके निर्णायक ठेवलेले होते. सर्व प्रकारच्या लोकाना त्यात प्रतिनिधित्व मिळू शकेल अशी सर्व सोय पहाण्यात आलेली होती.

"जनता हीच राजसत्तेची खरीखुरी धनी आहे."

"वीस वर्षांवरील सर्व स्त्रीपुरुषाना मताचा अधिकार आहे."

"सर्व जर्मन नागरिक हे कायद्यापुढे एकसमान आहेत."

"प्रत्येक नागरिकाला आपले मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे."

"सर्वांना आपापल्या मतानुसार संघटना करण्याचे स्वातत्र्य आहे."

"ज्याने त्याने आपापली धर्मभावना सुखेनैव जोपासावी."

या अशा जवळजवळ सर्व राज्यघटनात आढळणाऱ्या आश्वासनांनी जर्मन प्रजासत्ताकाची घटना सुशोभित झालेली होती.

निदान कागदोपत्री जरी जर्मन नागरिकाइतका सुखी, स्वतत्र नागरिक जगात इतरत्र असणे आता कठीण होणार होते !

इकडे 'वायमार रिपब्लिक' ची घटना तयार होत असतानाच व्हर्सायचा तह ठरविण्यात येत होता. वायमार प्रजासत्ताकाची आखणी करताना, महायुद्धात आपला पराभव झालेला आहे व याचे प्रायश्चित्त आपल्याला घ्यावयाचे आहे याची आठवणही जर्मन नेत्याना व जनतेला नव्हती. दोस्ताच्या अपेक्षेप्रमाणे जर्मन जनतेने आता राजघराणे नष्ट केले होते. बोल्शेविकांचा बीमोड केला होता व दोस्तराष्ट्राना प्रिय असणाऱ्या तत्त्वाधिष्ठित प्रजासत्ताकाची स्थापना केली होती. तेव्हा आता दोस्तांनी सूडबुद्धीने तहाच्या अटी तयार करू नयेत अशीच सर्वसाधारण अपेक्षा होती.

७ मे १९१९ ला दोस्तानी लादलेल्या तहाच्या अटी बर्लिनमध्ये प्रसिद्ध करण्यात आल्या. या अटी वाचताच सतापाची आणि उद्वेगाची एकच लाट साऱ्या बर्लिनभर पसरली. निषेधाच्या सभा तातडीने भरविण्यात आल्या. या सभाना प्रचंड सख्येने जर्मन जनता हजर होती. वायमार असेम्ब्लीचा अध्यक्ष म्हणून एबर्ट व चॅन्सेलर म्हणून श्रिडमनची निवड झालेली होती. या दोघानी तहाच्या या अपमानास्पद आणि क्रूर अटी जर्मन सरकार कधीही स्वीकारणार नाही अशी भाषणे या सभांतून केली.

## व्हर्सायचा तह : दुसऱ्या महायुद्धाची नांदी

अशा या अटी होत्या तरी कोणत्या ?

(१) अल्सॅक लोरेन हा जर्मनीचा भाग फ्रान्सला बहाल केलेला होता. (२) एक छोटासा तुकडा बेल्जियमला व एक तुकडा डेन्मार्कला नजर केलेला होता. (३) पोलडचा जो सायलेशिया हा भूभाग तेथील सार्वमतानतर जर्मनीला जोडण्यात आला होता तो पुनश्च पोलडला देण्यात आला होता. यातच डॅन्झिग बदरही होते. (४) कैसर बुइल्यम व इतर आठशे फरारी युद्धखोराना दोस्ताच्या हवाली करण्यात यावे अशी मागणी होती. (५) नुकसानभरपाई एकंदर किती द्यावयाची ती रक्कम नंतर ठरवण्यात येणार होती व तावडतोब पाच बिलियन-डॉलर्स इतके सुवर्ण मार्क्स् १९१९ ते १९२१ या दोन वर्षांत दोस्ताना जर्मनीने द्यावे अशी सक्ती होती. यातली काही रक्कम ही कोळसा, इमारती लांकूड, गुरेढोरे या स्वरूपात चुकती करावयाची होती.

या सर्वच अटी जर्मनांना अत्यत अपमानास्पद वाटत होत्या. परतु जेत्याच्या अटी या जिताना नेहमीच तशा वाटतात. ग्यानवाची मेख मात्र अजून पुढेच होती. जर्मनीचे कायमचे कबरडे मोडावे या हेतूने जर्मन सैन्य १००,००० यापेक्षा वाढवू नये, रणगाडे व विमाने तयार करू नयेत, अशा ज्या अटी दोस्तांनी लादल्या होत्या त्या स्वीकारणे हे जर्मन जनतेला आपल्याच मृत्यु-आज्ञेवर सही करण्याइतके भयंकर वाटत होते.

एरझबरगर हा एक मत्री वगळता वायमार असेब्लीने निवडलेल्या तात्पुरत्या सरकारला या अटी स्वीकारणे अशक्य वाटत होते. उजवे गट आणि डावे गट या अटीविरुद्ध आवाज उठवीत होते.

अटी नाकारल्या तर ? दोस्ताची सैन्ये पुनः पुढे सरकू लागली असती. जर्मन सैन्याचा अंदाज घेण्याकरता हिंडेनबर्गला विचारण्यात आले. त्याने स्पष्ट कळवले–

"In the event of resumption of hostilities we can reconquer province of Poland and defend our frontiers in the East. In the West, however, we can scarcely stand a serious offensive. The success of the operation as a whole is therefore very doubtful, but as a soldier I cannot help feeling that it were better to perish honourably than accept a disgraceful peace.

[जर पुनः युद्धाला तोंड लागले तर पोलडचा गमावलेला भाग आपण सहज जिंकून घेऊ. इतकेच नव्हे तर पूर्वेकडील आपल्या सरहद्दीचे संरक्षणही आपण करू शकू. पश्चिमेच्या सरहद्दीची स्थिती मात्र निराळी आहे. पश्चिमेच्या बाजूने जर दोस्ताची मुसडी आली तर काय होईल हे सागणे कठीण आहे. एकदरीने या धुमश्चक्रीत काय घडेल याची निश्चिती नाही. असे असले तरी एक सैनिक म्हणून मला वाटते की अपमानास्पद शातता स्वीकारण्यापेक्षा मारता मारता मरून जाणे अधिक चागले.]

अपमानास्पद शांततेपेक्षा मारता मारता मरण्यासाठी हिंडेनबर्ग उत्सुक होता व सैनिकांच्या परंपरेला हे धोरण गौरवास्पद होते. परंतु जर्मन सैन्यातील सर्वोत्कृष्ट सैनिकांनी या नव्या युगात संपूर्ण नामशेष होणे कितपत श्रेयस्कर होते ? अपमानित अवस्थेत खड्ग संन्यस्त ठेवून काही काळ काढला तर कालांतराने पुन: खड्ग उपसण्याची शक्यता स्वीकारावी की हातून खड्ग गळून पडेपर्यंत लढतच रहावे असा मोठा यक्षप्रश्न एबर्टच्या सरकारपुढे उभा होता.

१६ जून १९१९ला हिंडेनबर्गला वर दिलेला खलिता मिळाला. २४ जून १९१९ ही अटी स्वीकारण्याची अंतिम तारीख दोस्तांनी दिली होती. दि. २४ ला रात्री बाराच्या ठोक्यासरशी दोस्तांच्या सेना पुन: रणशिंग फुंकण्यास पवित्रा घेऊन सज्ज होत्या.

२३ जून संपला. एबर्टने जनरल ग्रोएनेरला विचारले की काय करावे ? दुपारी ४–३० वाजतां असेंब्लीची बैठक अटींचा विचार करण्यासाठी भरणार होती. हिंडेनबर्गने खाजगीरित्या जनरल ग्रोएनेर-जवळ कबूली दिली होती की, 'सशस्त्र प्रतिकार आता अशक्य आहे.' (You know as well as I do that armed resistance is impossible.) मात्र हिंडेनबर्गला अटी स्वीकारा आणि शस्त्र खाली ठेवा असे प्रत्यक्ष अध्यक्षांना सांगणे ही मोठी नामुष्कीची गोष्ट वाटत होती. जेव्हा कैसरला राज्यत्याग करा असे निर्वाणीचे सांगण्याची वेळ आली तेव्हा हिंडेनबर्गने हे सांगणे जनरल ग्रोएनेरमार्फतच केले. आणि आताही... "अटी स्वीकारण्यावाचून गत्यंतर नाही..." हे मत जनरल ग्रोएनेरमार्फतच त्याने असेंब्लीला सांगितले.

जनरल ग्रोएनेरने एबर्टला दूरध्वनीवरून सैन्याची अगतिकता कळवली. जनरल ग्रोएनेरला यावेळी कल्पना तरी असेल का की त्याच्या या मध्यस्थीमुळे तो पुढे नाझी पुढाऱ्यांकडून बदनाम होईल म्हणून ?

एबर्टला वाटले, सैन्याने अगतिकता कळवून अटी स्वीकारण्याची सक्तीच कळवली. त्याने असेंब्लीत सर्व अटींसह तह स्वीकारावा असा ठराव मांडला. ठराव बहुमताने संमत होताच रात्री बारा वाजायला फक्त १९ मिनिटेच कमी असताना दोस्तांच्या छावणीत अटी स्वीका-रल्याचा संदेश जाऊन पोहोचला.

चार दिवसांनी म्हणजे २८ जून १९१९ ला व्हर्सायच्या राज-वाड्यात या अटींवर जर्मन सरकारने सह्या केल्या.

**दुबळे प्रजासत्ताक**

या दिवसापासूनच जर्मनीत अंतस्थ सुंदोपसुंदीला सुरवात झाली.

अत्यंत तिरस्करणीय अशा व्हर्सायच्या तहाला पहिला सुरुंग लावला उजव्या गटाने. उजव्या गटाला मोठमोठ्या कारखानदारांचा पाठिंबा होता. श्रीमंत वर्गाचाच हा पक्ष होता असे म्हटल्यास हरकत नाही. या वर्गाने ' व्हर्सायचा तह ' किंवा ' वायमार प्रजासत्ताक ' या दोन्ही गोष्टींना मान्यता देण्याचेच मुळी नाकारले. या गटाच्या हातात






**लोकांनी वस्तू देऊन देवघेवीचे व्यवहार सुरू केले**

आर्थिक सत्ता होती. जर्मनीचें बहुतांशी भांडवल या गटाच्या पाठीराख्यांच्या हातात होते. या भांडवलाच्या जोरावर राजकीय पक्षावर पैसा खर्चून व वृत्तपत्रे काढून प्रजासत्ताकावर जबरदस्त आघात करण्यास या गटाने सुरुवात केली.

वस्तुत: वायमार प्रजासत्ताकाचे जे नेते होते त्यांनी सैन्याची फेरआखणी करताना सैन्य हे राईशताकच्या आज्ञेत राहील अशी व्यवस्था करण्याच्या दृष्टीने सर्व छुप्या लष्करशाही गटाला सैन्यातून कमी करावयास हवे होते. परंतु ही कामगिरी ज्या नॉसके या मंत्र्याच्या कक्षत येत होती त्याने जनरल व्हॉन झेक्त (Seckt) याच्या आधिपत्याखाली जे १००,००० सैनिकांचे सैन्य कायम ठेवले त्यात प्रजासत्ताक राज्याविषयी शून्य आदर असलेल्या व लष्करी सामर्थ्यावरच राज्ये चालतात अशा कल्पनांनी झपाटलेल्या सेनाधिकाऱ्यांची संख्याच अधिक होती. नॉसकेनेच बोल्शेविकांचा काटा काढलेला असल्यामुळे राजकारणातील सैन्याच्या शक्तीचा पुन: एकदा प्रत्यय सैन्याने आणून दिलेला होताच. त्यामुळे झाले काय की आकाराने लहान असे हे जर्मन सैन्य म्हणजे जर्मनीच्या अंतर्गत एक स्वतंत्र राज्यच निर्माण झाले होते. शिररने या संबंधात स्पष्टपणे सांगितले आहे.

"The failure of the duly elected Government to build a new army that would be faithful to its own democratic spirit and subordinate to cabinet and the Reichstag was a fatal mistake for the republic as time would tell."

[ लोकांनी लोकशाही पद्धतीने निवडलेले हे सरकार मंत्रिमंडळ व राइशस्ताक यांच्याशी आदब राखून वागेल असे सैन्यदल निर्माण करण्यात यशस्वी झाले नाही. त्या सरकारची ही आत्मघातकी चूकच प्रजासत्ताकाच्या मुळावर आली हे पुढे कालांतराने दिसून आले. ]

जी चूक वायमार प्रजासत्ताकाने सैन्याबाबत केली तीच चूक न्यायखात्याबाबत केली. न्यायखात्यात न्यायदान करणारी सर्व माणसे ही जुन्या लष्करशाहीच्या वैभवाचे गुणगान करणारी होती. त्यांना कमी करण्याचे धैर्य वा दूरदर्शीपणा वायमार प्रजासत्ताकाच्या नेत्यांनी दाखविला नाही. यामुळे देशद्रोही कोण या गोष्टीबाबत एकच गोंधळ माजला. प्रजासत्ताकाचा आग्रह धरून नव्या जर्मनीचे रोपटे रुजवू पाहणारे काही लोकनेते हे त्यांनी केवळ व्हर्सायच्या तहावर स्वाक्षरी केली म्हणून दिवसाढवळ्या खुनी हल्ल्याला बळी पडल्यानंतर न्यायालयाने संशयित खुन्यांना कडक शासन करण्याचा आग्रहच धरला नाही. उलट या माथेफिरू तरुण रक्ताला हौतात्म्याचा रंग चढला तो या न्यायालयीन नीतीमुळेच.

प्रजासत्ताक उलथवण्याचा पहिला यत्न जेव्हा अॅडॉल्फ हिटलरने केला तेव्हा त्याला झालेली सौम्य शिक्षा व या सौम्य शिक्षेतही मिळालेली सूट याचा कार्यकारणसंबंध हा असा होता.

शेवटी प्रजासत्ताकाचे हे रिकेटी अर्भक संभाळण्याचे दायीपण आले ते शामळू सोशॅलिस्ट, आणि त्यांच्या गणगोतावर ! यांनाच राष्ट्रवाद्यांच्या शिव्या आणि रिव्हॉल्व्हरच्या गोळ्यांचे धनी व्हावे लागले ! दोस्तांनी लादलेल्या अपमानकारक तहाविरुद्ध उद्भवणारा सगळा राष्ट्रवादी उद्रेकही याच लोकांवर कोसळला; कारण लोकांच्या नजरेत तेच दोस्तांचे थुंकीझेले झाले होते !

व्हर्सायच्या तहाविरुद्ध आणि जेत्यांच्या कचाटीत सापडलेल्या वायमार प्रजासत्ताकाविरुद्ध जी संतापाची ज्वाला जर्मनीत भडकत चालली होती, त्याचाच प्रचंड वणवा करण्याचे महत्त्वाचे काम साधले ते अॅडॉल्फ हिटलरला ! या संतापाच्या आगीत तेल ओतणाऱ्या दोन घटना आपातत:च घडल्या.

## चलन कोसळले; प्रांत गेला

एक म्हणजे जर्मन 'मार्क' बाजारात साफ कोसळला. आणि फ्रेंचांनी ऱ्हूर (Ruhr)प्रांताचा कबजा केला.

१९२१ पूर्वीच 'मार्क' हे चलन घसरू लागले. १९२२ साली एका डॉलरला चारशे मार्कपर्यंत घरंगळलेला मार्क १९२३ च्या सुरुवातीस एका डॉलरला ७००० मार्क एवढा रसातळाला गेला ! या चलनफुगवट्यामुळे दोस्तांना द्यावयाच्या खंडणीत आपल्याला थोडी सवलत मिळावी असा अर्ज जर्मन सरकारने केला. फ्रेंच सरकारने ही मागणी फेटाळून लावली. जर्मनीकडून जेव्हा ठरलेले बांधकामाचे लाकूड वेळेवर पोहोचते झाले नाही तेव्हा फ्रेंच पंतप्रधान याने डोक्यात राख घालून फ्रेंच फौजांना जर्मनीचा ऱ्हूर हा औद्योगिक प्रांत ताब्यात घेण्यास सांगितले. फ्रेंचांच्या फौजा ऱ्हूर प्रांतात घुसल्या. ज्या ऱ्हूर प्रांतातून उत्तर सायलेशियाचा लचका तोडल्यानंतर जर्मनीला मुख्यत्वेकरून कोळसा व पोलाद यांचा पुरवठा होत असे त्याच प्रांताचा घास फ्रेंचांनी घेतला.

जर्मनीच्या अर्थकारणाला यामुळे जबरदस्त हादरा बसला. ऱ्हूर प्रांतातील कारखान्यातील कामगारांनी संप पुकारला व कामगारांना संपकाळात पैशाची मदत देण्याचे आश्वासन बर्लिन सरकारला द्यावे लागले. जर्मनीत १९१४ नंतर प्रथमच या संकटामुळे मोठी एकजूट जन्म पावू लागली. जर्मन सैन्याच्या पाठिंब्याने ऱ्हूर प्रांतात जर्मन जनतेने घातपाताचे आणि छुप्या हल्ल्याचे सत्र सुरू केले. फ्रेंचांनी बंडखोरांना पकडून हद्दपारी व फाशी या शिक्षा सढळ हाताने देण्यास सुरुवात केली. परंतु ऱ्हूर प्रांतात एकाही कारखान्यातील यंत्राचे चाक हलू शकले नाही.

जर्मनीच्या मानेभोवती दोस्तांनी जो आर्थिक फास आवळण्यास सुरुवात केली त्यामुळे मार्क हे चलन एक हास्यास्पद प्रकार होऊन बसला. र्‍हूरचा कबजा करताच मार्कची अवस्था काय झाली ती पाहा--

| | | | |
|---|---|---|---|
| १९१८ | एक | डॉलरला | ४ मार्क |
| १९२२ | ,, | ,, | ४०० मार्क |
| १९२२ अखेर | ,, | ,, | ७००० मार्क |
| १९२३ जाने. | ,, | ,, | १८००० मार्क |
| १९२३ जुलै | ,, | ,, | २,६०००० मार्क |
| १९२३ ऑगस्ट | ,, | ,, | १०,००००० मार्क |

म्हणजे कोथिंबिरीच्या एका जुडीसाठी एक पोतेभर रुपये न्यावे तसा हा प्रकार झाला ! ज्या माणसाजवळ मार्क या चलनात पैसा आहे त्याची बाजारात किंमत जवळजवळ शून्य झाली होती.

जर्मन सरकारवर आता जनतेने विश्वास तरी कशाकरता ठेवा-वयाचा ? पैशाचे सोंग जसे माणसांना आणता येत नाही तसे अशा परिस्थितीत सरकारलाही आणता येत नाही. लोकांनी हयातभर खपून बँकांतून ठेवलेला सर्व पैसा मातीमोल होताच जर्मन सरकारची जनतेत काय पत राहणार ? लोकांनी वस्तू देऊनच देवघेवीचे व्यवहार सुरू केले. एक कोंबडी द्यावी, मूठभर गहू आणावे; पोतेभर गहू द्यावे, डझन अंडी आणावी; चार अंडी देऊन कोंबडी आणावी, असा खेळ जनतेत सुरू झाला. किंमत या शब्दाला काही अर्थच उरला नाही.

हे सर्व कशामुळे झाले ? याचे सर्वसामान्य माणसाला सुचणारे उत्तर एकच होते- जे ' वायमार प्रजासत्ताक ' सध्या राज्यावर आहे त्याचे हे पाप आहे. वास्तविक पाहता, ही मंदीची लाट थांबवणे वायमार सरकारला काही अशक्य नव्हते. याकरता करवाढ आवश्यक होती. परंतु लोकांना समाजवादाची भरमसाट आश्वासने देणाऱ्या पुढाऱ्यांना करवाढ म्हणजे फारच अवघड जागचे दुखणे !

या उलट वायमार सरकारने निराळाच आडाखा बांधला. त्यांना वाटले, मार्क घसरत घसरत निरर्थक झाला की दिवाळखोरीच जाहीर होईल. फ्रेंचांचे र्‍हूरमध्ये नाक ठेचायला ही बरी संधी आली.

सामान्य जनता मंदीच्या तडाख्यात भरडली जात असताना मोठ-मोठे कारखानदार, सैन्यधिकारी आणि सरकार या तीन संस्था मात्र अधिकाधिक श्रीमंत होत होत्या. कारखानदारी किती वाढवू अशी परिस्थिती कारखानदारांपुढे आली. सैन्य चांगले खातपीत होते, आणि सरकार दिवाळखोरी करून कर्जमुक्त होऊन पर्यायाने श्रीमंतच होत होते. रस्त्यातील सर्वसाधारण माणसास हे समजत नव्हते. त्याला एवढेच दिसत होते, की हजारो मार्क दिले तरी कांद्याची जुडी मिळत नाही, अर्धा बटाटा मिळत नाही की चिमूटभर साखर मिळत नाही ! त्यांना भुकेचा राक्षस समजत होता, कारण तो त्यांच्या मानेवर आता रात्रंदिवस बसला होता. त्यांनी आपल्या दुःखाचे-भुकेचे-कंगालीचे खापर एकाच ठिकाणी फोडले. वायमार प्रजासत्ताक आणि त्याचे म्होरक्ये हेच त्याला कारण आहेत, अशी त्यांची ठाम समजूत होती.

आता वंडासाठी दारू ठासून भरली आहे हे हिटलरने ओळखले. सत्तेच्या मानगुटीवर स्वार होण्यासाठी अशी नामी संधी परमेश्वराकडे धरणे धरूनही मिळणार नाही हे हिटलरच्या लक्षात आले.



र्‍हूर हा जर्मनीचा औद्योगिक प्रांत फ्रेंचांनी ताब्यात घेतला

## हिटलर गर्जू लागला

" The Government calmly goes on printing these scraps of paper because, if it stopped, that would be the end of the Government. The state itself has become the biggest swindler and crook. A robbers' state ! We want a dictatorship. "

(आपले सरकार, हे कागदाचे कपटे शांतपणे छापीतच राहणार आहे. कारण हे थांबले तर सरकारचा निकालच लागणार आहे हे सरकारला माहीत आहे. स्वतः सरकारच एक मोठी बनवाबनवी कर-णाऱ्या खिसेकापूंची टोळी झाली आहे. दरोडेखोरांचेच हे राज्य आहे ! आता हे बस्स झाले. आम्हांला आता एकच सर्वाधिकारी हवा आहे...)

जीवनातील अनिश्चितता आणि कर्मकटकटी यामुळे लाखो जर्मन माणसांना हेच वाटत होते, की प्रजासत्ताकाचा गोंधळ संपावा आणि एखाद्या कर्तबगार माणसाने सर्वाधिकार घेऊन जीवन जरा सुसह्य करावे.

परंतु आता जी प्रतिक्रांती घडवावयाची, तिचे नेतृत्व हिटलरला करता येणे शक्य नसल्यास, हा धोका आताच पतकरण्यास हिटलर तयार नव्हता. हिटलरच्या मार्गात काही मोठ्या अडचणी होत्या.

पहिली गोष्ट म्हणजे नाझी पक्ष दिवसेंदिवस वाढत असला तरी बव्हेरियातील सर्वात प्रबळ पक्ष म्हणून त्याची लायकी प्रस्थापित झालेली नव्हती. बव्हेरियाच्या बाहेर तर या पक्षाचे नावही कुणाला ठाऊक नव्हते. अशा परिस्थितीत प्रजासत्ताक उलथणार कसे ? तसा

मोठमोठ्या अडचणीनाही जुमानणारा हिटलर नव्हता. आदल्याच वर्षी इटालीत बेनिटो मुसोलिनी नावाच्या एका सैनिकी संघटनेच्या नेत्याने रोमवर मोर्चा नेऊन हा हा म्हणता सत्ता काबीज केली होती ! असेच काही तरी ..एक प्रजासत्ताकविरोधी सयुक्त आघाडी उघडून केले तर ? बव्हेरियातील राष्ट्रवादी एकत्र करावे आणि बव्हेरियातील सरकारचा पाठिंबा मिळवून बर्लिनवर मोर्चा न्यावा असा विचार त्याच्या डोक्यात बळावू लागला.

परंतु फ्रेंचानी न्हूरचा कबजा केल्यामुळे कधी नव्हे अशी एकी जर्मन जनतेत निर्माण झाली होती. म्हणजे चीनने भारतावर हल्ला केल्यामुळे जनतेत सरकारविषयी जी आपुलकी निर्माण झाली तसाच हा प्रकार होता. वायमार प्रजासत्ताकाविरुद्ध जाण्याऐवजी राष्ट्रवादी भूमिकेवरून सरकारला उलट पाठिंबाच दिला पाहिजे असे लोकमतही प्रबळ होते. असे असूनही हिटलरने ज्याना ठोकायचे त्याचे क्रमाक लावले. फ्रेंचाना योग्य वेळी धडा शिकवता येईल, परतु आधी वायमार प्रजासत्ताकाआड दडलेल्या दगलबाजाना शासन घडविल्याखेरीज देशाचा हृद्रोग सपणार नाही. भारतातील काही क्रातिकारक नेते फाळणीपूर्वी पहिला पाय-कॉंग्रेसवर, दुसरा लीगवर व तिसरा ब्रिटिशावर असा उलटा क्रम लावीत असत. या म्हणण्यात किती तथ्य होते हे अजून पुरते ठरावाचे आहे. परंतु हिटलरच्या विचारात निश्चित तथ्य होते. अर्थात त्याच्या वाटचालीच्या दृष्टीने ! हिटलरने जाहीर केले...

" No—Not down with France, but down with the traitors of The Fatherland. Down with the November criminals ! That must be our slogan. "

[ फ्रान्सचा कसला धि:कार करता......? ज्यांनी आपल्या पितृभूमीशी दगाबाजी केली त्यांचा धि.कार करा ! नोव्हेम्बरच्या हरामखोरांचा धि:कार करा ! हीच आपली आजची घोषणा आहे. ]

सर्व १९२३ साल हिटलरने आपली वरील घोषणा लोकाच्या गळी उतरविण्यात खर्ची घातले. फेब्रुवारी १९२३ मध्ये रोएम याच्या प्रयत्नानें बव्हेरियातील चार राष्ट्रवादी पंथाची संयुक्त आघाडी निर्माण झाली. सप्टेम्बरमध्ये या सयुक्त आघाडीत आणखी पक्ष सामील झाले. या आघाडीवर नेतृत्वासाठी तीन नेते नियुक्त झाले. त्यातला एक स्वतः हिटलर होता या आघाडीचे नामकरण झाले GERMAN FIGHTING LEAGUE...जर्मन लढाऊ आघाडी ! या आघाडीचे दोनच हेतू मुक्रर झाले. पहिले उद्दिष्ट वायमार प्रजासत्ताक उलथवणे व दुसरे व्हर्सायचा तह ठोकरणे.

न्युरेन्बर्ग येथे आघाडीच्या राजकारणात हिटलरला एक नवा साथीदार लाभला—जनरल लुडेन्डॉर्फ ! पराजयानतर पळून गेलेला सेनापती पुन्हा बव्हेरियात निवृत्त जीवन घालवीत होता. त्याचे नाव सैन्यात अजून आदरणीय होते. राजकीय विचारशक्ती या सेनापतीजवळ बेताचीच होती. परतु हिटलरला, सैन्याचा पाठिंबा आपल्या हेतूना मिळावा याकरिता फक्त याचे नाव हवे होते. त्याने आपल्या दरएक सभाबैठकीत लुडेन्डॉर्फला गोवावयास सुरुवात केली.

बर्लिन सरकारचे म्हणजे वायमार सरकारचे राजकारण आता घसरगुंडीला लागले होते. २६ सप्टेम्बरला चॅन्सेलर गुस्टाव्ह स्ट्रेसमन (Gustav Stressman) यानी न्हूरमधील शातताभय असहकार मत्रिल्याची घोषणा केली व यापुढे जर्मनी फ्रेंचाना वेळच्या वेळी ठरलेली खंडणी देईल असे जाहीर केले. चॅन्सेलरच्या मते काही काळ दोस्तांच्या तत्राने वागून जर्मन देश मजबूत केला नाही तर देशात यादवी पेटण्याचा संभव होता. या काळात आर्थिक दृष्ट्या देश सावरला नाही तर सर्वच अनर्थ आहे, अशा भावनेतून त्याने ही घोषणा केली.

**आणीबाणीची घोषणा**

या घोषणेने मोठाच दुष्परिणाम झाला. कट्टर उजवे राष्ट्रवादी आणि कट्टर डावे कम्युनिस्ट या दोन्हीकडून प्रजासत्ताक सरकारवर हल्ले सुरु झाले. असा काही प्रकार होईल अशी कल्पना असल्यामुळे चॅन्सेलरने अध्यक्ष एबर्ट याना त्याच दिवशी, आता आपल्याला सुपरिचित झालेली आणीबाणी (EMERGENCY) जाहीर करण्यास सांगितले होते. या इमर्जन्सी अधिकाराखाली सर्व सत्ता याकाळात सरक्षण मत्री ऑटो गेसलेर (Otto Gessler) व सेनादल प्रमुख जनरल झेक्त याच्या हाती केंद्रित करण्यात आली. प्रत्यक्षात मात्र संरक्षणमत्री बुजगबाहुले होऊन अनियत्रित सत्ता सैन्याच्या हातात पडली.

बव्हेरियामध्येही २६ सप्टेम्बरलाच आणीबाणी जाहीर झाली व काहर याला राज्याचा कमिशनर नेमून त्याच्या सुपूर्द सर्वाधिकार करण्यात आले. या वार्तेने बर्लिनच्या गोटात खळबळ माजली. बव्हेरिया फुटून वेगळा होऊ पहात आहे की काय, या शकेने अध्यक्ष एबर्ट बेचैन झाले. त्यानी सेनादल प्रमुख जनरल झेक्त याना बोलावून विचारले—

" Let me know where the Army stands ? "

" The Army, Mr. President, stands behind me ! "

झेक्टने आपली नखे योग्य वेळी दाखवली व एबर्टचे अवसानच गळाले. सैन्य यावेळी कुणामागे उभे राहणार ? या आपल्या प्रश्नाला... " अध्यक्षमहाशय, सैन्य फक्त माझ्याच मागे उभे आहे......! " असे उत्तर देणारा जनरल झेक्ट समोर पहातच एबर्टचे उसने अवसान पार संपले.

आता प्रश्न सैन्य कुणाची बाजू घेणार हा नसून जनरल झेक्ट कुणाची बाजू घेणार असा सोपा झाला होता ! सुदैवाने यावेळी जनरल झेक्ट याने प्रजासत्ताक सरकारला पाठिंबा देण्याचे ठरवले. याचे कारण जर देशात बड करू पाहणाऱ्याची सरशी झाली तर


# पांढरे डाग

पाढऱ्या कोडाचे अनुभवसिद्ध प्रसिद्ध गुणकारी औषध. अनेक बक्षिसे व हजारो अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किंमत ६ रुपये. पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवू. नकली वैद्यापासून सावध राहावे.

**वैद्य बी. आर. बोरकर, आयुर्वेद-भवन**

**मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला (महाराष्ट्र)**

सैन्याचा अधिकारच सपेल ही भीती या सेनादलप्रमुखाला वाटत होती.

झेक्टने प्रथम सेनादलातील जे लोक बर्लिनचा कबजा करू पहात होते त्यांचा अमानुषतेने बंदोबस्त केला व मग तो कम्युनिस्टाकडे वळला. हॅम्बूर्ग, ऱ्हूर, सॅक्सनी या ठिकाणी असलेली सरकारे त्याने बडतर्फ करून आपल्या विश्वासातील कमिशनर्स त्याने तेथे नेमले.

कम्युनिस्टाचा काटा ढिला केल्यावर झेक्टचा अदाज होता की हिटलरच्या चळवळीतील हवाच काढून घेतली जाईल. कारण जर्मनीला बोल्शेव्हिकापासून बचावणे हा त्याच्या चळवळीचा एक प्रमुख भाग होता.

## बव्हेरियाची बंडखोरी

परंतु बव्हेरियातील राजकारणाने निराळेच वळण घेतले होते. येथे सत्ता, राज्याधिकारी काहर बव्हेरियातील सेनाप्रमुख जनरल लॉसॉव्ह व पोलिसप्रमुख सिसेर या त्रिमुर्तीच्या हाती होती. काहरने अध्यक्ष एबर्ट याची आणीबाणीची घोषणा विचारात घेण्याचे साफ नाकारले. बर्लिनची हुकमत आपण मानणार नाही अशी भूमिका काहरने घेतली. जेव्हा बर्लिनहून आदेश आला की नाझी पक्षाचे दैनिक Voelkischer Beobachter यावर बंदी घाला, कारण त्यात झेक्त-गेसलेर आदीवर टीका येते, तेव्हा हा आदेशही काहरने मानला नाही.

जनरल झेक्टला हे वर्तन सहन झाले नाही. त्याने जनरल लोसोव्हला नाझी वृत्तपत्रावर बंदी घालण्याची पुन्हा आज्ञा दिली. काहरच्या आग्रहाला आणि हिटलरच्या तेजोवलयाला फसून जनरल लॉसॉव्हनेही जनरल झेक्टची आज्ञा पाळण्यास का कू सुरु केली. झेक्टने लॉसॉव्हला बडतर्फ केले. परंतु काहरने जाहीर केले की बर्लिन सरकारचा मुलाहिजा न ठेवता जनरल लॉसॉव्ह याचेकडे बव्हेरियाच्या सेनेचे नेतृत्व कायम आहे.

काहरचे हे धोरण म्हणजे प्रत्यक्ष बंडच होते म्हणजे हे बर्लिन सत्तेला आता लष्करी आव्हानही होते. झेक्टने हे बंड ठेचायचे ठरवले. त्याने बव्हेरियन सरकारला धमकी दिली की जर काही लष्करी हालचाल बव्हेरियातून होईल, तर त्याचा बीमोड करण्यात येईल.

हिटलरच्या हे लक्षात आले की जर झेक्टला देशात स्थिर सरकार स्थापन करण्यात यश आले तर आलेली सुवर्णसंधी हातातून गेली असे होईल. त्याने काहर व लॉसॉव्ह याना आग्रह सुरू केला, की बर्लिनहून सैन्य म्युनिकवर चालून येण्यापूर्वी बव्हेरियाच्या सैन्यानेच बर्लिनवर मोर्चा न्यावा. काहर व लॉसॉव्ह याना कुठे बर्लिनवर जाण्याची इच्छा होती ? त्याना फक्त स्वतंत्र बव्हेरिया हवा होता ! राजकारणात कसे विचित्र पेच पडतात पहा. स्वतत्र बव्हेरियाची कल्पनाच हिटलरला सहन होत नव्हती. एकसंधी, सुसज्ज जर्मन देशाचे श्रीमंत स्वप्न न पाहता स्वतत्र बव्हेरियाचे दळमद्री स्वप्न पहाणाऱ्या या बव्हेरियन सत्ताधीशाची सगत सोडावी की सोडू नये ? हिटलर पेचात सापडला खरा !

आणि काहर, लॉसॉव्ह व सिसेर हे हळूहळू कच खाऊ लागले होतेच ! झेक्टच्या धमकीप्रमाणे खरोखरच बर्लिनहून फौजा आल्या तर कबक्तीच भरली, या विचाराने या सर्वांनी हिटलरच्या सयुक्त आघाडीला कळवून टाकले की तूर्त काहीही करण्याचा विचार नाही !

नाही बव्हेरियन सरकारचा पाठिंबा, नाही बव्हेरियन सैन्याचा पाठिंबा, नाही बव्हेरियन पोलिस-दलाचा पाठिंबा...अशा अवस्थेत एकट्याच्या बळावर मोर्चा काढावा का ? हिटलरची गुतागुंत आता वाढतच चालली.

इतक्यात बव्हेरियन सरकारने एक जाहीर सभा आयोजित केली. ८ नोव्हेंबर १९२३ या दिवशी प्रजासत्ताकाच्या वाढदिवस प्रसंगी काहर हा म्युनिकमधील व्यापारीवर्गाच्या विनतीवरून शहरातील एका मोठ्या बिअर समागृहात बव्हेरियन सरकारचे ' ध्येय-धोरण ' या विषयावर भाषण करणार असल्याची जाहीर निवेदने सर्वत्र झळकली. याच निवेदनात सदर सभेला सेनादलप्रमुख जनरल लॉसॉव्ह व पोलिस-प्रमुख सिसेर हे हजर राहणार असल्याचे मुद्दाम नमूद केलेले होते.

या निवेदनाच्या वाचनाबरोबर हिटलरने तडकाफडकी निर्णय घेतला को जे करायचे ते आताच केले पाहिजे. या सभेतच कदाचित काहर स्वतंत्र बव्हेरियाची कल्पना लोकापुढे ठेवील. हिटलरने ताबडतोब काहरची भेट मिळण्याची विनती केली परंतु काहरने ९ नोव्हेंबर पर्यंत वेळ नसल्याचे कळवले. हिटलरचा संशय आता मात्र बळावलाच. त्याने ८ नोव्हेंबरच्या सभेतच काहरचा समाचार घेण्याचे ठरवले.

नाझी पक्षात चक्रे फिरू लागली. बिअर हॉलमध्ये महत्त्वाच्या कामासाठी हजर राहण्याची सर्व स्टॉर्म ट्रूपर्स व S. A. स्वयसेवकाना सूचना मिळाली.

## बिअर हॉलमध्ये हिटलर

८ नोव्हेंबर उजाडला. सायंकाळ झाली. रात्री पावणेनऊच्या सुमारास काहरचे भाषण सुरू होऊन जवळजवळ अर्धा तास झालेला असावा S. A. स्वयसेवकांनी बिअर हॉलला गराडा दिला व हिटलर हॉलमध्ये घुसला. हॉलमधून बाहेर पडण्याच्या दरवाजात नाझी स्वयसेवकानी मशिनगन बसवेपर्यंत हिटलर व्यासपीठापर्यंत पोचला. त्याने तख्तपोशीच्या दिशेने यायबार काढला. काहर दिङ्मूढ होऊन भाषण बंद करून पळून लागला न लागला तोच समागृहात गोंधळ माजला. हिटलरच्या पाठोपाठ हेस व हिटलरचा सरक्षक उल्रिश (Ulrich) यानी व्यासपीठावर उड्या मारल्या होत्या. काहरचे अवसानच गळाले. त्याचा चेहरा पाढरा फाटक पडला. तो व्यासपीठावरून बाजूला सरला आणि त्याची जागा हिटलरने घेतली. हातातले पिस्तूल रोखून त्याने जाहीर केले—

" The national revolution has begun ! The building is occupied by six hundred heavily armed men. No one may leave the hall. The Bavarian and Reich Government have been removed and a national Government formed. The army and the police are marching on the city under the Swastika banner—"

[ राष्ट्रीय क्रांतीला सुरुवात झाली आहे. या इमारतीचा सहाशे सशस्त्र सैनिकानी कबजा घेतलेला आहे. कुणीहि आता बाहेर जाण्याच । प्रयत्न करू नये. बव्हेरियन व राईश सरकारे आता बडतर्फ केलेली असून नवे राष्ट्रीय सरकार स्थापन झाले आहे. सेनादल व पोलिसदल शहरावर स्वस्तिकाच्या निशाणाखाली चाल करून येत आहे. ]

एवढे बोलून हिटलरने......काहर, लॉसॉव्ह व सिसेर याना बाजूच्या खोलीत चालण्याची विनती केली. विनती कसली ?.. ...पिस्तुलाच्या भीतीने तिघे त्याच्यापुढे चालत खोलीत जाऊन बसले. हॉलचा कबजा

आता गोअरिंगने घेतला व जमलेल्या नागरिकांना घाबरण्याचे कारण नाही असे सांगितले.

हिटलर इकडे आतल्या खोलीतील त्रिवर्गाला धमकीवजा विनंती करत होता--

" तुम्ही तिघानी मला साथ दिली पाहिजे. नव्या राष्ट्रीय सरकारात तुमच्यावर जबाबदारीची खाती सोपवण्यात येतील. थोड्याच वेळात लुडेन्डॉर्फ येथे येऊन पोहोचतील. काय तो लवकर विचार करा......"

लुडेन्डॉर्फला आणण्यासाठी हिटलरने आधीच माणसे पाठवली होती. या म्हाताऱ्या सेनापतीला कल्पनाही नव्हती की राजक्रांती करण्याचा हिटलरचा बेत आहे.

काहरने सांगितले--" वाटल्यास तू आमच्यावर गोळी चालव. परंतु या कटात मी सामील होऊ शकत नाही. "

सिसेरने हिटलरला आठवण दिली--

" पोलिसदलाविरुद्ध काही करणार नाहीस असे तू आश्वासन दिले होतेस त्याचे काय ?"

हिटलरने उत्तर दिले--" ते आश्वासन मी मोडतो आहे याबद्दल मला माफ करा. परतु पितृभूमीच्या उद्धारासाठीच मला हे करावे लागते आहे."

जनरल लॉसॉव्हने हिटलरशी बोलण्याचेच नाकारले. वेळ जात चालला होता. हिटलरने मनाशी काहीतरी निर्णय घेतला तो एकाएकी पुन: खोलीबाहेर परत व्यासपीठावर आला व समोरच्या जमावाला म्हणाला--

" नवे राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यासाठी पलिकडच्या खोलीत बसलेल्या तिघा मुत्सद्यानी आपले सहकार्य देऊ केले आहे."

हिटलरने शभर टक्के असत्य बोलण्याचा प्रयोग तर केला. आणि तो यशस्वी झाला ! जमलेल्या लोकांनी हे ऐकताच त्या तिघांचा जयजयकार केला. आतल्या खोलीत बसलेल्या तिघाची मने खरोखरच हेलकावे खाऊ लागली. इतक्यात लुडेन्डॉर्फ हॉलमध्ये येऊन दाखल झाला. तेथे जे घडत होते ते लक्षात येताच लुडेन्डॉर्फ सर्दच झाला. त्याच्या हाताखाली असलेला कॉर्पोरल हिटलर हा जर्मनीचा सर्वाधिकारी! खुळचट कल्पना! ! मूर्खपणा.. ...म्हातारा काहीसा रागावला परंतु हिटलरने त्याची समजूत घातली. " तुमच्यासारख्या थोराचे फक्त आशीर्वाद पुरे आहेत--! "

इकडे लुडेन्डॉर्फचे दर्शन होताच लोकांनी हर्षाने उड्या मारण्यास सुरुवात केली. हर्षवायू झाल्यासारखा उन्माद सभागृहात पसरला. त्यावेळी तेथे हजर असलेल्या एका इतिहासकाराने हिटलर त्यावेळी कसा दिसला याचे वर्णन केले आहे.

" He had a childlike frank expression of happiness that I shall never forget. " (त्यावेळी हिटलरच्या चेहऱ्यावर जे अर्भकाचे निरागस समाधान पसरले होते मी कधीच विसरू शकणार नाही.)

सर्वांची थोडीथोडी भाषणे झाली. काहर, लॉसॉव्ह, सिसेर व हिटलर यांनी क्रांती सुरू झाल्याचे सांगितले. सभा संपली. काहर, लॉसॉव्ह व सिसेर सभागृहाबाहेर निसटले. जे सैन्य व पोलिसदल चाल करून येत असल्याची थाप हिटलरने मारली होती......तो मोर्चा आता जाताक्षणीच लॉसॉव्ह व सिसेर काढतील असा त्याचा अंदाज होता. त्याने लष्करी निवासाकडे व पोलिसदलाकडे नाझी स्वयंसेवक धाडून कानोसा घेतला तो काय......! शुकशुकाट ! क्रांती नाही......मोर्चा नाही......! उलट हिटलरने पाठवलेल्या नाझी स्वयंसेवकांना पकडून सिसेरने तुरुंगात डावले.

काहरने आपले सरकार रीजन्सबर्गला रातोरात हलवले व जाण्यापूर्वी सकाळी शहरात ठिकठिकाणी खालील जाहीर निवेदन भितीवर डकवण्याची अनुज्ञा दिली--

"The deception and perfidy of ambitious comrades have converted a demonstration in the interest of national reawakening into a scene of disgusting violence. The declaration extorted from myself, General Lassow and Colonel Seisser at the point of revolver is null and void. 'The National Socialist German Workers Party--as well as the fighting league are dissolved.

Von Kahr
General State Commissioner

## पुन्हा एकदा उठावणी

आदल्या रात्री निर्मळ यशाचे समाधान अनुभवणाऱ्या हिटलरला जसजशी रात्र उलटू लागली तसतशी निराशा घेरू लागली. त्याला काही यादवी युद्ध नको होते. त्याला हवी होती जमावाच्या नुसत्या धाकाने सत्ता ! त्याला सैन्याविरुद्ध उठाव करायचा नव्हता तर सैन्यासह उठाव करायचा होता. आणि लुडेन्डॉर्फला सैनिकांचे आणि पोलिसाचे रक्त सांडण्याची इच्छा नव्हती.

हिटलरने एक धाडसी व्यूह रचला. लुडेन्डॉर्फसह आपले अनुयायी घेऊन शहराच्या मध्यभागी मोर्चा काढावा लुडेन्डॉर्फ अग्रभागी असताना पोलिसाची या मोर्चावर गोळी झाडण्याची हिंमत नव्हती. या मोर्चाने सरळ जाऊन अधिकाराचा कबजा करावा असा बेत त्याने लुडेन्डॉर्फच्या गळी उतरवला.

सकाळ उजाडली. रात्रीच्या काळात रोएम याने आपल्या स्वयंसेवकानिशी युद्धखात्याच्या कचेरीचा ताबा घेतला होता व तो हिटलरची वाट पाहात थांबला होता.

सकाळी अकरा वाजता हिटलर व लुडेन्डॉर्फ यानी शहराच्या सरकारी कचेरीच्या दिशेने एक मोठा मोर्चा काढला. तारीख होती ९नोव्हेंबर १९२३. तीन हजार तुफानी दलाचे नाझी लोक व अग्रभागी हेर्मन गोअरिंग, रिचर, रोझेनबर्ग, उलरिश, त्यांच्यामध्ये हिटलर व लुडेन्डॉर्फ चालत होते. मिरवणुकीच्या अग्रभागी 'स्वस्तिक' चिन्हांकित मोठा ध्वज फडकत होता. मोर्च्याच्या मार्गात टोकाला मशिनगन्स चढवलेल्या ट्रक-गाड्या हळूहळू मार्ग आक्रमीत होत्या. हिटलरच्या कमरेला रिव्हॉल्व्हर होते. लुडेन्डॉर्फने एका वेळी लाखो जर्मन सैनिकांच्या तुकड्यांचे आघाडीवर नेतृत्व केले होते आणि त्या मानाने हा जमाव अगदीच क्षुद्र होता.

शहराच्या मध्यभागी नेणाऱ्या इसार नदीवरील पुलावर मोर्चा आला. पोलिसानी तो अडवला. गोअरिंगने पोलिसाना बजावले की मिरवणूक शस्त्रसज्ज आहे. तेव्हा रक्तपात होईल. आम्ही शांततामय

पद्धतीने काय ते करीत आहोत. पोलिसदलात बरेच मोकळे झालेले सैनिक होते. या पोलिसांनी लुडेन्डॉर्फला पाहताच लष्करी सलाम ठोकला व ते बाजूला झाले.

हिटलरच्या उठावाची बातमी समजताच रातोरात न्युरेंबर्गहून ज्यूलियस स्ट्रायशर आपल्या अनुयायांसह म्युनिकला दाखल झाला होता. सत्तेच्या लुटीत आपण मागे नसावे या हेतूने त्याच्या नेतृत्वाखाली प्रचंड जमाव वाटेत थांबला होता. मिरवणूक जवळ येताच हा जमाव त्या मोर्चात मिसळला व स्ट्रायचर स्वतः हिटलरच्या बाजूला त्याच्याच जोडीने पावले टाकू लागला !

पूल ओलांडून मिरवणूक पुढे आली व एका अरुंद गल्लीतून मार्गस्थ झाली. या गल्लीच्या दुसऱ्या टोकाला पोलिसांची मोठी तुकडी मिरवणूक रोखण्यासाठी उभी होती. गोअरिंग मिरवणूक पुढे काढून स्वतः मागे राहिला होता. उलरिश याने पुढे होऊन " लुडेन्डॉर्फ येत आहेत– – बाजूला व्हा." असा " तिळा उघड " मंत्र उच्चारला. एकतर तो पोलीस अधिकारी नवा असावा किंवा मूर्ख नसावा. त्याने मिरवणूक पुढे जाणार नाही असे सरळ सांगितले.

इकडे हा असा तेढा पडला तर तिकडे युद्धकचेरीत शिरलेल्या रोएमला पोलिसांनी वेढा देऊन हलू दिले नव्हते.

मिनिटे टकटकत पुढे सरकू लागली. जमाव आता उग्र रूप घेऊ लागला. पहिली गोळी कुणी झाडली हे सांगता येणे कठीण. परंतु उत्साहाच्या भरात ही पहिली गोळी ज्युलियस स्ट्रायशरने झाडली असावी. कारण या दिवसापासून हिटलर व स्ट्रायशर यांचे जे सख्य जुळले ते कायमचे.

पहिली गोळी सोडतानाच काय तो विचार–अविचाराचा प्रश्न होता. पाठोपाठ दोन्ही बाजूंनी गोळ्यांचा वर्षाव झाला. रिचर जागच्या जागी कोसळला. गोअरिंग आतापर्यंत पुढे आला होता. त्याच्या मांडीत गोळी शिरली. दोनतीन मिनिटांत गोळीबार थांबला. परंतु या तीन मिनिटांत सोळा नाझी व तीन पोलीस गारद झाले. अनेक जखमी झाले.

या सगळ्या गोळीबारात एकच व्यक्ती ताठ मानेने पुढेच चालत राहिली. जनरल लुडेन्डॉर्फ यत्किंचितही विचलीत झाला नाही. मरणाच्या भयाने रस्त्यावर उपडा पडला नाही की त्याने रिव्हॉल्व्हरलाही हात लावला नाही. पोलिसांकडे पाठ करून ताठ पावले टाकत तो पुढे गेला. जमावातील फारच थोड्या लोकांना हे शक्य झाले.

रिचरला कोसळताना पाहाताच हिटलरने आधार दिला. परंतु रिचरने खाली पडता पडता हिटलरलाही खाली ओढले होते. यामुळे हिटलर वाचला. हिटलरला वाटले की आपल्या खांद्यात गोळी गेली आहे. परंतु रिचरने ओढल्यामुळे त्याचा खांदा फक्त दुखावला होता.

तेवढ्यात हिटलरला कुणीतरी खेचीत मागे उभा असलेल्या मोटारीकडे नेले व तो आत शिरताच मोटार उलट दिशेने निघाली. पोलिस जमावाच्या तोंडाशी असल्यामुळे हिटलरचा पाठलाग होण्याची शक्यता नव्हती.

लुडेन्डॉर्फला जागच्या जागी पकडण्यात आले. जखमी गोअरिंग जवळच एका बँकेच्या इमारतीत पडलेला होता. बँकेच्या अधिकाऱ्याने त्याला गुप्तपणे ऑस्ट्रियन सरहद्दीवर नेऊन सोडण्यास त्याच्या बायकोला सहाय्य केले. गोअरिंग व त्याची पत्नी ऑस्ट्रियात



लुडेन्डॉर्फ–हिटलर युती

निसटली. रोएमला उठाव फसल्याचे कळताच त्याने शरणागती दिली. हेस मात्र बेपत्ता झाला. लवकरच हिटलरलाही अटक झाली. नाझी उठावाचा हा असा खेळखंडोबा झाला. नाझी पक्ष बेकायदा ठरवण्यात आला. असे वाटले की या पक्षाचा पळून गेलेला हुकूमशहा आता कायमचा इतिहासजमा झाला.

## संकटाची संधी राबविली

......महत्त्वाकांक्षी माणसे इतक्या सहजासहजी इतिहासजमा होत नाहीत ! त्यातून हिटलर हा काही कोणी बिनडोक महत्त्वाकांक्षी झुंड नव्हता. राजकीय डावपेचाचे अनेक छक्केपंजे त्याला माहीत होते. त्याने आपल्या अटकेचे व खटल्याचे असे भांडवल केले की ज्याच्या पुंजीवर नाझी पक्ष नुसता सावरला नाही तर वायमार प्रजासत्ताकाच्या उरावर ठाण मांडून बसला.

वास्तविक आरोपीत सर्वात प्रसिद्ध पुरुष होता लुडेन्डॉर्फ ! असे असता हिटलरने अथपासून इतिपर्यंत खटला असा गाजवला की लुडेन्डॉर्फ मागेच फेकला गेला. अर्थात हे त्याला शक्य होण्याचे कारण बव्हेरियन सरकारचा प्रॉसिक्यूटर गुर्टनेर (Gurtner) हा हिटलरचाच भक्त होता. त्याने खटल्यात अनेक वेळा हिटलरलाच बोलू दिले. अडथळे आणू दिले. मध्येच उठून लांबलचक व्याख्यान त्याने द्यावे, फिर्यादीची उलटतपासणी तासन्तास घ्यावी अशी सर्व मुभा हिटलरने घेतली. शिरर लिहितो–

" He did not intend to make the mistake to plead that he knew nothing, had intended nothing, wished nothing, that was what destroyed the bourgeous world —They had not the courage to stand by their act, to

step before the judge and say— 'Yes, that was what we wanted to do. We wanted to destroy the State–"

[त्याला नेहमीची चूक करण्याची इच्छा नव्हती. नेहमी अशा तऱ्हेच्या खटल्यात आरोपी सांगतात की, आम्हांला यातले काही माहिती नाही, आमचा कसलाच उद्देश नव्हता, आम्हांला काही करायचे नव्हते,–यामुळेच मध्यमवर्गीयांच्या अशा कार्यांची हानी होते. आपल्या कृत्याचे समर्थन करण्याचे धैर्य त्यांच्याजवळ नसते. न्यायाधिशासमोर उभे राहून ते सांगू शकत नाहीत की...'हो, आम्ही हे केले व हेच करण्याचा आमचा उद्देश होता. आम्हांला हे राज्य उलथवायचे होते.']

हिटलरने हे केले!

जगाचे लक्ष वेधून घेतलेल्या या खटल्यात हिटलरने ताठरपणे सांगितले–

"I alone bear the responsibility. But I am not a criminal because of that, there is no such thing as high treason against the traitors of 1918."

एवढेच करून हिटलर थांबला नाही. त्याने काहर, लॉसॉव्ह व सिसेर यांच्या नाकात वेसण घातली. त्याने सांगितले–

"हे तिघे सभेला हजर होते. राईश सरकार बडतर्फ करावे या कल्पनेला या तिघांनी आपल्या भाषणातून पाठिंबा दिला. जर आम्ही देशद्रोही असू तर हे तिघे कोण आहेत?"

काहर व सिसेर यांची बुद्धी हिटलरशी टक्कर घेण्याइतकी तल्लख नव्हती. परंतु जनरल लॉसॉव्ह याने कोर्टाला सांगितले,

"या डोके फिरलेल्या, पूर्वी सैन्यात ढोल बडवणाऱ्या माणसाशी संगनमत करून कट करायला मी काही बेकार सैनिक नव्हतो. एका राज्य सरकारचा मी सैन्यप्रमुख आहे. सरकारचा मंत्री आहे–"

या हेटाळणीला हिटलरने भर कोर्टात चपराक दिली.

"Believe me, I do not regard the acquistion of a Minister's post as a thing worth striving for. I do not hold it worthy of a man to go down in history just by becoming a Minister. One might be in danger of being buried beside other Ministers. My aim from the first was a thousand times higher. I wanted to become a destroyer of Marxism. I am going to achieve this task and if I do, the title of Minister will be an absurdity as far as I am concerned."

[माझ्यावर विश्वास ठेवा! एकादे मंत्रिपद मिळवणे एवढ्याच एका क्षुल्लक गोष्टीकरता आयुष्यात कष्ट करणारा मी नाही. एकाद्या माणसाने केवळ मंत्री होऊन इतिहासजमा व्हावे यात कसला मोठेपणा आहे? न जाणो एकादे वेळेस मला मरणानंतर एकाद्या मंत्र्याशेजारीच न पुरले जावे म्हणजे मिळविली! तीच एक भीती आहे. माझे ध्येय यापेक्षा खूपच मोठे आहे. मार्क्सवादाचा मला फडशा पाडावयाचा आहे. मी हे करीनच करीन. आणि यात मला यश आले तर मंत्रिपद मला तरी अति क्षुद्र वाटेल.]

पुढे बोलताना हिटलरने सांगितले––

"मी जेव्हा प्रथम रिचर्ड वॅगनरच्या थडग्याजवळ उभा राहिलो. तेव्हा या माणसाविषयीच्या आदराने भारावून गेलो. त्याने आपल्या थडग्यावर आपली बिरुदे लिहिण्यास मरण्यापूर्वीच मनाई केली होती. फक्त 'वॅगनर' या साध्या नावात सर्व काही आहे. काय आहे त्या बिरुदावलीत? मी पूर्वी लष्करात ड्रमर होतो यात लाज कसली? मी वॅगनरचे संगीत वाजवत होतो. या थोर संगीतज्ञाशी माझा यामुळे संबंध आला यातच मी धन्य झालो!"

कोर्टात भाषण करताना हिटलरने केवढे अवधान ठेवले होते पहा. त्याने सैन्याला अप्रत्यक्षरीतीने खूपच केले. तो म्हणाला––

"मला जेव्हा कळले की आमच्या मोर्चावर पोलिसांनी गोळीबार केला तेव्हा मी समाधानाचा निःश्वास सोडला. म्हणजे सैन्याने हे पाप केले नव्हते. राईशवेर सैन्याने असे काळे कृत्य केलेही नसते! एक दिवस असा उगवेल की राईशवेर सैन्य हे आमच्या बाजूला खडे होईल.––"

भाषणाच्या अखेरीस आपली नजर न्यायाधीशांवर रोखून हिटलर म्हणाला—

"For it is not you, gentlemen, who pass judgement on us. The judgement is spoken by the Eternal Court of history––"

**लँड्सबर्गच्या तुरुंगात**

[या भाषणाचा संपूर्ण भाग या लेखाच्या सुरुवातीला दिला आहे.






लॅंड्सबर्गमध्ये ...वादळापूर्वीची शांतता

—सं. ] हिटलरच्या भाषणाचा व त्याने स्वीकारलेल्या संपूर्ण जबाबदारीचा परिणाम म्हणून लुडेन्डॉर्फ निर्दोषी सुटला. हिटलरला वास्तविक जन्मठेप व्हायची पण त्याला फक्त पाच वर्षांची साधी कैद जाहीर झाली.

१ एप्रिल १९२४ ला हिटलरला कैदेत ठेवण्यासाठी लॅंड्सबर्गच्या जुन्या किल्ल्यात नेण्यात आले. आता हिटलर फक्त बव्हेरियातील क्षुल्लक पक्षाचा पुढारी उरला नव्हता. कोर्टातील त्याच्या भाषणाने लक्षावधी जर्मन तरुणांना मोहिनी घातली होती.

ज्या बिअर हॉल उठावामुळे ही संधी हिटलरला आली त्या मोर्चात मरण पावलेल्या १६ नाझींचे स्मारक १९३५ साली चॅन्सेलर हिटलरने आठवणपूर्वक उभारले. या स्मारकाचे अनावरण करताना हिटलरने सांगतले——

" हे हुतात्मे आता अमरत्वात विलीन झाले आहेत. आमच्या चळवळीचे हे खरेखुरे साक्षीदार. त्यांचे आत्मे चिरंतन जर्मन जनतेचे भलेच चिंतित राहतील."

तूर्त मात्र हिटलर लॅंड्सबर्ग किल्ल्यातील तुरुंगाच्या गजाआड उभा राहून जवळून वाहणाऱ्या लेश नदीच्या प्रवाहात आपले भवितव्य पहात होता. शेख अब्दुल्लाची कॉंग्रेस सरकारने जशी शाही तैनात ठेवली होती त्याप्रमाणे बव्हेरियन सरकारने हिटलरचीही बडदास्त ठेवली होती. त्याला त्याच्या भक्तांतून येणाऱ्या भेटी पोचत होत्या. इतकेच नव्हे तर जेव्हा रुडॉल्फ हेस हा पोलिसांच्या स्वाधीन झाला तेव्हा त्यालाही आपल्याच कोठडीत ठेवावे ही हिटलरची विनंती पण मान्य करण्यात आली. हिटलरने कारण सांगितलें— ' मला लिखाण करायचे आहे. त्यासाठी हेस मला जवळ हवा आहे.'

खरोखरच हिटलरला लिखाण करावयाचे होते. आपल्या लढ्याची भूमिका स्पष्ट करणारे निवेदन आणि सत्तेवर येताच आपण काय करणार आहोत याचा स्वच्छ आराखडा त्याला तयार करावयाचा होता. तुरुंगाच्या गजाआड कधी बसून तर कधी येरझारा घालता घालता आपले मनोगत तो हेसला सांगू लागला. हेस सर्व बोलणे लिहून घेऊ लागला.

हेच ते हिटलरचे आत्मवृत्त—— ' माईन काम्फ '—— ' माझा लढा '——!!

[ अपूर्ण ]

# लॅंड्सबर्ग ते चॅन्सेलरी

हिटलरच्या लॅंड्सबर्ग तुरुंगातून बाहेर आला तो चित्त्याची झेप टाकण्याच्या आवेशानेच. पण अमेरिकन भांडवलाचा ओघ जर्मनीकडे वळल्यामुळे समृद्धीचा व स्थैर्याचा एक नवा कालखंड जर्मनीत त्यावेळी सुरू झाला होता. हा काळ आपल्याला अनुकूल नाही हे हिटलरने अचूक हेरले व संधीची वाट पाहण्याशिवाय त्याला गत्यंतर उरले नाही. २९ साली पुन्हा मंदीची लाट जर्मनीवर कोसळली आणि हिटलरने झडप टाकली. इतकी अचूक आणि निकराची की चॅन्सेलरपद त्याच्याकडे अगदी लोकशाही मार्गाने चालत आले.

लॅंड्सबर्गच्या कोठडीतून जर्मनीच्या चॅन्सलरपदाकडे हिटलरने केलेल्या या आठ वर्षातील तुफानी घोडदौडीची कहाणी—पुढील अंकी.




आगगाडींतून प्रवास
करीत असतांना
काळजी
घ्या !
पेटती सिगरेट
फेकण्यापूर्वीं ती
विझवा किंवा
राखदाणी
(ॲश् ट्रे) वापरा.
डब्यांत स्टोव्ह
पेटवूं नका
ज्वालाग्राही पदार्थ
डब्यांतून नेऊं नका
PETROL
ACID
आगगाडींत असतांना
सुरक्षितते
साठीं
आगप्रतिबन्धक
नियमांचें
पालन करा.
जीवन व वस्तू याचा नाश करणारी
भयानक आग लागण्यास निष्काळजी-
पणा कारणीभूत होणे शक्य असतें.
प्रवासांतील सुरक्षिततेच्या हेतुने मध्य रेल्वे द्वारा प्रकाशित
MARATHI

## ‘रायगडा’च्या उतारावरील

# मोहिनी



संपादकीय कचेरीचे बदलते स्वरूप ! [सोळंकी–उमा]

दि. ७ व ८ मेला पुण्याच्या बहुरूपी रंगमंदिरात ‘नाट्यसंपदा’ मुंबई, सादर करणार असलेल्या ‘मोहिनी’ या नाटकाच्या प्रयोगाबद्दल बरेचसे कुतूहल होते. प्रा. वसंत कानेटकर यांचे ‘रायगडाला जेव्हा जाग येते’ या नाटकानंतरचे हे नवे कोरे नाटक असल्यामुळे चोखंदळ प्रेक्षकांची नाटकाला बऱ्यापैकी गर्दी होती. ‘सामाजिक समस्येवर प्रकाश’ टाकणारे नवीन नाटक म्हणून या नाटकाची जाहिरातही भरपूर झालेली होती.

ठीक साडेनवाला पडदा वर जाण्याची सूचना देणारी तिसरी घंटा झाली आणि घाईघाईने आत येणाऱ्या प्रेक्षकांना एक अभिनव प्रकार पहावयास सापडला. ‘तुफान’ चा अंक विकणारा एक पेपरवाला प्रेक्षकांतून उठून स्टेजच्या दिशेने ओरडत जाऊ लागला आणि ‘तुफान’ च्या अंकात छापलेल्या खळबळजनक बातमीची माहिती प्रेक्षकांना समजली......

‘तुफान’ या साप्ताहिकाच्या (की दैनिकाच्या–कारण नाटकातून या गोष्टीचा खुलासा झाला नाही) कचेरीत काम करणाऱ्या किल्लेदार नामक उपसंपादकाच्या डोक्यात अंकात काहीतरी सनसनाटी बातमी छापावी असा विचार आला. पेशवे नावाचा हरकामी माणूस त्याच कचेरीत काम करीत होता. दोघांच्याही डोक्यातून एक काल्पनिक बातमी निघाली. संपादक दौऱ्यावर होते तेव्हा दोघांना मोकळे रान होतेच. मोहिनी नावाच्या ‘चटकचांदणीचे कारस्थान’ अशा मथळ्याखाली या दुकलीने ॲटम बॉंब अंकात टाकून दिला. मोहिनीच्या भानगडी, सरकारी अधिकाऱ्यांची, मंत्र्यांची, सैन्यातील अधिकाऱ्यांची तिच्या घरी होणारी वर्दळ, एका प्राध्यापकाचा तिच्याशी असलेला संबंध, हिऱ्याचा चोरटा व्यापार करण्यात तिचे सहाय्य आदि कपोलकल्पित गोष्टी छापलेल्या होत्या.

मालक–संपादक परत आल्यावर हा सगळा प्रकार त्यांना समजला आणि त्यांनी पेशवे आणि किल्लेदार यांची चांगलीच कानउघाडणी केली. पण खरी गंमत पुढेच होती. या सगळ्या बातम्या कर्मधर्मसंयोगाने खऱ्या ठरत गेल्या. फरक एवढाच होता की ही ‘मोहिनी’ प्रत्येक प्रसंगी निरनिराळी होती.

सिनेमानटी मोहिनी तमासगीर मोहिनी हातकणगलेकर आणि प्राध्यापक कानविंदे यांची पत्नी सौ. मोहिनी कानविंदे अशा तीन वेगवेगळ्या स्त्रियांना ‘तुफान’ मधील बातमीतील काही भाग लागू पडत होता.

संपादकाला आपल्याला सोन्याचे अंडे देणारी कोंबडीच या बातमीच्या रूपाने सापडलेली आहे याची कल्पना हळूहळू येऊ लागली आणि तेथूनच पुढील घटनांचा रंग पालटला. सरकारी अधिकाऱ्यांची, मंत्र्यांच्या चिरंजिवांची, मंत्र्यांची, सिनेमा डायरेक्टरची आणि या तीनही मोहिनींची वर्दळ ‘तुफान’-च्या कचेरीत वाढू लागली आणि आपल्याबद्दल अधिक काही छापून येऊ नये म्हणून ‘तुफान’ च्या संपादकांना या ना त्या रूपाने भरपूर पैसा मिळू लागला.

‘तुफान’ च्या कचेरीचे स्वरूप पालटले. तिथे उत्तम फर्निचर दिसू लागले. पेशवे आणि किल्लेदार यांच्या पोषाखात फरक पडला आणि निरनिराळ्या क्लृप्त्या लढवून आपले वाढवण्यात संपादक–महाशय गर्क झाले. असे होता होता सरकारी गुप्त गोटातल्या बातम्या छापून गुन्हा केल्याच्या आरोपाखाली संपादकाला अटक झाली आणि साप्ताहिकाची जबाबदारी कॅप्टन सौमित्र नावाच्या त्याच्या मित्रावर आली. सरळपणे, धोपटमार्गाने जाणारा हा माजी सैनिक–अधिकारी होता. वृत्तपत्रव्यवसायाची कोलांटी कसरत त्याला जमली नाही; आणि मंत्र्याच्या मुलाबद्दल (सर्जेरावबद्दल) बातमी छापावी की नाही या बाबतीत वादविवाद चालू असतानाच संपादकाची सुटका होऊन तो कचेरीत परत आला. मंत्र्यातर्फे त्याला हार घालण्यात आला आणि त्याला मंत्रिमंडळात घेतल्याची बातमीही कळली. अशा रीतीने या नाटकाचा शेवट झाला.

### समस्याप्रधान की फार्स ?

या कथानकातून प्रा. कानेटकरांना आपण एका चांगल्या सामाजिक समस्येला हात घातला आहे असा भास झाला. सनसनाटी बातम्यांचा धंदा ही काही सामाजिक समस्या नाही. यामुळे जी समस्याच नाही तिच्यावर प्रकाश कसला पडणार ? एक विनोदी नाटक

म्हणून समाजात प्रतिष्ठित म्हणून मिरवल्या जाणाऱ्याच्या पायाखाली खोटेपणा दडलेला आहे हे दाखवण्याचा नाटककाराचा हेतू असता तर 'साष्टांग नमस्कार' किंवा 'लग्नाची बेडी' इतपत तरी चागले नाटक निर्माण झाले असते. परंतु सामाजिक समस्या सागून या नाटकातील 'तुफान' च्या संपादकाला आचार्य अत्रे यांची टोपी चढवण्याचा प्रयत्न करण्यात आला. हे जर कोणी नाकारले तर–तर केवळ कोर्टाच्या भयाने. अन्यथा नाकारणे कठीण. ज्यांच्याबद्दल अशा सनसनाटी बातम्या वृत्तपत्रे छापतात त्यांच्याबद्दल अशा प्रकारची शक्यता आधीपासूनच असते. शिवाय असे आरोप जो करतो त्याला काही सामाजिक प्रतिष्ठा, कर्तृत्व आणि किमानपक्षी काहीतरी चांगल्या कार्याची शागिर्दी असल्याखेरीज हा धंदा फायद्यात पडत नाही. कारण नाहीतर त्या टीकेला विचारणार कोण ?

म्हणून मग नाटकाची विनोदी ठेवण बाजूस सारून मेजर सौमित्रानी नाटक गंभीर बनवण्यास प्रारंभ केला. आपण समस्याप्रधान नाटक लिहिणार आहोत याची जाणीव लेखकाला बहुतेक यावेळी झाली असावी. शेवटच्या गंभीर वातावरणाने पहिल्या दोन अंकांतील खेळकरपणा नाहीसा करून टाकला. या नाटकाला 'फार्स' म्हणावे की आणखी काही म्हणावे या विचारात प्रेक्षक बाहेर पडले. बहुधा बाहेर पडताना प्रेक्षक नाटकाबद्दल काहीतरी बोलतात. पण यावेळी तसा काहीच प्रकार झाला नाही. आपण जे काही पाहिले ते नेमके काय होते, कसे होते याच विचारात प्रत्येकजण अबोल अवस्थेत चाललेला दिसून आला. कारण आपण पाहिली ती समस्या काय होती हे त्याला कळेना आणि प्रकाश काही मिळेना.

हे झाले मूळ नाटकाबद्दल. आता 'नाटचसपदा' ने प्रयोग सादर कसा केला त्याबद्दल सांगितले पाहिजे.

चित्तरंजन कोल्हटकरानी या नाटकाचे दिग्दर्शन केले आहे. संपादकाची भूमिकाही त्यांनी चांगली केली. मात्र त्याची शरीरयष्टी या भूमिकेला साथ देणारी नाही. श्री. गणेश सोळंकी यांनी रंगवलेला 'पेशवे' आणि 'तीन चोक तेरा' प्रसिद्ध श्री. पडुरकर यांनी रंगवलेले प्रोफेसर कार्नविदे या यातल्या सर्वोत्कृष्ट भूमिका. शकर घाणेकर यानी आपल्या 'किल्लेदार' भूमिकेसाठी नेहमीच्या त्याच त्याच बुरुजाचा वापर केला आहे. ज्यांना त्याचा हा तोच तोपणा आवडतो त्यांना त्यांचे काम उणे वाटणार नाही. प्रभाकर पणशीकरानी 'मेजर सौमित्र' याची भूमिका चागली केली. नलिनी चोणकर यानी सिनेमानटीची भूमिका अशा रीतीने केली आहे की 'फार्स' मध्ये ती खटकली नसती. त्या मानाने उमाने केलेली तमासगीर 'मोहिनी' ची भूमिका सरस वाटली. गुलाब कोरगावकर यानी 'सौ. कार्नविदे' याची भूमिका ठसठशीतपणे केली. या तिघीना रूपदर्शनाला भरपूर वाव असला तरी अभिनयदर्शनाला नव्हता.

मूळ नाटकातच फारसा रस नसल्यामुळे कलाकारानी घेतलेल्या सर्व मेहनतीचे चीज झाले नाही. सबंध नाटक नीटसे उभेच रहात नाही.

नाटकाची सुरुवात पडद्यामागे न होता प्रेक्षकातून होते हेच या नाटकाच्या नाटककाराचे दुर्दैव !

*

## सुबक ठेंगणे नाटक

# .... खून पाहावा करून ?

समजा, एखाद्या नाकासमोर आयुष्य काढलेल्या सुखवस्तू सुखी–समाधानी (म्हणजे नेटकी बायको, राहायला बऱ्यापैकी टुमदार घर, एखादाच कॉलेजात शिकणारा मुलगा, घरात कोच, रेडिओ वगैरे)– अगा मऊ माणसावर त्याच्या उतारवयात खुनाचा आरोप आला तर ? नुसता खुनाचा आरोप आला नाही तर हे प्रकरण दाबण्यासाठी घरदार विकून पैसा उभा करावा लागणार अशी परिस्थिती आली तर ? तर अर्थातच असा माणूस पैसा उभा करून हे प्रकरण दाबून टाकण्याचा प्रयत्न करील. परतु खरोखर त्याने खून केलेला नसताना, अशा खोट्या आरोपाचे निवारण करण्याकरता पैसा आणि प्रतिष्ठा धुळीला मिळवणे हे त्याला आत्मघाताइतकेच भयकर वाटेल. अशा चितातुर अवस्थेत एक नवोदित रहस्यकथाकार त्यांना "खुणेवाचून खून" समजावून सांगण्यास आला तर ज्याने खुनाचे किटाळ आणले त्याला या जगातून अलगद नाहीसा करून मोकळे व्हावे असा विचार खुनाचे किटाळ आलेल्या पापभीरु माणसाच्या मनाला शिवणे अशक्य नाही. मात्र आयुष्यात उदीर मारणेही न जमणाऱ्या माणसाने असा "खुणेवाचून खून" करण्याची योजना आखायला सुरुवात करताच असख्य घोटाळे उडू लागणार हे निश्चित. रहस्यकथेच्या पुस्तकातला खून प्रत्यक्षात उतरवणे बाजूलाच राहून उलट ज्याचा खून करायचा तो माणूस खून करू इच्छिणाऱ्या माणसाच्या घरात अचानक हार्टफेल होऊन मरून जावा तर अशा वेळी रहस्य आणि विनोद याची आतषबाजी कशी सुरेख करता येईल नाही ?

'खून पाहावा करून' या पुण्याच्या प्रागतिक नाटक मंडळीने रगभूमीवर आणलेल्या झक्क नाटकाचा हा विषय आहे.

आता नाटकाचा एवढा चागला सोपा विषय मराठीतल्या लेखकाला सुचणे जरा कठीण हा तर्कही बरोबर आहे. "नॉट इन दि बुक" या इंग्रजी नाटकाचे हे सुबक रूपान्तर केलेले आहे. "बाधा" या कलाकृतीच्या लेखिका सरिता पदकी यांनी केलेले हे रूपांतर इतके चागले आणि अस्सल उतरले आहे की नाटक पाहात असताना नाटकाच्या सुरुवातीला "लेखिका– सरिता पदकी" असे सांगतात तेच खरे वाटू लागते. नाटक रूपांतरित वाटतच नाही !

श्रीराम लागू यांनी केलेली यातील खून करू पहाणाऱ्या अण्णासाहेब बर्वे या सालस माणसाची भूमिका, आणि जब्बार पटेल यांनी वठवलेली रहस्यकथाकार त्र्यबक गर्गे यांची भूमिका या दृष्ट लागावी इतक्या सरस वठतात. भूमिकाचा बोज हे दोघे सफाईने सांभाळतात आणि नाटकातील सर्व अभिप्रेत विनोदाचा रतीब अगदी वरच्या धारेसह प्रेक्षकांना पोचवतात. यातील तिसरी उल्लेख-

नीय भूमिका विश्वास मेहेंदळे यांनी केली आहे. वारटक्के या कमी ऐकू येणाऱ्या बडबडया पुणेरी गृहस्थाचे काम ते सहजसुंदर करतात. आप्पासाहेबांच्या पत्नीचे— सुलोचनाबाईंचे काम सौ. श्यामला वनारसे यांनी मोकळेपणाने करून श्रीराम लागूंना उत्तम साथ दिली आहे. इतर कामे बरी आहेत— कारण त्यांना नाटकात वाव बेताचाच आहे.

या नाटकात खटकणारी गोष्ट एकच वाटली आणि ती म्हणजे समशेरसिंगाचे पात्र ! हा समशेरसिंग काश्मिरी दाखवून नाटकाला फारशी मदत न होता अनेक अडचणी मात्र निर्माण झाल्या आहेत. पहिली अडचण भाषेची. काश्मिरी माणूस अस्सल मराठी बोलू लागला की काही बरे वाटत नाही. बरे,काश्मिरी माणसाशी ब्लॅकमेलिंगची सांगड घालायलाही मन थोडे नाखूष असते. या त्याच्या काश्मिरी वंशामुळे...नाटकात हे पात्र प्रयोगसिद्ध (Establish) होण्यासाठी काही भुरटा संवाद नाटकात घुसला आहे. जर हा माणूस हैदराबादी मुसलमान दाखवला असता तर मराठी भाषेची अडचण नाहीशी होऊन...हैदराबादी मुसलमानांनी मराठी जीवनात घातलेले सर्व गोंधळ ताजे असल्यामुळे—हे पात्र एकदम रांगेला लागले असते.

हा दोष वगळला तर नाटकातील विनोदाच्या जागा...प्रभावी निर्मळ विनोदाने उत्तम साधल्या आहेत. दुसऱ्या अंकात तर नाटकाचा नूर ध्यानी आल्यानंतर प्रेक्षकांचे विचलित झालेले लक्ष तिसऱ्या अंकातही वेधून ठेवण्याची अवघड कामगिरी, गंमत उडवणाऱ्या संवादांनी लेखिकेने चांगली पार पाडली आहे. सुबक रूपान्तर व डौलदार अभिनय असूनही एकंदरीत नाटक ठेंगणे वाटते. याबद्दल अर्थात कुणाची तक्रार असणार नाही. कारण उत्तम करमणूक ही देखील इतकी दुर्मिळ झाली आहे की 'खून पहावा करून' सारखे नाटक रंगभूमीवर आणल्याबद्दल आम्ही सरिता पदकी व श्रीराम लागू यांचे अभिनंदन करतो.

●

# एक अपूर्वाईचा शिवजन्मोत्सव



परवाच्या मे ची १३ तारीख. पुण्याच्या बॉम्बे इंजिनियरिंग ग्रूपच्या परिसरात 'शिवजन्मोत्सव' साजरा झाला. या समारंभाचे चालक होते जवान लोक – सैन्यातील मंडळी. शिस्तीचे पाईक. देशाचे रक्षणकर्ते. सामान्य लोकांशी त्यांचा फारसा संबंधच नाही असे. त्यांच्या कामातच ते दंग.

तर काय गंमत झाली की, आम्हांला त्यांनी शिवजन्मोत्सवाला बोलाविले. व्याख्यानासाठी या म्हणाले. आम्ही गेलो.

पण या शिवजन्मोत्सवाची अपूर्वाई कोणत्या शब्दांनी वर्णावी? भारीच थाटमाट.

आम्ही गेलो तर बॅंडवादन चाललेले. 'जिंकू अथवा मरू 'ची आळवणी त्यातून होत असलेली. दारावरच्या मंडळींनी थाटामाटात मानवंदना दिली. आम्ही आत गेलो. पादत्राणे काढून ठेवा म्हणाले. साबण लावून हात धुवा म्हणाले. आणि ते केल्यावर आम्ही त्यांनी टाकलेल्या पायघड्यांचेवरून चालत गेलो. राजा शिवछत्रपतींच्या भव्य व्यासपीठापर्यंत आम्ही चाललो. महाराजांना मुजरा केला.

तेवढ्यात 'छत्रपती शिवाजीमहाराज की जय!' ची भव्य घोषणा झाली. समारंभ सुरू झाला. संगीत कीर्तनातून शिवजन्माची कहाणी सांगितली गेली. बालराजे जन्माला आले. त्यांच्या नावाचा जयजयकार झाला. पाळणा म्हटला गेला. आणि 'हरहर महादेव' च्या रणगर्जनेत आम्हांला महाराजांचे दर्शन घडले ! त्यांच्या अवतीभोवती चार मावळे शत्रूवर चाल करून जायच्या पवित्र्यात उभे दिसले. आणि समोर शिंग फुंकीत असलेल्या जवानांनी लेझिम खेळून महाराजांना मानवंदना दिली. पुन्हा 'हरहर महादेव 'ची रणगर्जना झाली· ऊर भरून आला. वातावरण एकदम गंभीर झाले.

तिथे जमलेल्या सर्व जातींच्या, सर्व धर्मांच्या स्त्रियांनी डोईवर पदर घेऊन महाराजांना नमस्कार केला. जवानांनी त्यांच्या थाटात महाराजांचे दर्शन घेतले. त्यासरशी लहान मुलांनी समरगीते गाईली आणि बॅंडवर त्या गीतांचे स्वर उमटले.

सैनिकांच्या मेळाव्यात, प्रचंड मेळाव्यात. आम्ही एका आलिशान मंडपात बसलो होतो. सारे वातावरण शिवाजीमय झाले होते.

आम्ही महाराजांच्यापुढे त्यांचेसंबंधी काय बोलावे? पण शिवराज्याभिषेकाच्या आठवणीने त्यांच्या भारतीय जीवनाची गाथा आम्ही वाचली. महाराजांचा मोठेपणा सांगता येईल तेवढा सांगण्याचा आम्ही प्रयत्न केला. परंतु महाराज एवढे मोठे की, आमच्या भाषणापेक्षा त्यांच्या जयघोषानेच त्या ठिकाणची पुण्यनगरी दुमदुमून गेली. आभाळीच्या नक्षत्रांना हेवा वाटावा एवढ्या सुंदर रोषणाईने सजविलेल्या व्यासपीठावर महाराज स्थानापन्न झालेले ! त्यांच्या दर्शनानेच सारे जवान भारून गेलेले. त्यांच्या जयघोषाने आणि 'हरहर महादेवा 'च्या गर्जनेने त्यांनी महाराजांना मानवंदना दिलेली. आम्ही त्यातच सामील झालो. प्रसाद ग्रहण केला.

आणि महाराजांचा व जवानांचा निरोप घेऊन आम्ही निघणार तेवढ्यात 'हरहर महादेव' ची रणगर्जना जवानांनी पुन्हा एकवार केली. त्यांचा म्होरक्या, समारंभाचा त्या दिवशीचा सूत्रधार, पुढे आला. आणि आमच्यासमवेत महाराजांना मुजरा करून त्याने आम्हांला सांगितले, "आज मी आघाडीवर चाललो. बोमदिलाकडे दुपारच्या गाडीने जाईन. महाराजांचा आशीर्वाद पाठीशी आहे. शिवजन्माच्या या स्फूर्तीने मी पुनीत झालो. खात्रीने यश घेऊन येईन." त्यासरशी आमचे अंग शहारले. आणि त्या ठिकाणीच सारी धरणीच जशी काय स्फूर्तिमती होऊन उठली !

—डॉ. सरोजिनी बाबर

●



: १ :

# ती अखेरची पंधरा पावले

**१९६३ च्या सुरवातीचा काळ**

शांत पावले टाकत ती धिप्पाड मूर्ती चेंडू टाकण्याच्या खुणेकडे चालली होती. एक दोन करीत पंधरा पावलांचे अंतर तिला गाठावयाचे होते. नेहमी दिसणारा जलदपणा, जोश, उत्साह, आज तिच्या अंगी दिसत नव्हता. अगदी जड पावले पडत होती त्या मूर्तीची. आपल्या कसोटी जीवनाची समाप्ती करणारा शेवटचा, अगदी शेवटचा चेंडू टाकण्यासाठी तो निघाला होता. आजपर्यंत त्याने या सिडने मैदानावर अनेक षट्के सतत टाकली. परंतु आता टाकावयास निघालेल्या शेवटच्या चेंडूने त्याचे मन दुःखी केले. सतत चेहऱ्यावर उमटणारी स्मितरेषा आजच दिसत नव्हती. आपल्या प्रिय कांगारू देशाची सेवा पुन्हा करावयास मिळणार नाही या विचाराने त्याचा तेजस्वी चेहरा कोमेजून गेला होता. शेवटी तो आपल्या इच्छित स्थळी जाऊन पोहोचला. मनात विचारांचे काहूर माजले. गत पराक्रमांची चलत्‌चित्रे त्याच्या हृदयपटलावर उमटू लागली. क्षणभर तो थबकला. मनात विचार आला, कसोटी जीवनाची समाप्ती करणाऱ्या या शेवटच्या चेंडूवर समोरचा फलंदाज बाद होईल का? शरीर रोमांचित झाले. पुन्हा चैतन्य शरीरभर खेळू लागले. आणि अगदी शेवटचा चेंडू टाकण्यासाठी त्याने आपली लयबद्ध दौड सुरु केली. पंधरा पावलांचे अंतर संपताच उंच उडी मारून त्याने चेंडू सोडला. गेल्या १० वर्षांच्या क्रिकेटमेहनतीचे सारे कसब पणास लावून त्याने चेंडू टाकला. इंग्लिश संघाचा शेवटचा फलंदाज डी. स्मिथ फलंदाजी करीत होता. त्या महान गोलदाजाच्या हातांतून उसळी घेऊन आलेल्या चेंडूला स्मिथच्या बॅटीने हळूच प्रेमस्पर्श केला. फलंदाजाचा अवघड झेल उडाला, चेंडू यष्टिरक्षक ग्राउटच्या दिशेने प्रवास करू लागला. ग्राउटच्या हातून झेल सुटणे अशक्यच. परंतु दुर्दैव विचाऱ्याचे. तो झेल घेण्यात त्याला अपयश आले. झेल त्याच्या हातातून सुटला. आता चेंडू जमिनीवर पडणार तोच स्लिपमध्ये मावज टिपण्यास सदैव तत्पर असणाऱ्या बॉबी सिम्सनने डोळ्याचे पाते लवते न लवते तोच चेंडूवर झडप घातली व जमिनीपासून अवघ्या दोन तीन इंचांवर त्याने हा अपूर्व झेल पकडला! फलंदाज बाद झाला. त्या श्रेष्ठ गोलंदाजाचे अखेरच्या चेंडूवर गडी बाद करण्याचे स्वप्न साकार झाले. पंचाकडे जाऊन मोठ्या नम्रतेने त्याने आपला स्वेटर घेतला व तो तंबूची वाट चालू लागला. सर्व साथीदार त्याचे अभिनंदन करीत होते. मैदानाच्या कानाकोपऱ्यांतून टाळ्यांचा कडकडाट चालू होता. हा अपूर्व सोहळा पहावयास मिळावा म्हणून मेघाआड दडलेला सूर्य मेघांचे आवरण दूर भिरकावून बाहेर आला.

आपली क्रीडाकारकीर्द संपवून तो परत चालला होता. तंबूच्या प्रवेशद्वाराजवळ कप्तान रिची बेनो थांबला होता. मोठ्या आदराने त्याने त्या श्रेष्ठ गोलंदाजास प्रथम पुढे जाण्यास सांगितले. दाराशी एका ओळीत उभे राहून सर्व खेळाडूंनी त्याला शेवटची मानवंदना दिली. तो तंबूत गेला. अभिनंदनाचा व स्तुतिसुमनांचा वर्षाव घडत होता. परंतु या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करून तो एका छोट्याशा खुर्चीवर जाऊन बसला. समोर पसरलेल्या सिडनेच्या भव्य मैदानावर त्याची नजर फिरत होती. त्या मैदानावरील सोनेरी किरणांत न्हाऊन निघत असलेली, कोवळी हिरवळ तो डोळे भरून पहात होता. भूतकालीन पराक्रमांची त्याला आठवण झाली. मन गहिवरून गेले. आता आपण क्रिकेट खेळास अंतरलो या दुःखद विचाराने त्याच्या नेत्रकडा पाणावल्या होत्या. बराच वेळ तो समोर टक लावून बसला होता. सर्वत्र स्तब्धता पसरली होती. इतक्यात नील हार्वेची प्रेमळ मूर्ती त्याच्या मागे येऊन उभी राहिली त्याने आपला हात बसलेल्या त्या वीराच्या पाठीवर ठेवला. आणि तो म्हणाला, "अॅलन, ऊठ, बराच वेळ झाला, आता आपण आपल्या साथीदारांबरोबर कसोटी जीवनातील शेवटचे जेवण घेऊया." नील हर्वेसारख्या श्रेष्ठ खेळाडूने एवढी आपुलकी दाखवावी असा वीर तरी कोण होता तो? "आपल्या कुशल चेंडूफेकीवर रिची बेनोला विजेतेपद मिळवून देणारा, संकटकाळी आपल्या संघाच्या रक्षणार्थ धाऊन येणारा, असंख्य अवघड झेल घेऊन मोठमोठ्या फलंदाजांना नामोहरम करणारा अॅलन डेव्हिडसन होता तो. आपल्या आदर्श क्रीडावागणुकीने रसिकांची मने जिंकणाऱ्या अॅलन डेव्हिडसनच्या निवृत्तीचा प्रसंग होता तो. याच सिडने मैदानावर त्याने आपल्या क्रिकेटजीवनाचा पाया घातला. साऊथ आफ्रिका, वेस्ट इंडीज, इंग्लंड, या संघांतील प्रबळ फलंदाजांच्या धावसंख्येला त्याने याच मैदानावर लगाम घालण्याचा पराक्रम वेळोवेळी गाजविला होता. याच मैदानावर व्हिक्टोरिया संघाविरुद्ध त्याने शेफिल्ड सामन्यात आतषबाजीयुक्त शतक फडकाविले होते. आपल्या जोरदार व आकर्षक फटक्यांनी त्याने अनेकांची हृदये घायाळ केली होती. आणि याच पराक्रमभूमीवर अॅलनने आपल्या क्रीडाजीवनाची सांगता केली.

आता डेव्हिडसनच्या निवृत्तीने कांगारू संघात मोठी पोकळी निर्माण झाली आहे ती पोकळी कोण भरून काढणार ही चिंता आता कांगारू देशास लागून राहिली आहे. आपल्या १० वर्षांच्या कालावधीत त्याने ४४ कसोटी सामन्यांत १३२८ धावा केल्या व १८६ गडी बाद करण्याचा पराक्रम गाजवला.

*

: २ :

## ऑस्ट्रेलिया – इंग्लंडची आगामी लढत

सध्या कांगारू संघ बॉबी सिम्सनच्या नवख्या नेतृत्वाखाली इग्लिश सफरीवर गेला आहे. रिची बेनोने प्राप्त केलेले अजिंक्यपद *कायम टिकविण्याची जिद्द या संघाने बाळगली* आहे. या प्रसंगी हा संघ संभाव्य लढतीत विजयी ठरेल का, या प्रश्नाचा विचार करणे उचित ठरेल. या संघात जुन्या व अनुभवी खेळाडूचा अभाव असल्याने, सर्व सामर्थ्य पणास लावून मैदानात उतरणाऱ्या इग्लिश संघास यशस्वी झुजी देण्याची अवघड कामगिरी सिम्सन व त्याच्या तरण्याबाड साथीदाराना करावयाची आहे. नील हार्वे, ॲलन डेव्हिडसन, केन मॅके, रिची बेनो, कॉलीन मॅक्डोनॉल्ड इ. भारी रथी-महारथी निवृत्त झाल्याने कांगारू सघाची स्थिती काहीशी नाजुक बनावी यांत नवल नाही. सिम्सन सघात ओनिल, पीटर बर्ज, वॉली ग्राउट आदि मोजकेच खेळाडू वगळता, बाकी सर्व खेळाडू नवथर आहेत. काहीना तर अजून एकाही कसोटी सामन्यात खेळण्याची सधी मिळालेली नाही. अशा स्थितीत कांगारू सघ कितपत यश प्राप्त करील याबद्दल साशकताच आहे. गेल्या ५० वर्षांत असा दुबळा सघ परदेशी गेला नव्हता, अशी कडक टीका अनेक तज्ञ समीक्षकांनी केली आहे. नवीन खेळाडू इंग्लिश वातावरणात प्रथमदर्शनी फारसे यश मिळवू शकत नाहीत असा आजपर्यंतचा अनुभव आहे. या सत्यस्थितीचा विचार करता भावी लढतीत विजय मिळविण्याची बिकट कामगिरी या सघास करावयाची आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

सतत बदलते हवामान, खराब हिरवळ, ही इग्लिश भूमीवरील प्रमुख वैशिष्ट्ये समजली जातात. या परिस्थितीत नवखा खेळाडू बावरून जातो, व त्यात हमखास अपयश येऊन, त्याच्या पराक्रमास खग्रास ग्रहण लागते. परंतु असे असूनही या संघातील काही वीर नेत्रदीपक पराक्रम गाजविल्याशिवाय राहाणार नाहीत असा आशावाद रिची बेनोसारख्या भूतपूर्व कुशल सारथ्यास वाटत आहे. कांगारू संघात ग्रॅहॅम कॉर्लीग, नील हॉक, ग्रॅहॅम मेकॅंझी हे प्रमुख आघाडीचे वेगवान गोलंदाज आहेत. फिरक्या गोलदाजीची बाजू सिम्सन, रेक्स, सेलर्स, व्हिवर्स, मार्टिन हे सभाळणार आहेत. फलंदाजीची सारी मदार बुथ, लॉरी, सिम्सन, ओनिल, बर्ज, रेडपाथ, पॉटर, कोनोली या वीरावर आहे. फलदाजीत कागारू सघ चांगलाच बलवान वाटतो. परंतु गोलंदाजीत मात्र तो काहीसा दुर्बल आहे. ॲलन डेव्हिडसन, रिची बेनो यांसारखे हमखास गडी बाद करणारे गोलंदाज या सघात नाहीत. कागारू सघाचे बरेच यश आघाडीच्या ग्रॅहॅम मेकॅंझीच्या पराक्रमावर अवलबून आहे. 'डेव्हिडसन-बेनो या जोडीची अनुपस्थिती कांगारू सघास या लढतीत चागलीच जाणवणार आहे.

इग्लिश सघाच्या सामर्थ्याचा विचार करता फलदाजीत व गोलदाजीत हा सघ समान बलाचा आहे असे वाटते. डेक्स्टर, बॅरिंग्टन, कौड्री, पारफिट, एड्रिच, बोल्स, हे प्रबळ फलदाज यदा चागल्याच जोशात आहेत. ट्रूमन-स्टॅथॅम' जोडी गडी बाद करण्याचे सातत्य टिकवून आहे. 'ऑफ-स्पिन' गोलदाज टिटमस कागारू फलदाजास शह दिल्याशिवाय रहाणार नाही. विशेषत: फिरक्या गोलदाजावर फिदा असलेल्या हिरवळीवर तर तो पाहुणे वीराना त्राहि भगवान करून सोडील. 'लेग-स्पिन' गोलदाजीत मात्र हा सघ संपूर्ण पोरका बनला आहे. या *दोषामुळे गेल्या* ५ वर्षांत इग्लिश संघास वेळोवेळी पराभव सहन करावा लागला. भारतासारख्या दुबळ्या संघाकडूनं मार खाण्याची नामुष्की या सघावर ओढवली. 'लेग-स्पिन' गोलदाजाचा प्रश्न या लढतीतही इग्लिश क्रिकेट नियामक मडळास भेडसाविल्याशिवाय रहाणार नाही. त्या दृष्टीने पहाता कागारू सघ लेग-स्पिन गोलदाजीत इंग्लिश संघापेक्षा उजवा आहे. सिम्सन, मार्टिन, सेलर्स हे गोलदाज कुशलतेने चेडूला फिरकी देतील अशी आशा कागारू क्रिकेट मडळास वाटत आहे. एकंदरीत उभय सघाच्या सामर्थ्याचा विचार करता हे सघ समान दर्जाचे असून, त्यामधील लढतीत हमखास विजयी कोण होणार याचे भवितव्य करणे काहीसे अवघड आहे. सर्वसामान्य रसिकाच्या दृष्टीने या द्वद्वात आक्रमकता, चुरस दृष्टीस पडावी एवढीच अपेक्षा आहे. कातडी बचावण्याच्या धोरणाचा अवलब करण्यात येऊ नये असे प्रत्येकाचे प्रामाणिक मत आहे सिम्सनचे प्रभावी नेतृत्व , ओनिल, बुथ, लॉरी याची प्रेक्षणीय फलदाजी, वॉली ग्राउटचे चपल यष्टिरक्षण, ग्रॅहॅम मेकॅंझीची सुरेख वेगवान गोलदाजी ही कागारू सघातील प्रमुख सौंदर्यस्थळे पहावयास मिळावीत म्हणून इंग्लिश क्रिकेटरसिक आतुर झाला आहे. १९६१ मध्ये कागारू-वेस्ट इंडीज सघात जे अटीतटीचे युद्ध झाले, त्याचे पुनर्दर्शन घडावे अशीच सर्वांची अपेक्षा आहे. पाहूया, या लढतीत उभय संघातील वीर काय पराक्रम गाजवितात तो ?


कांगारू सघातील वीरांची नावे पुढील-प्रमाणे—

(१) *बॉबी सिम्सन (कप्तान)*, (२) ब्रायन बुथ, (३) वॉली ग्राउट, (४) बेरी जारमन, (५) ओनिल, (६) पीटर बर्ज, (७) बिल लॉरी, (८) ग्रॅहॅम मॅकेंझी, (९) रेडपाथ, (१०) जॉनी मार्टिन, (११) टॉम व्हिवर्स, (१२) नील हॉक, (१३) ॲलन कोनोली, (१४) जॅक पॉटर, (१५) बॉब कॉपर, (१६) रेक्स सेलर्स, (१७) ग्रॅहॅम कॉर्लीग.

**—प्रभाकर गुजराती**

● ● ●

[ मडगांव साहित्य संमेलनावरील प्रा. प्रल्हाद वडेर, व डॉ. रंगनाथ देशपांडे यांनी लिहिलेले लेख उशीरा हाती आल्यामुळे या अकात समाविष्ट करता आले नाहीत. पुढील अंकात हे साहित्य प्रसिद्ध होईल. —सं.]



"ये कोनसा शहर है ?" (भोला-राधा)

भारतीय चित्र–समाचार

# शहर और सपना

## सुवर्णपदक... छेः रौप्यपदक !!

महेश

यंदाच्या राष्ट्रपति-सुवर्णपदकाचे मानकरी–चित्र पहावयास जाताना मनात विलक्षण उत्कंठा होती. त्यातून सत्यजित राय यांच्या 'महानगर' चित्राला मागे सारून या चित्रपटाचे घोडे विन्‌ला आलेले—'महानगर' पाहिल्यानंतर या चित्रपटाला मागे सारणारा चित्रपट काढणारा कुणी महाभाग असेल असे वाटले नव्हते. 'महानगर' हे रायचे सर्वोत्कृष्ट चित्र नव्हे, परंतु यंदाच्या पदकासाठी निवडलेल्या चित्रपटांतील मातबर चित्र होते. चित्रपट पाहिल्यानंतर नेहमीप्रमाणे सरकारने एक चांगला चित्रपट स्पर्धेसाठी निवडला याचे समाधान वाटले. परंतु हे चांगलेपण मोजण्याच्या सरकारी तंत्राचा उलगडा होऊन 'महानगर'सारख्या चित्रपटावरील अन्यायही झोंबू लागला.

मुंबई हे एक अफाट शहर आहे. यात भव्य रस्ते, त्यांवरून भरधाव वेगाने चालणाऱ्या मोटारी, टोलेजंग इमारती, कोळ्याने जाळे विणल्यासारखे रेल्वेचे रूळ, त्यांवर अफाट गतीने पळणाऱ्या – माणसांनी गच्च भरलेल्या–रेल्वे गाड्या, स्त्री-पुरुषांनी दुथडी भरून वाहणारे रेल्वे प्लॅटफॉर्मस्–पन्नास लाख वस्तीने गजबजलेली ही विशाल मायानगरी. यातील अलिशान सर्व सुखसोयींनी युक्त अशी हॉटेल्स्, श्रीमंत, लक्षाधीश, क्रोडोपती यांचे शानदार बंगले, ठिकठिकाणी नव्याने उभ्या राहात असलेल्या गगनचुंबी हवेल्या, भव्य उपहारगृहे, चैनीच्या व श्रीमंती चोचले पुरविणाऱ्या वस्तूंची दुकाने, उंची पादत्राणे, कपडे, खाद्यपदार्थ यांचा पुरवठा करणारी आणि गरजा भागविणारी अगणित विक्रीकेंद्रे कांचेच्या शो-रूम्स्मध्ये नेत्रदीपक सजावटीत चमकणाऱ्या शेकडो वस्तू, बावीस खोल्यांच्या सुसज्ज बंगल्यांत राहाणारे लक्षाधीश शेटजी!

पण याचबरोबर त्याच शहरात फूटपाथवर झोपणारे लक्षावधी लोक, त्याचबरोबर चाळीतून खोल्याखोल्यातून कोंबलेली माणसे, बावीस खोल्यात एक शेटजी तसेच बावीस माणसेसुद्धा एकाच खोलीत. मुक्त हस्ताने लक्ष्मीने ज्यांच्या डोक्यावर वरदहस्त ठेवला आहे असे श्रीमंत, त्याचप्रमाणे घरदार नसलेले कारुण्यमय जीवन कंठणारे शेकडो गरीब, खेड्यांतले व बाहेरगावचे असंख्य लोक उराशी सुंदर स्वप्ने बाळगीत मुम्बईला येत असतात. त्यांचे काय होते ? त्यांची स्वप्ने साकार होतात का ?

हा सर्व भाग चित्रपट सुरू होताच एक मसाडा आवाज मोठमोठ्याने बोलून दाखवतो. आता जे कॅमेऱ्याने दाखवायचे ते बोंबलून दाखवून हा इसम... आनंदाचा कोणता प्रत्यय आणून देतो ते कळत नाही, व जे दृश्यकाव्य आहे त्याचा ठणाणा करून दिग्दर्शकाने आपला पराभवच कबूल केला आहे हे ध्यानात येते. शिवाय हे व्याख्यान दिल्यावर आता चित्रपट हा या व्याख्यानाची पुरवणी आहे हे ध्यानात येऊन उत्कंठेवर काहीसे पाणी पडते.

### कथानक

भोलाराम नावाचा असाच एक खेडवळ तरुण आपले नशीब काढण्यासाठी सुंदर स्वप्ने रंगवीत मुंबई शहरात येतो. त्याने रंगविलेली स्वप्ने आणि मुंबईतील त्याचे प्रत्यक्ष अनुभव यांवर आधारलेली – भोलानाथच्या जीवनावर आधारलेली कथा 'शहर और सपना' या चित्रपटात दाखविली आहे.

या कथानकात भोलाचे जे उन्हाळ्यात फूटपाथवर व पावसाळ्यात बेकायदा झोपडीत स्वर्ग निर्माण करणारे तीन मित्र दाखवले आहेत, हे तीन मित्र म्हणजेच राष्ट्रपति-पारितोषिकाची हंडी शिजवण्याकरता मांडलेले तीन दगड आहेत. कथानकात हे तिघे कोण आहेत ? यांतला एक ख्रिश्चन आहे, एक मराठी पहिलवान आहे व तिसरा पूर्वी 'यहुदी की लडकी' वगैरे चित्रपटांतून कामे केलेला, परंतु आता बेकार असलेला मुसलमान आहे. हे

तिघ गरिबीमुळे एकत्र येतात. (याशिवाय चौथा एक बेकार कवीही असतो, परंतु तो फारसा महत्त्वाचा नाही.) भोलानाथाच्या गर्भार बायकोला हे तिघे झोपडीत आश्रय देतात व या तिघाना झोपडीत ठेवून भोला व राधा आपला संसार करतात.

या चित्रपटाचे तीन प्रमुख गुण म्हणजे— आपला कथेचा धागा सोडून चित्रपट फारसा कुठे नाचगाण्यात वाहवत नाही, मुंबईतील जागेचा भयानक प्रश्न हा त्यातील भयानकतेसह चागल्या तऱ्हेने माडला आहे, व निवडलेल्या सर्व नट-नटी या त्या त्या भूमिकांसाठी सुयोग्य आहेत. या योजकतेबद्दल चित्रपटाचे लेखक, दिग्दर्शक व निर्माते ख्वाजा अहम्मद अब्बास याचे खास अभिनंदन केले पाहिजे. विशेषतः बारिक सारिक दिग्दर्शनाच्या तपशीलाची काळजी घेतली गेल्यामुळे चित्रपट दर्जेदार होण्यासाठी फार मदत झाली आहे. उदा० जागेची टंचाई विषादपूर्ण वाटावी यासाठी 'पाइप' ची केलेली निवड व अखेर तो पाइप गटारात उलथताना त्यावर लिहिलेली 'राधा–भोला' ही अक्षरे! पाईपवर एका तोंडावर पडदा सोडल्यावर त्या पडद्यावर दिसणारी राधेची हालचाल, चाळीचे वास्तव देखावे, फूटपाथवर मागे झळकणारी प्रचड जाहिरात—या सर्व गोष्टी आब्बासाच्या दिग्दर्शनकौशल्याची साक्ष पटवतात. राधा ही मराठी मुलगी दाखवून तिच्या तोडी घातलेले काही वेळचं शुद्ध मराठी चित्रपटात रंग भरण्यास उपयोगी पडते. दिलीपराज या नटाचा कोवळा, निरागस आणि नवा चेहरा नायकाच्या भूमिकेसाठी मिळवून त्यानी मोठीच चतुरता दाखवली आहे.

हे सर्व सागितल्यानंतरही या चित्रपटापेक्षा 'महानगर' हा चित्रपट काही पटीने श्रेष्ठ आहे हे नमूद करावेसे वाटते. कारण 'महानगर' मध्ये जे नगरांचे स्वरूप हलक्या हाताने उलगडले आहे तेच या चित्रपटात आब्बासानी काहीशा बटबटीतपणे केले आहे. नुसता प्रश्न माडून आब्बास बाजूला होत नाहीत तर या प्रश्नावर श्रीमंताकडे असख्य जागा पडून आहेत त्याचे काय, असा जो विरोध दाखवतात, तो गरिबीचा प्रश्न सोडवण्याचा मार्ग ठरत नाही. या चित्रपटात आब्बासानी सरकारी परीक्षकाना खूष करण्यासाठी राधाच्या संबंधात हुडाबदीचा प्रचार व भोलाच्या मित्रपरिवारामार्फत भारतातील सबगोलकार जीवनाचा उदोउदो केला आहे तोही फार उथळ व प्रचारकी वाटतो.

भोलानाथ आपले नशीब काढण्यासाठी मुंबई शहरात प्रथमच येतो. मुंबापुरीच्या दर्शनाने त्याचे डोळे दिपून जातात. ज्या काकांचा पत्ता घेऊन तो मुबईला येतो ते देवाघरी गेल्याचे समजते. भोलानाथला फूटपाथचा आसरा घ्यावा लागतो. पावसाळ्यात फूटपाथचा पण झोपण्यासाठी उपयोग होत नाही. निवाऱ्याची जागा शोधण्यासाठी असाच पावसात एका रात्री तो एका रस्त्यावर भूमिगत गटारासाठी आणून टाकलेल्या 'पाईप'चा आसरा घेतो आणि याच वेळी राधा नावाच्या एका तरुणीची आणि त्याची गाठ पडते. राधा ही पण एक निराश्रित, खेड्यातून हुंड्यापायी लग्न मोडल्याने पळून आलेली मुलगी. मुंबईत प्रथम आल्यावर तिच्यावर अत्याचार होतो. राधा आणि भोलानाथचे एकमेकावर प्रेम बसते. पुढे भोलाला एका गिरणीत नोकरी लागते. प्रेमाचे रूपातर भोला-राधाच्या विवाहात होते. पाईपमध्ये ती दोघे ससार करू लागतात. भोला जागा मिळविण्यासाठी खूप प्रयत्न करतो. पण पागडी भरण्याइतके पैसे नसल्यामुळे त्याना रस्त्यावरच्या पाईपमध्येच रहावे लागते. राधाला दिवस जातात आणि पाईपमध्ये ससार करणे अशक्य झाल्यामुळे भोला राधाला घेऊन आपल्या मित्राच्या झोपडीत राहायला येतो. ज्या गरीब लोकाच्या झोपडवस्तीतच ही झोपडी असते, त्या जागेवर लौकरच एक टोलेजंग इमारत उठायची असते. राधाचे दिवस भरलेले असतात व तिला ज्या दिवशी प्रसूति-वेदना होत असतात त्याच दिवशी त्या साऱ्या झोपड्याचे उच्चाटन व्हायचे असते.

बुल डोझर झोपड्या उध्वस्त करीत असतो. राधा ज्या झोपडीत प्रसूत होते त्या झोपडीपर्यंत बुलडोझर येतो आणि तीन चार दिवसाचे जीवदान त्या झोपडीला मिळते. अखेर राधा-भोला आणि त्याचे अपत्य आणि ते मित्र याना ती झोपडी खाली करावी लागतेच. अनेक स्वप्ने रगविणारी राधा-भोला घरविहीन होतात. कुठे जायचे? राधा स्वप्न रंगवू लागते—आपली निजायची खोली, स्वयंपाकघर, आपला संसार, बाळ, बाळाचा रंगीत पाळणा, बाळ पाळण्यात झोपले आहे, आपण दोघे झोके देत आहोत. शेवटी ती दोघे आपल्या बाळासह पुन्हा पाईपचा आश्रय घेतात. राधाच्या डोळ्यासमोरचे स्वप्न अजून तसेच असते. ते घर, झोपायची खोली, स्वयंपाकघर, बाळाचा रंगीत पाळणा. ती भोलाला विचारते—

"ये कोनसा शहर है?"

भोला म्हणतो, "ये शहर नही—सपना है!"

भोला—राधा ससाराची रम्य चित्रे रंगवीत पाइपमध्ये शिरतात आणि एका मोठ्या प्रश्नचिन्हाने चित्रपट संपतो.

## एकतर्फी प्रचार का?

सामाजिक प्रश्नावर चित्रपट काढीत असता हे बहुसंख्य मुसलमान दिग्दर्शक केवळ हिंदूच्याच सामाजिक व्यगावर का बोट ठेवतात हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. मुसलमान, ख्रिश्चन या अल्पसख्य समाजात काही अन्याय, काही दुष्ट रूढी ह्या अस्तित्वातच नाहीत? स्त्रियाना सामाजिक जीवनात मुसलमान समाजाने केलेला मज्जाव हा विषय एकाही मुसलमान दिग्दर्शकास का सुचू नये? त्यातून आब्बास हे पुरोगामी विचाराचे दिग्दर्शक म्हणून प्रसिद्ध; त्यांनाही या किंवा अशा स्वरूपाच्या विषयाला हात घालण्याचे धाडस नाही असे समजावयाचे काय? दुसरी गोष्ट, सर्वसाधारणपणे धनिकाचा मूर्ख प्रतिनिधी दाखवला जातो तो मारवाडीच का? एकतर गडगज पैसा मिळवणारा मारवाडी इतका मूर्ख नसतोच. हिंदु समाजातील बहुसख्य शिक्षणसंस्था आणि सामाजिक संस्थाना सढळ हाताने देणग्या देणाऱ्या या समाजावर सतत असा आरोप करीत राहाणे अन्यायाचे आहे. मुबई-पुण्यात काय सिराजउद्दीन थोडे आहेत? मग आब्बासनी मूळचंदच का निवडावा? भोला- राधा हे हिंदु दापत्य असल्याने ते मुसलमान-ख्रिश्चन माणसासह राहाण्याचे पत्करते. हाच दृष्टिकोन एकाद्या मुसलमान स्त्रीचा असतो का? जो अन्याय दिल्लीपासून गल्लीपर्यंत हिंदूच्या वाट्याला येतो तोच या चित्रपटात दाखवलेला आहे. असा अन्याय करणाराचीच सध्या चलती असल्यामुळे या चित्रपटाला सुवर्णपदक, राष्ट्रपति-सुवर्णपदक मिळाले आहे हा उलगडा समजण्यासारखा आहे.

**चाकोरी वेगळे**

चित्रपटात संगीत जवळ जवळ नाही. जे एकच गाणे आहे ते चांगले असून त्याचा वापरही योजनापूर्वक केला आहे.

नेहमीचे हिंदी चित्रपट ज्या चाकोरीतून धावतात त्यापेक्षा ह्या चित्रपट अगदी वेगळा आहे. यात द्वंद्वगीते नाहीत. गुंतागुंत नाही. मुंबईच्या गरीब, निराधार व बेघर जनतेचे हे एक बरेचसे वास्तववादी चित्र आहे.

पण कृत्रिम आणि वेगडी प्रणयाचे व्यसन लागलेल्या प्रेक्षकांना हा चित्रपट आवडेल असे वाटत नाही. बरेचसे प्रेक्षक काहीच बघायला मिळाले नाही म्हणून निराश होतात. कॅमेरा आणि दिग्दर्शन यांचे कौशल्य जागोजाग असूनसुद्धा प्रेक्षक कंटाळतात. कथानकप्रधान चित्रपट पाहण्याला सरावलेले प्रेक्षक चित्रपट पाहताना रंगत नाहीत. मुंबईच्या बकाल जीवनाचे एक वास्तववादी चित्र प्रेक्षकांच्या पचनी पडत नाही.

या चित्रपटात नायक-नायिकेचे काम करणारे दोन नवीन चेहरे पडद्यावर आले आहेत. भोलानाथाचे काम दिलीपराज यांनी केले असून राधाची भूमिका सुरेखा हिने केली आहे. मनमोहन कृष्ण, डेव्हीड, नाना पळशीकर आणि अन्वर हुसेन यांनी भोलाच्या मित्रांची कामे चांगली केली आहेत. विशेषत: डेव्हिड आणि अन्वर हुसेन यांनी आपली कामे सहजसुंदर केली आहेत.

या चित्रपटाला सुवर्णपदक मिळाले आहे. बहुसंख्य जनतेने चित्रपट त्वरित पहावा कारण तो फार काळ चालण्याची शक्यता नाही.

• • •

## पृष्ठ २३ वरील कथा एक प्रश्न

स. न. वि. वि.

आपले दि. २९–४ चे पत्र मिळाले. माझी 'टेकण' ही कथा आपण आपल्या 'माणूस' साठी स्वीकारलीत हे वाचून आनंद वाटला. त्या कथेच्या शेवटाबाबत ती गूढ वाटते असे आपण लिहिले आहे. परंतु त्यात गूढ असे काही नाही. कथेतील 'ती' पहिल्यापासून एका पायाने जराशी अधू आहे. 'ती' अधू असल्याचे शेवटपर्यंत कुठेच म्हटले गेले नाही. अपंगाला आपले व्यंग नेहमीच सलत असते. तो नेहमी पूर्णत्व शोधत असतो. माझी ही कथा म्हणजे एका अपंगाने केलेला पूर्णत्वाचा शोध. ती अपंग आहे हेच मी म्युझियममधील एका पायावर रेललेल्या शिल्पाचा उल्लेख करून सूचित केले आहे.

सौ. जयश्री खिरे,
नासिक

*

(सौ. जयश्री खिरे यांची कथा 'टेकण' या शीर्षकाखाली याच अंकात प्रसिद्ध होत आहे. लेखिकेला जे अभिप्रेत आहे ते कथेतून वाचकाला स्पष्ट होते काय यासंबंधी वाचकांनी आपली मते कळवावीत. सं.)

• • •



५ वर्षे व अधिक
मुदतीच्या ठेवीवर आतां
५ १/८
टक्के व्याज मिळवा...
घरच्यापेक्षां महाराष्ट्र बँकेंत पैसे सुरक्षित राहून व्याजहि भरपूर मिळतें. सेव्हिंग्ज खात्यावरहि ३% व्याज. चेकनें पैसे काढण्याची सोय. मुदतीच्या ठेवीवर ४ १/८% ते ५ १/८% व्याज मिळतें. विविध बचत योजनांचे माहितीपत्रक मागवा.
दि बँक
ऑफ महाराष्ट्र लि.
644
११७७, बुधवार पेठ, पुणें-२




सौ. कुमठा आणि एक उत्सुक बालवाचक
सौं. च्या मागे श्री. कुमठा

येथील पुस्तके पाहून मनाला फार आनंद वाटला. इतर अनेक प्रदर्शने पाहिली. परंतु त्यांमध्ये सर्वात महत्त्वाची सूचना असते, की 'हात लावू नका.' परंतु येथे मात्र खुशाल हात लावून बघून आपल्या पसंतीस पडतील ती पुस्तके घ्यावयास मिळतात. म्हणून जास्त उत्साह वाटला. पुस्तके बघून हे घेऊ, की ते घेऊ असे होऊन गेले. त्यातल्या त्यात माझे मतच घ्यावयाचे झाले तर मला सर्वात जास्त 'टारझन' हे पुस्तक फार आवडले. "ही बालजत्रा नेहमी अशी चालू राहो." अशीच सदिच्छा आहे.

तनुजा नाईक
घर नं. १४, दुसरी भटवाडी,
गिरगाव मुंबई ४
वय १३ वर्षे



★ ★

## शुभेच्छा

श्री. वसंतराव वैद्य, स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स् लि., हे फ्रंकफुर्टजवळ सिरमासेन येथे भरणाऱ्या एका जागतिक यंत्र-प्रदर्शनास भेट देण्यासाठी विमानाने दि. २१ मे ला जर्मनीस रवाना झाले.

जर्मनीहून इंग्लंड, इटली व झेकोस्लाव्हियामध्ये काही प्रमुख यंत्रोत्पादन करणाऱ्या कारखान्यांनाही ते भेट देतील.

स्वस्तिकच्या उत्पादनवाढीच्या ज्या आगामी योजना आहेत त्या दृष्टीने ही भेट अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

श्री. वसंतरावांना 'माणूस'च्या शुभेच्छा !











MANOOS MAGAZINE : June 1964 : ONE RUPEE R.N.B9304

# हिटलरपूर्व जर्मनी व भारत

हिटलरचे भारतात पुनरुज्जीवन होईल का ?
हा प्रश्न हिटलरपूर्व जर्मनीची परिस्थिती
भारतात निर्माण होत आहे का
या प्रश्नाच्या उत्तरावर अवलंबून आहे.
हिटलरपूर्व जर्मनीची परिस्थिती काय होती ?
या परिस्थितीनेच हिटलरला कसा घडवला,
कसा जर्मनीचा हुकुमशहा केला,
कसे यातूनच पुढे दुसऱ्या महायुद्धाचे हत्याकांड पेटले,
याची सविस्तर आणि सचित्र माहिती
मराठी वाचकांसमोर फारशी कुठे आली नाही.
रा. म. शास्त्री यांची चालू अंकातील
'नाझी भस्मासुराचा उदयास्त'
ही लेखमाला
म्हणूनच वाचकांना नावीन्यपूर्ण व उद्बोधक वाटेल.

